REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० | अकोला रविवार ता० २ माहे जुलै सन १८७६ इ० | अंक २७

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा.

फकिऱ्या नाईक लबाणी रहाणार मौजे धारागिरी परगणे पिंजर तालुके अकोलें यास दिवटाजी वल्लद कवडाजी गांवडें पाटील रहाणार मौजे अंबिकापुर तालुके अकोले याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुला आह्मी रुपये ४० देऊन एक वर्षाचे बोलीनें नोकर ठेविलें त्यांत तूं ७ महिने कामकरून निघून गेलास तेव्हां तुला रुपये परत मागता चौघांसमक्ष करार केला कीं, १६ रुपये सुगीं दिपवाळीवर द्यावे. तें आह्मी मान्य केलें असतां तूं अजून रुपये दिले नाहींस, वायदा चुकून अडीच वर्षे झालीं सबब ही नोटिस दिली आहे तर नोटिस पोचल्यापासून १५ दिवसांत मुद्दल रुपये १६ व अडीच वर्षाचें व्याज असे पाठवून द्यावे. याप्रमाणें तुजकडून न झाल्यास दिवाणी कोर्टांत दावा लावून खर्चासुद्धां सर्व रुपये घेण्यांत येतील. कळावे तारीख २४ माहे जून सन १८७६ इसवी.

( सही ) दिवटाजी वल्लद कवडाजी गांवडें वस्ती अंबिकापुर.

### नोटिस.

राजश्री गुलाबचंद मेमाणी दुकान तेल्हारें यासी इसरदास आखेराम मारवाडी दुकान तेल्हारें याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्माकडे आमचें खाते बाकी मुद्दल रुपये ३९९८= तीनशे नव्याणव दोन आणे असून त्यांत वसूल १२५ रुपये तुह्मी दिले बाकी रुपये २७४८= व शिवाय व्याज संवत १९३० मित्ती कार्तीक शुद्ध १ पासून आज पर्यंत घेणें आहे. त्याची सफाई ही नोटिस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत करावी. याप्रमाणे न केल्यास रीतीप्रमाणें दिवाणींत फिर्याद करून सदर्हू रुपये वसूल करण्यांत येतील व या नोटिशीचा खर्च व फिर्यादीचा खर्च ही तुह्मास द्यावा लागेल. करितां सदर्हू मुदतींत रकमेची आदाई करण्यास चुकूं नये ही नोटिस दिली आहे सही. तारीख २६ जून सन १८७६ इसवी.

( सही ) इसरदास आखेराम दुकान तेल्हारें दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि रा. रा. हरि नारायण परांजपे अडिवरेकर हल्लीं मुक्काम माळेगाव, माजी स्कूलमास्तर तेल्हारें तालुके अकोट, हल्लीं ज्यांस देव मास्तर ह्मणतात त्यांचे विषयीं दोन ओळी लिहून आपणाकडे पाठवीत आहे त्यांचा अव्हेर न करितां आपण आपल्या सुंदर पत्रीं छापून प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

अलीकडे सुमोर २ महिन्यांपासून देव मास्तर बोवांची स्वारी गावांत मनास वाटेल त्या जातीचे घरीं जाऊन त्या घरांतील स्त्रियांकडून खुणानीं [ हस्त संकेतानीं ] अच्छेर अगर शेरभर तलांत कांदे अथवा मुगाच्या वड्या वगैरे पदार्थ तळवितात. आणि चुलीवर तापून कडक झालेला तवा अगर कढई लागलीच हातावर घेऊन आंतील जिन्नस खाण्यास आरंभ करतात. त्यांचें खाणें झाल्यावर खालीं ठेविलेल्या कढईस अगर तव्यास कांहीं वेळ पावेतों हात लाववत नाहीं. हात लावला असतां हातास फोड येतात परंतु त्यांच्या हातास अगर तोंडास कांहीं एक इजा होत नाहीं अशी नाना प्रकारचीं नित्य नवीं कृत्यें बोवासाहेबाकडून घडलेलीं पहाण्यांत येतात.

बोवासाहेबाकरितां रा. रा. कृष्णाजी बल्लद उदेभान पाटील पिंपरी तालुके जळगाव यांणीं घर करून दिलें आहे. सर्व खर्च त्याणीं स्वत: लाविला आहे.

गेल्या महिन्यांत सरकारी कामदार मंडळी बोवाचे दर्शनाकरितां पुष्कळ आली होती. तारीख २० माहे जून सनमजकुर रोजीं तालुके जळगाव येथील तहशिलदारसोबत कांहीं कारकून मंडळी घेऊन मुद्दाम दर्शनाकरितां येथें आले होते. त्यानीं ३ तीन रुपयांची मिठाई वाटली. बोवासाहेबाची कीर्ति झाल्यापासून गावकरी लोकांस नवसाचे मिठाईची शेरणी हरहमेशा मिळत असते आणि हलवायाचाही विकरा पहिल्यापेक्षां पुष्कळ पटानें ज्यास्त होऊ लागला आहे.

बोवांची हल्लीची स्थिति — सार्वकाल नग्न असतात. अंगावर वस्त्र बिलकूल ठेवित नाहींत. सर्व स्त्रियांस मातोश्रीवत् मानतात. जटा वाढविल्या आहेत. रात्रौ तयार करून दिलेल्या छपरांत असतात. दिवा राहू देत नाहींत. भाषण कोणाशी करीत नाहींत. कळावें तारीख २२ माहे जून सन १८७६ इसवी मुक्काम माळेगाव तालुके अकोट

एक
गावगुंडा

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

विनंती विशेष. आपणाकडे च्यार ओळी लिहून पाठविल्या आहेत तर मेहेरबानी करून त्या येत्या अंकांत घ्याव्या.

वणी येथील तहशिलदार मि० शेषाचलम् ऊर्फ अण्णा साहेब हे तारीख १२ मिनहू रोजीं येथील मुलींच्या शाळेंत गेले होते. वऱ्हाडांतील मुलींच्या शाळांस सरकारांतून बुकें व स्लेटी वगैरे मिळत नसल्या कारणानें शिक्षणाचें काम बरोबर चालत नाहीं. ज्यांच्या मुली असतात त्यांस मुली पाठविणेंच मोठें जिवावर येतें मग त्यांस बुकें व स्लेटी घेऊन देण्याची इच्छा कोठून असेल? अशा प्रकारची स्थिति मास्तर याणा तहशिलदार साहेब यांस सांगून गावकरी वगैरे मंडळी जमवून थोडासा फंड जमवावा अशी सूचना केली परंतु आमचे उदार अण्णा साहेब यांणीं वर्गणीची यादी वगैरे करण्याची खटपट न करितां तो पैसा आपले पदरून देण्याचें कबूल केलें आणि लागलीच ४॥. साडेच्यार रुपयांची अवश्य अशीं बुकें घेऊन दिलीं व स्लेटी वगैरे मागाहून देण्याचा करार केला आहे. असे परोपकारी व विद्यावृद्धीच्छू अमलदार क्वचित असतात.

इकडे महामारीचा उपद्रव. मार्डी, सिंदी वगैरे गावीं उद्भवला होता परंतु हल्लीं शांतता आहे. तथापि पर्जन्य अद्याप पडत नाहीं यामुळें धास्ती आहे. ऊष्मा मनस्वी होत आहे. कळावें हे विनंती मुक्काम वणी तारीख २३ माहे जून सन १८७६ इ०

एक
वणीकर

## भूतपिशाच.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस ---

वि. वि. मनुष्याचें शरीर जरी पंचभूतात्मक असून दृग्गोचर आहे तरी त्यांस चैतन्यरूपानें व्यापार करणारा असा अगोचर वायु एकच आहे यांत संशय नाहीं. व ह्मणूनच मनुष्याचें सर्व अस्तित्व त्याप्राणवायूवर अवलंबून असतें. आतां तो प्राणवायु अमर आहे व त्याची योजना ह्मणजे सांगड या नाशिवंत शरीराशीं घातली यांत सृष्टिकर्त्याची चूक असावी असें वाटतें. कारण अनादिकाल टिकणाऱ्या वस्तूशीं क्षणिक वस्तूचा मेळ घातला ह्मणजे क्षणिक महत्कार्यं होऊन त्या साथीदाराचा नाश झाला ह्मणजे दुसऱ्या अखंड वस्तूला रखडत पडावें लागतें. आतां सृष्टिकर्त्याच्या हातून एवढी मोठी चूक घडेल असेंही वाटत नाहीं. कारण ज्याने या विजातीय पदार्थांचा संयोग केला आहे त्यानें त्या अखंड वस्तूबरोबर नाशिवंताला अखंड होण्याचीं अगर नाशिवंताबरोबर अखंडाचा लय करण्याचीं ( जसें पंचभुतें अंतकाळीं जगांतील महातत्वांत मिळतात तसा प्राण वायूही मूळ वस्तूंत मिळण्याचीं ) साधनें ठेविलीं असतील. पण त्या उभयतांची मिळणी झाली ह्मणजे जीव हा काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ अहंकार यांच्या स्वाधीन होतो व मग ते एकमेकांचें हित करण्याचें विसरतात. पण जे या षड्रिपूंच्या जाळ्यांत सापडत नाहींत ते आपली व आपल्या साथीदाराची सुटका करितात. व या व्यतिरिक्त अधःपतनीं पडून पिशाच योनी धारण करितात अशी पूर्वापार समजूत आहे ती, व ईश्वरी नियम अन्यथा खोटे ह्मणवत नाहींत.

आतां पिशाच योनीविषयीं विच्यार केला ह्मणजे कल्पक मनुष्याचे असें सहज लक्षांत येतें कीं हा एक स्वतंत्र वर्ग इहलोकीं भ्रमण करणारा नसावा. 'तरी भूतसंचार, पिशाचबाधा' ही ओरड व त्यांत गुंतलेल्या लोकांची छांछू वारंवार कानीं येते. ही बाधा झाली ह्मणजे मनुष्याची स्मृति व शुध्धी आधीं हरपते व तेणेंकरून त्याच्यानें सारासार विच्यारपूर्वक योग्यायोग्य वर्तन होत नाहीं, तो भलभलते वेडे चाळे करूं लागतो व अद्वातद्वा बरळतो. त्या पैकीं त्याच्या सर्व आयुष्यांतील अभ्यासाशिवाय तरी सहवासांतलेच असे कांहीं अचाट शद्ब केव्हां केव्हां ऐकावयास सापडतात. असे प्रकार आपल्याच देशांत घडतात असें नाहीं पृथ्वीच्या सर्व भागावर सदर्हू प्रकारचें कार्य मानवी देहावर घडत असेल. विलायतेसही असें कार्य घडतें; पण तेथील लोक त्याला 'हिस्टेरिया' ह्मणजे उन्मादवायू नाव ठेवून निराकरण करितात. आपल्या देशाप्रमाणें मेलेला मनुष्य येऊन त्याजमध्यें संचरतो असें मानणारे एतद्देशिय लोकांशिवाय क्वचित् असतील. व खरेंच असें मानणारे ईश्वरी नियमास किती असंगत असावेत बरें? भूतसंचाराच्या वेळीं त्या प्राणास पूर्व स्थळींची चांगली आठवण रहाते तर आपणास पूर्व जन्मींची कां राहूं नये? आपला आत्मा अनादि नव्हे काय? अगर पिशाच्च योनीपेक्षां अधिक भ्रष्ट आहे काय? आतां या संचारांत असंभव्य बोलतो तरी त्यांत निकट संबंध ठेवणाऱ्या भार्षेतलेच शद्ब असतात. या महाराष्ट्रांत कोणाला भूत लागून तेलंगी अगर इंग्रजी एक शद्बही बोलत नसून बहुतकरून हिंदुस्थानीच बोलतात. यावरून इंग्रजी अगर तेलंगी शिकणारे भूत होत नसतील काय?

आतां प्राणाचीं कार्यें दाखविणारें मन याची गति अचाट आहे, कृति अग-

प्य आहे, महिमा अपार आहे, व आकार इतका मोठा आहे कीं, सर्व ब्रह्मांड त्याच्या एका कोनांत मावूं शकेल. याच्या योग्यतेचा पदार्थ सर्व ब्रह्मांडांत शोधिला तरी मिळणे नाहीं, तरी तें मन इतकें नाजूक आहे कीं, उंबरांतील पाखराच्या पक्षवातानें देखील चंचल होतें तें पुन्हा पूर्ववत जुळत तर नाहींच पण ताळ्यावर येण्यास देखील प्रयास लागतात.

आता हें मन जरी कशांत लिप्त नाहीं तरी शरीरास सुसंगती अथवा कुसंगती मिळाल्या सारिखे हुबेहूब ठसे त्यावर उठतात. तसेंच शरीरास सुख किंवा दुःख होईल त्याप्रमाणें आनंद व संताप अनुक्रमें प्राप्त होतात. आतां या सिद्धांतास अनुसरून आपण या जगाच्या रहाटीकडे पाहिलें तर किती अगणित अनुकूल व प्रतिकूल कार्ये होत असतात तीं इथंभूत समजण्यास आपण अगदीं असमर्थ आहों असी खात्री झाल्यावाचून रहात नाहीं.

मनुष्याचे शरीरास व मनास विकृति करणाऱ्या वस्तु अनेक आहेत त्यांच्या योगानें मनाची स्थिति कशी होईल याचा नियम नाहीं. अशा गोष्टी आपल्या सदाचरणांत पुष्कळ आहेत पण त्या आपल्या परिपाठांत असून, हो कधीं कधीं प्राप्त होणारी आहे. पहा आपण झोंपीं गेलों झणजे आपल्या शरीराची स्थिति कशी होते ? शरीर निचेष्टित पडतें व त्यास जागृत करावयास लागलें तर उठून कोस कोस (विरळा) निघून गेल्यावर शुद्धीवर येतो. कोणी मनुष्य निद्रेत स्वप्न पहातो तेव्हां जागृतींत त्याच्या मनानें कधींच पाहिले नसतील असेंही पुष्कळ प्रकार त्याला दिसतात व कांहीं संभवनीय असून प्रत्ययास येतात. तापांत मनुष्य हवातसा बरळतो तसाच वेडा झाल्यावर, फेपरें आल्यावर, भांग, मद्य, धोतरा इत्यादि सेवन केल्यावर, साप चावल्यावर; सन्निपात किंवहुना फक्त शीत पित्त, किंवा एकादा वायू झाला झणजे त्याची कशी अवस्था होते ती आपण कोटयावधि उदाहरणांवरून पहातों. इत्यादि कारणांकडे मन दिलें असतां तार्किक मनुष्याचे असें सहज लक्षांत येईल कीं, भूतसंचार झणून जसा प्रकार लोक मानितात तसा नसून तोही एक प्रकारचा वायूच श्वासोश्वासांत जाऊन मनुष्यदेहावर असें कार्य करित असावा. तरी पण पुष्कळ उदाहरणांवरून असेंही अनुमान होतें कीं, भीतीच्या कचाटींत सापडलेल्या मनुष्यावर या भूत ( कांहीं नाहीं ) वायूचा पगडा लवकर बसतो. कारण याची झडप स्त्रीजातीवर फार व त्या अधिक भित्र्या असतात. यावरून पिशाच योनी स्वतंत्र मानणें प्रशस्त नाहीं. कळावे ता. २१ जून १८७६ इ.

तुमचा दास रामारमन.

## नोटिस.

उदेभान वल्लद बापूजी पाटील वस्ती मुनावी बुदरूक तालुके अकोट यांस मगनीराम तनसुकदास दुकान तेल्हारा वहिवाटदार शिवलाल मुरलीधर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं संवत १९३२ कार्तिक शुध्ध १५ तुमचा आमचा हिशेब होऊन तुह्माकडे येणे ८९० रुपये निघाले ते तुह्मास दोन तीन वेळां मागितले असतां दिले नाहीं झणून नोटिस दिली आहे तर नोटिस पोचल्या पासून १५ दिवसांत व्याजासुध्धां सर्व रुपये आणून द्यावे. न दिल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून खर्च सुध्धां भरून घेऊ या नोटिसीचा खर्च तुह्माला द्यावा लागेल. कळावे तारीख २ माहे जुलै सन १८७६ इसवी

( सही ) मगनीराम तनसुकदास
दुकान तेल्हारें वहिवाटदार
शिवलाल मुरलीधर
दस्तुर खुद.

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शुद्ध ११ शके १७९८.

गेल्या आठवड्यांत वकिलाबद्दल एक निबंध आमचे पत्रांत आला होता. त्यांत असें लिहिलें होतें कीं आतांच्या काळाला इंग्लिश जाणणारे वकील उत्तम व वऱ्हाडांत तसे थोडे आहेत आणि नवीन भरती करीत नाहींत ही मोठी गैरसोय आहे. याजकरितां मुंबई, नागपुर वगैरे ठिकाणांप्रमाणें येथेंही परीक्षा व्हाव्या व जुन्या वकिलांत नवीन कांहीं हुशार वकील सामील व्हावे आणि परिक्षा नच घेतील तर इंग्रजी जाणणारे कोणी वकिलांनीं इकडे येऊं इच्छिल्यास त्यांत परवानगी द्यावी इतकाच त्या निबंधाचा मुख्य हेतु होता. परंतु आमच्या हयगयीनें व नजरचुकीनें तो मजकूर प्रसिद्ध होण्यापूर्वी लक्षपूर्वक वाचण्यांत आला नाहीं झणून त्यांत कित्येक अप्रशस्त शब्द राहिले गेले. याबद्दल आह्मांस फार वाईट वाटतें व तशा शब्दांमुळें सर्व वकिलांचीं मनें दुखावलीं याबद्दल आह्मी फार दिलगीर आहों. मुद्दाम असें लिहिण्यास आह्मास कांहीं हेतु नव्हता व कोणाही वकिलाशीं आमची कांहीं द्वेष दुस्मानी नाहीं हें ते जाणत असतील.

## वऱ्हाड आणि निजाम.

हिंदुस्थानाकरितां प्रिव्ही कौन्सिल असावें या विषयावर एक निबंध गेल्या महिन्यांत मेजर ईव्हान्स बेल यांनीं विलायतेंतील ईस्टइंडिया असोसियेशन सभेपुढें वाचला त्यांत वऱ्हाड प्रांताविषयीं व निजाम सरकाराविषयीं त्यांनीं जें लिहिलें आहे तें टाइम्स पत्राचे आधारें आह्मी आपले वाचकांकरितां संक्षिप्त रीतीनें घेतों.

सुमार २१ वर्षांपूर्वी मी विलायतेस आलेलों असतां मला पुन्हा हिंदुस्थानांत जाण्याविषयीं सूचना झाली; कारण कीं हैदराबाद येथें असलेल्या पलटणीमध्यें त्यावेळीं मी होतों व तेथें लढाईचा प्रसंग आहे असें मला कळविलें गेलें. पुढें सन १८५२ किंवा सन १८५३ या सालांत खरोखर लढाईचा प्रसंग नव्हता असें दिसून आलें. पण गडबड व धामधूम बरेच महिने फार मोठी चालली होती ही गोष्ट त्यावेळेस सिकंदराबादचे छावणींत जे लोक होते त्यांस अजूनही चांगली स्मरत असेल. जनरल सर जान लो त्यावेळचे हैदराबादचे रेसिडेंट यांची विशाल बुद्धि व चातुर्य तसेंच हैदराबादचे दरबारची समजूत, शांती, व शहाणपण यांची या संबंधानें मी फार तारीफ करितों. यांच्या या सद्गुणामुळें भांडण निकरावर न येतां आपसांत मिटलें- नाहींपेक्षां एका घावीं दोन तुकडे तेव्हांच झाले असते. ब्रिटिश सरकारचा मागणीचा हुकूम, निजाम सरकारची इच्छा व अंतःकरण यांस केवळ भेदून जाणारा असा होता व त्याकरितां त्यांच्यानें त्या हुकुमाविरुद्ध जितके बोलवलें तितकें ते बोलले व शेवटीं कर्नल डेविडसन त्यावेळचे असिस्टंट रेसिडेंट यांची धमकी व तयारी पाहून इंग्लिश सरकारच्या हुकुमास त्यांनीं निमुटपणें रुकार दिला. ब्रिटिश सरकारचा मागणीचा हुकूम असा होता कीं हैदराबाद कंटिंजेंट फौजेला पगार वेळच्यावेळीं देतां येण्याकरितां निजाम सरकारानें आपल्या मुलखांपैकीं उत्तम पिकाऊ असा कांहीं मुलूख ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत द्यावा. अशा नावाची फौज पाहिली मुळींच नव्हती. ज्या फौजेला हें नाव दिलें तिला या पूर्वी निजाम सरकारची फौज असें झणत होते. तहनाम्यामध्यें अशी फौज ठेवण्याविषयीं कलम आहे व तिचा पगार निजाम सरकारानें देत जावा असें आहे व तें निजाम सरकारानें मान्य ही केलेलें आहे व कर्जाचे फेडीबद्दल वारंवार तक्रार पडत असते असा, खऱ्या मजकुराचे उलट कुकीचा मजकूर लार्ड डालहौसी त्यावेळचे हिंदुस्थानचे गवरनर जनरल यांनीं निजामास समजाविला. सन १८५० सालीं कर्नल डेविडसन त्यावेळचे रेसिडेंट यांनीं सरकारास असें लिहिलें कीं पूर्वी पासून माझें मत आहे कीं उभय सरकारचा पैशासंबंधीं वाद कांहीं राहिलेला नाहीं, सबब निजामाकडे आपण पैशाचा हक्क सांगतो तो वाजवी नाहीं. सन १८५३ सालींही यांनीं असेंच झटलें आहे कीं निजाम सरकारास पैसा मागण्यास आपणास फारच थोडा हक्क आहे किंवा मुळींच कांहीं हक्क नाहीं असें झटल्यास चालेल. खरोखर पाहिलें असतां निजामावर बाकी काढून एक ताळेबंद तयार केला होता. त्यांत हैदराबाद कंटिंजेंटच्या पगाराचे रुपये इंग्लिश सरकारानीं आपल्या खजिन्यांतून रोख दिले, त्याबद्दल निजामावर ४३ लक्ष रुपये घेणें काढिले होतें. आणि निजाम सरकार आपलें कांहीं घेणें ब्रिटिश सरकारावर आहे झणून झणत होते तें नाकबूल केलें होतें. इंग्रज सरकारच्या घेण्यांत सुमार चौथाई रकम तर व्याजाची होती व तें व्याजही कांहीं दरसाल १२ रुपये शेकड्याचें व कांहीं ६ रुपये शेकड्याचें होतें. निजाम सरकारानें आपलें हें घेणें दाखविलें होतें त्याला व्याज वगैरे कांहीं लावलेलें नसतांही तें इंग्रज सरकारच्या रकमेहून अधिक होतें. तथापि याची बजावाट केली नाहीं एवढेंच नाहीं पण त्या रकमांची कांहीं तपासणीही लार्ड डालहौसी यांच्या कारकीर्दींत झाली नाहीं. पुढें लार्ड क्यानिंग साहेब गवरनर जनरल यांनीं निजाम सरकारच्या रकमेपैकीं मुख्य भाग सिकंदराबाद व जालना येथील अपकारींचे उत्पन्न हा त्यांस कांहीं मिळावा असें केलें.

निजाम सरकारचें बोलणें कबूल केलें नाहीं आणि निजाम सरकारास त्रास देऊन व धिक्कार करून यांची अप्रतिष्ठा मांडिली. निजाम सरकारच्या हिशेबानें जे पैसे मुळींच देणें नव्हते ते पैसे लार्ड डालहौसी साहेब निजाम सरकारास मागू लागले व ते असें सक्तीनें कीं यांनीं निजामास खुद्द पत्र लिहिलें त्यांत असा मजकूर होता कीं तहनाम्याप्रमाणें कंटिंजेंटचा खर्च चालविण्यास तुह्मी बांधले गेलेले आहा. तुह्मी पैसा देण्याचें टाळल्यास तुमचे स्वातंत्र्यास धक्का बसेल. व ब्रिटिश सरकार मनांत आणील तर लागलेंच तुह्मास चिरडून टाकील. त्याच पत्रांत निजाम सरकारास असेंही लिहिलें होतें कीं, आरबांची निष्कारण फौज तुमचे संग्रहास आहे व जिनमुळें तुमचें कर्ज दुणावत आहे ती तुह्मी काढून टाकावी. आणि आमचे कर्जाचे फेडीकरितां तुमचे खजिन्यांत आज पैसा नसेल तर या पत्रासोबत मुलुखाची यादी लिहिली आहे तितका मुलुख आमचे स्वाधीन करावा.

हें केवळ नक्त द्रव्याचे मागणें होतें- सन १८५१ सालीं जेव्हां वरील प्रकारच्या मजकुराचें निजाम सरकारास पत्र गेलें तेव्हां यांनीं पुष्कळ पैसा देऊन अडचणींतून आपली मोकळीक करून घेतली. पुन्हा सन १८५३ सालीं असाच तगादा लागला व त्या वेळीं निजाम सरकार पैसे देते तर यांचा मुलुख न जाता; परंतु त्या वेळीं त्यांच्या खजिन्यांत पैसा नव्हता व नामदार गवरनर जनरल साहेबांनीं थांबावयाचें नाहीं असा मोठा नेट लाविला. कांहीं मुदतीनें पैसा भरतों असें निजाम सरकार झणत होते इतक्यांत एकदम हुकूम आला कीं, देखतपत्र तहनाम्यावर सही केली नाहीं तर ब्रिटिश फौजेला चाल करून येण्याविषयीं हुकूम दिला जाईल व तो जो मुलूख द्यावयाचा आहे त्याजवरच जाईल असें नाहीं. तर हैदराबादेवर चाल करून येईल. तेव्हां निजाम व यांचे सल्लागार यांनीं पाहिलें कीं, आपणापुढें आतां दोन गोष्टी आहेत एक तहनाम्यावर सही करावी अगर पदभ्रष्ट व्हावें. त्या वेळीं निजाम सरकारची व्यवस्था चांगली नव्हती व हैदराबादेचा बंदोबस्त अलीकडे १० वर्षांत नवाब सर सालरजंग यांचे कारकीर्दींत आहे तसा नव्हता. झणून यांनीं अधिक प्रसंगाचा कोणताही विच्यार केला नाहीं. व निमुटपणें तहनाम्यावर सही केली.

कंटिंजेंट फौजेचा खर्च निजाम सरकारानीं दिलाच पाहिजे असें सन १८५१ सालीं ज्या कागदपत्रावरून लार्ड डालहौसी

सी साहेब ह्मणत होते तेच कागदपत्र मनन करून पाहिल्या नंतर पूर्वींप्रमाणें त्यांचें मत न राहून खऱ्याकडे जरा वळलें होतें असें त्यांच्याच हातच्या लेखावरून दिसून येतें हें पाहून सर्वांस मोठा अचंबा वाटेल यांत संशय नाहीं. सन १८९३ सालीं एके लेखांत त्यांनीं असें ह्मटलें आहे कीं हल्लींचे प्रकाराप्रमाणें कांटिंजेंट फौज निजामाकडून चालविण्याचा हिंदुस्थान सरकारास सन १८०० च्या तहनाम्यांतील शद्बांवरून अथवा अर्थावरून कांहीं हक्क नाहीं. तसेंच पुन्हा त्याच लेखांत त्यांनीं आणखी असें ह्मटलें आहे कीं, सन १८०० च्या तहनाम्याबरहुकूम लढाया संपल्या नंतर सन १८१७ पासून आजपर्यंत निजामानीं कंटिंजेंट फौज ठेविली आहे असें उत्तर रेसिडेंट साहेबांनीं पाठवावें असें त्यास मी आपले इमानदारीला स्मरून कधीं सांगणार नाहीं. कारण तहनाम्यांत तसा उल्लेख नाहीं. दुसरे एके ठिकाणीं ही लार्ड डालहौसी साहेबानीं कबूल केलें आहे कीं कंटिंनेंटला जी आज स्थिति आहे ती केवळ निजामाच्या सोसकपणामुळें आहे.

आतां पहा ! लार्ड साहेबास विच्यार पूर्वक व भलेपणानें जें वाटलें तें त्यांनीं निजाम सरकारास कळविलें आहे काय ? नाहीं. तें कौंसलच्या खोलींत गुप्त लिहून ठेविलें आहे. आणि सन १८९३ सालच्या तगाद्यांत त्यांनीं मागील प्रमाणेंच धिटाईच्या गोष्टी व भयंकर भाषा यांचा यथेच्छ उपयोग केला त्यांत काडीमात्र कमी केलें नाहीं. तेव्हां निजाम सरकारानें प्रसंग पाहून कांहीं एक तक्रार न करितां तहनाम्यावर सही केली.

याजकरितां अशा प्रसंगीं एकादें वरिष्ठ कोर्ट असणें अवश्य होतें ह्मणजे तें हिशेब पहातें, दोन्ही बाजूच्या गोष्टी ऐकून घेतें व कोणाचें ह्मणणें रास्त व न्याय्य आहे तें पाहून शांततेनें फैसला करतें. तेणेंकरून कोणासही दुःख अथवा जुलमाचा परिणाम भोगावा न लागता.

याप्रमाणें हैदराबादेकडे त्या वेळीं लष्करी खात्यांत मेजर इव्हान्स बेल या नावाचे जे आफिसर होते त्यांनीं दुसऱ्या कित्येक गोष्टी सांगण्यांत ही गोष्ट सांगितली.

## शाळांकडील इन्स्पेक्टर.

शाळाखात्याकडे इन्स्पेक्टरची एक नेमणुकी जागा आहे. ती उत्तम लोकवासी डा. सिंक्लेर साहेब यांचे मरणापासून रिकामी आहे. मागेंही रेवेरेंड एटकिन साहेब मरण पावल्यामुळें ही जागा बहुत दिवस रिकामी होती व आतां कायमची कमी करणार कीं काय ? असा संशय होता परंतु हिंदुस्थान सरकारानें ती जागा पुन्हा भरावी असा ठराव केला व ती नेटिवास द्यावी असेंही ठरविलें. या नेटिवांच्या शुभेच्छेबद्दल आह्मी हिंदुस्थान सरकारचे आभार मानितों. आतां या जागेचा पगार पूर्वींप्रमाणें राखिला असता, निदान थोडा कमी केला असता, तर फार चांगलें झालें असतें. पण तो फार कमी ह्मणजे ३०० रुपये केला व दर दोन वर्षांनीं ५० रुपयेप्रमाणें ८ वर्षांत ५०० पर्यंत वाढवावयाचा असा ठराव केला आहे. हें थोडें गौण झालें. अस्तु. जागा अगदीच न भरते या पेक्षां केली ही गोष्ट फार चांगली केली असें ह्मणून आह्मी त्यांचे पुन्हा आभार मानितों.

आतां या जागेवर नेमणूक कोणाची अजून केली नाहीं व ती कां राहिली? याबद्दल कांहीं समजत नाहीं. जागा नेटिवास द्यावयाची त्यापक्षीं ती रा. रा. श्रीराम भिकाजी यांस निश्चयें मिळावयाची असा आबाल वृद्धांचा सिद्धांत आहे, व त्यास सरकारी अधिकाऱ्यांचीही संमति आहे असें ऐकतों. तर त्याप्रमाणें मेहेरबान रेसिडेंट साहेब श्रीरामपंत यांची नेमणूक या जागेवर लवकर करतील व साऱ्या वऱ्हाड प्रांताला संतोष देतील असें आह्मी इच्छितों.

नेमणुकीकरितां पुन्हा विच्यार करून पाहिलें तर साऱ्या वऱ्हाडांत याहून अधिक लायक दुसरा मनुष्य आढळणार नाहीं. व बाहेरून कोणी नवा आणणें रास्त होणार नाहीं. कारण आज ९ वर्षें २०० रुपये पगारावर यांनीं उत्तम काम केलें. २६० रुपयांवरही हायस्कूलाचेंही काम पसंत केलें आणि आतां ३००ची एक जागा कधीं नव्हत झाली असतां ती त्यांनां मिळू नये याप्रारखें वाईट दुसरें कांहीं नाहीं.

## वऱ्हाड.

मि. आवट साहेब वऱ्हाडचे स्यानिटरी कमिशनर यांनीं या महिन्याचे १५वे तारखेपासून २ महिन्यांची रजा घेतली आहे.

कर्नल अलार्डाइस साहेब जुडिशियल कमिशनर उन्हाळ्याचे बरेच दिवस बाहेर होते ते शुक्रवारीं संध्याकाळीं उमरावतीहून एथें आले.

दिवाण सर सालरजंग साहेब बहादुर यांजबरोबर त्यांचे आप्त नबाब निजाम यारजंग व यामहजंग गेलेहोते त्यांस तिकडील हवा न मानवल्यामुळें ते परत यावयास निघाले असें समजतें.

देव मामलेदार रा. रा. यशवंतराव महादेव वऱ्हाडांत आले व आज येथें येणार, उद्या येणार अ[illegible] दिवस अकोल्यांत बातमी [illegible] कांहीं तथ्यांश दिसत नाहीं. नागपुरचे एक गृहस्थ विंचुरास त्यांचे दर्शनास गेले होते ते परत आलेले तीन दिवसांपूर्वीं आह्मांस भेटले त्यांनीं सांगितलें कीं ते अजून विंचुरास आहेत. व वऱ्हाडांत येण्याची तें[illegible] संभूत वार्ता नाहीं. [illegible] मराठ

क्या. फिटझरल्ड साहेब वाशिमचे डिपुटी कमिशनर रजेवर गेले होते ते येथें येऊन वाशिमाकडे गेले व मि. नौलिस साहेब शुक्रवारीं परत आले.

मि. लायल साहेब ने मागें इकडे कमिशनर असून हल्लीं रजपुत संस्थानांत हिंदुस्थान सरकारचे एजेंट आहेत त्यांनीं ६ महिन्यांच्या रजेचा अर्ज केला आहे व त्याकरितां विलायतेस लिहून गेलें आहे. तिकडून रजा मंजूर झाल्यावर ते विलायतेस जातील. व त्या जागेवरचे पूर्वींचे एजंट सर लुइस पेली बडोद्यास प्रसिद्धीस आलेले पुन्हा मुक्रर होतील असें ह्मणतात.

वऱ्हाडचें शाळापत्रक याचा पहिला अंक छापून प्रसिद्ध झाला. हें पुस्तक निबंध मालेच्या जुन्या साच्या एवढें असून पृष्ठें १६ आहेत. शिक्षकांच्या उपयोगाकरितां हें आहे असें उपोद्घातांत लिहिलें आहे. यांत कांहीं लहान लहान निबंध लिहून वर्तमानें लिहिलीं आहेत व शाळाखात्याच्या जाहिराती लिहिल्या आहेत. हाच क्रम दरमहा चालेल. ज्ञानसंग्रह बंद झाल्यापुढें शाळाखात्याकडून हें लोकोपयोगी काम सुरू झालें यावद्दल आह्मांस संतोष वाढतो व आह्मी रा. सा. नारायण भाई यांची या उपक्रमाबद्दल स्तुति करितों.

वऱ्हाडांत हायस्कुलें २, मिडलक्लास स्कुलें ४१, ट्रेनिंग कालेज १, मराठी शाळा ३४२, हिंदुस्थानी शाळा ४५ आणि मुलींच्या शाळा २२ आहेत असें शाळापत्रकावरून कळतें.

कांहीं ठिकाणच्या शाळांस कांहीं सभ्य गृहस्थांनीं गुदस्त सालांत बाक्षिसें दिलीं त्यांची एक यादी शाळापत्रकांत प्रसिद्ध झाली आहे. तिजवरून समजतें कीं इलिचपुरचे लोकांनीं ५१ रुपये रोख दिले. कारंजे येथील लोकांनीं पुस्तकें घड्याळ व भुगोलाकरितां सुमार १०० रुपये दिले. मि० इलियट साहेब यांनीं वाशिमचे शाळेला २५ रुपयांचें घड्याळ दिलें, नागपुरचे गोंड राजानीं अकोल्याचे शाळेला १५रु. दिले; मि० दस्तुर बहिमनजी साहेब असिस्टंट कमिशनर यानीं बरवट येथील शाळेंतील मुलीला साडी चोळी दिली, क्या० मेकंजी साहेब यांनीं मोर्शीच्या शाळेला पुस्तकें दिलीं तसेंच उमरावतीचे व बाळापुरचे तहशिलदार, शाळाकमिट्या एक दोन देशमुख, व एक पाटील यानीं कांहीं शाळांकरितां दिलें आहे तें पाहून आह्मांस संतोष वाटतो.

रा. रा. परशराम सखाराम माजी क्लार्क आफ धि कोर्ट यांची चवकशी ता. २८ जून रोजीं होणार होती ती तकूब ठेवून ता. ८ जुलै नेमिली.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं अकोल्याचे माजी क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. विष्णु सखाराम बापट हे बरेच दिवस बेकार राहिले पण शेवटीं त्यांस १५० रुपये पगाराची बडोद्यास मे. काजी शाबुद्दीन सा० रिविन्यू क० यांचे हेड क्लार्कची जागा मिळाली. त्यांनां येथें ज्या डिपुटी कमिशनरांनीं राजिनामा देण्यास सांगितलें होतें त्यांनींच त्यांच्या निर्दोषीपणाची खात्री करून घेऊन त्यांस उत्तम सर्टिफिकीट दिलें. हा त्यांचा देखील गुण वीं ध्यावयाचा. अस्तु. आमचे इकडील दोघा ही क्लार्क आफ धि कोर्टांस बडोदा राजधानींत थारा मिळाला. व जागाही चांगल्या भूषणाच्या मिळाल्या तर त्याप्रमाणें त्या मराठीशाईंत ते आपल्या हुशारीचा योग्य उपयोग करून उत्तम नावलौकिकास चढतील असें आह्मी इच्छितों.

पर्जन्यकाळ अजून लागत नाहीं. लोक अतिशय काळजींत आहेत. दाह अतिशय होतो. बाहेर कोठें कोठें तुरळक वृष्टी झाल्याचे कळतें. काल एथेंही थोडा पाऊस पडला. परमेश्वरानें कृपा करून सर्वत्र लौकर पर्जन्य वृष्टी चांगली करावी.

एथील लयब्ररीला १० रुपये म्युनिसिप्यालिटीकडून महिना वर्गणी मिळत होती ती कमिटीनें उत्पन्न कमी ह्मणून बंद केली यावद्दल आह्मांस वाईट वाटतें. आमचा अभिप्राय आहे कीं ग्रामस्थांनीं याजबद्दल शुक्रवारीं जनरल कमिटी भरणार आहे तिजपुढें पुष्कळ सह्यांचा एक अर्ज वर्गणी बंद न करण्याविषयीं पाठवावा. ह्मणजे डि. क. साहेबांस दया येऊन व बहुमत पडून कदाचित कार्य होईल.

एथील पोलिस सुपरइंटेंडेंट मेजर जेमिसन ह्यांचा राजीनामा मंजूर झाला असें समजतें.

एथील ट्रेनिंग कालेजांतील मराठी असिस्टंट शिक्षकाची जागा ५० रुपयाची झाली व त्या जागेवर पातुर्डा इं. म. स्कूलचे हेड मास्तर रा. मार्तंड कृष्ण पैंठकर ह्यांस नेमिलें.

सर सालरजंग यांचीं कामें करून देण्याविषयीं विलायतेंतील पुष्कळ लोकांनीं त्यांजकडेस अर्ज केले आहेत व एका नामांकित गृहस्थानें, वऱ्हाड प्रांताचें प्रकर्ण पार्लमेन्ट सभेपुढें आणण्याविषयीं व तो प्रांत परत मिळण्याविषयीं मी खटपट करितों असें त्यांस विचारलें आहे असें मुं. ग्या. चे लंडन येथील बातमीदाराचे समजण्यांत आलें आहे.

कारंजाचे वकील रा. रा. बाळकृष्ण नाईक पुढे काल रोजीं जुडिशियल कमिशनर साहेबांपुढें झाल्या चौकशींत निर्दोष ठरले. आतां त्यांची सनद त्यांस मिळेल. त्यांनीं मि० लिथ साहेब बारिस्टर आणिले होते.

[illegible] २ लोका[illegible] [illegible] ल्याबद्दल [illegible] आत्यांत नवीन चार जागा झाल[illegible] लिस [illegible] समजतें. त्या पैकीं ३ जागा ४० रुपयांच्या व एक जागा ७५ रुपयांची केल्याचें समजतें. रा. रा. जयरामपंत स० र० यांस आजपर्यंत १०० रुपये मिळत होते त्यांस आतां ७५ [illegible] हेण। मि[illegible] मनुष्य लिळतील असें कळतें.

[illegible] र्त.

[illegible] ३ वार्षिक जत्रा भरल्या [illegible] पोलिसानीं बंदोबस्त चांगला ठेविला मनुष्यांचें आणि त्यांच्या मालाचें संरक्षण चांगलें केलें. जत्रांत ४९ चोऱ्या झाल्या त्यांतून २९ धरल्या गेल्या.

[illegible] टी हे पोलिस हें उमरावती आणि [illegible] त्याचा [illegible]

गुलाम बाबाची कापडाची गिरणी सुरत येथें सुरु व्हावयाची होती ती गेल्या आठवड्यांत सुरू झाली. या समारंभास मे. नर्डउड साहेब जज्ज हेही गेले होते.

बडोद्याची लायब्ररी चांगल्या स्थितींत आणण्याकरितां गायकवाड सरकारानीं १०००० रुपये दिल्याचें समजतें.

फ्रान्सच्या ब्यांकेंत आज ५०० टन सोनें शिलक आहे असें एके ठिकाणीं लिहिलें आहे. हें आगगाडींत भरलें तर पहिल्या प्रतीच्या २० एंजिनांचें ओझें होतें. १,५०,००० पौंडाचा एक टन या मानानें ५०० टनचे ७,५०,००,००० पौंड होतात आणि एक पौंड सोन्याची किंमत ७०० रुपये धरली तर रुपये ५२,५०,००,००,००० होतात.

मद्रास एथें रजपूत जातीचा एक मनुष्य आला असून त्याची उंची ७ फूट ६ इंच आहे पण या मानानें तो सशक्त नाहीं.

सिमला एथील आपखुषीनें लढाईचें काम शिकणारां पैकीं उत्तम निशाण मारणाऱ्या एकास जयपूरच्या महाराजांनीं १५० रुपये किमतीचा एक पेला बक्षीस दिला.

स्मिथ नावाच्या एका युरोपियनास बंगाल इलाख्यांत खोटे चेक चालविल्याबद्दल कित्येक वेळ पकडलें असून कायद्याच्या तकरारीवरून तो सुटला पण आतां ते चेक त्याणें चालवू नयेत असा त्यास हुकूम झाला आहे.

टर्कीच्या प्रधान मंडळांत कांहीं मतभेद झाला आहे असें ह्मणतात.

पोर्तुगालच्या राजानें प्रिन्स आफ वेल्स यांस जुन्या मदीरेच्या १००० बाटल्या नजर केल्या.

सियाम सरकारानें आपल्या राज्यांत तारायंत्र करण्याचा ठराव करून त्याप्रमाणें त्या कामाकरितां कित्येक नेमणुकाही केल्या.

फ्रान्सांतून हिंदुस्थानात येणाऱ्या डाकेच्या पत्रांचें हशील येत्या पहिल्या तारखेपासून ४ पेन्स होणार आहे.

बंगलोर एथें ४७,५०० रुपये खर्च करून मेयो साहेबांचे नावानें टाऊनहाल बांधणार आहेत.

हल्लींचे भाड्याचे दरानें चांगलें उत्पन्न होत नाहीं ह्मणून मद्रास रेल्वे पहिल्या क्लासाचें भाडें वाढविणार आहे.

१६ वा लुइस राजा याणें टिपू सुलतान यास नजर ह्मणून दिलेला एक उत्तम प्रकारचा पेला थोड्या दिवसांवर विलायतेस विकला गेला. हा पे[...] [...]पट्टण च्या लढाईंत गार्डन नावाच्या [...] इंग्रज लष्करी मनुष्यानें उपटला व ते[...] त्याच्या घरांत आला. हा चंबूच्या आकृतीचा असून त्यास एक तोटी आहे याची उंची १८ फूट असून चित्र विचित्र व नक्षीदार [...] १४९९० रुपयांस विकला!

[...]न्तिसा कशा रीतीनें वि-
[...] न त्याची काय
यणदार[...] अ[...] द.
हिवाटदार शो[...] य
कडून नोटिस देण्य[...]
वारींचे पेव मौजे मजकु[...]
जवारी तीन खंडी तुली [...]
रुपये या भावानें गेल्या भा[...]

१८५० सालपर्यंत ३४,८५,००० रुपये दिले. पुढें १३ वर्षें दरसाल साडेतीन लाख प्रमाणें दिले व सन १८७० साल अखेरपर्यंत एकंदर ७४॥ लाख रुपये कर्जाचे फेडीबद्दल भरले.

मद्रास इलाख्यांत सुमारें ३७०० ब्राह्मण आणि सुमारें ३००० क्षत्रिय बाटून ख्रिस्ती झालेले आहेत. ह्मैसूर प्रांतांत १८००० लोक बाटून ख्रिस्ती झालेले आहेत.

एका मनुष्यास सर्प चावल्यावरून त्या मनुष्यास राग येऊन तो उलट त्या सापास इतक्या जोरानें चावला कीं तो सर्प लगेच मरण पावला. व त्या मनुष्यास विषाची कांहीं एक बाधा झाली नाहीं.

ग्वालेर एथून आलेल्या तारेवरून कळतें कीं महाराज सिंदे सरकार यांस मुलगा झाला होता तें खोटें असून कन्या झाली.

एका युरोपियनानें आपल्या पोटच्या पोरीवर जुलूम केला ह्मणून त्यास हायकोर्टानें १८ महिन्यांची सक्त मजुरीची कैदेची शिक्षा दिली.

ब्रह्मदेशांत आतांशीं मातीचें तेल पुष्कळ सांपडूं लागलें असून यायनेंाग या ऊन्ड येथें याच्या १५० विहिरी आहेत.

मांजराच्या दंशापासून मृत्यू— एक मनुष्य मांजरा बरोबर बागडत असतां मांजरानें त्यास चावा घेतला त्यामुळें जखमेंतून बराच रक्तस्राव होऊं लागला त्या आवेशांत तो त्या मांजरास ठार मारणार इतक्यांत त्याच्या बायकोनें त्यास न मारण्या विषयीं विनंती करून तें मांजर माझ्या भावास नजर केल्यास तो घेऊं इच्छितो. इतक्यांत तिचा भाऊ आला त्याणें तें मांजर घेतलें तेव्हां त्यालाही मांजरानें चावा घेतला व तीं दोघेही मनुष्यें मरण पावलीं. असें होण्याचें कारण तें मांजर सापाचें मांस खात असे. व. मि.

एक राशिअन पत्रकर्ता ह्मणतो कीं युरोपांतील सर्व राष्ट्रांस पांच वर्षांत लढाईचा प्रसंग येईल.

युनाइटेडस्टेट्समधून एका सालांत २१८१२८४० रुपयांची बीर नावाची दारू परदेशीं गेली त्या पैकीं एक तृतियांश हिंदुस्थानांत आली.

राणी साहेबांनीं चक्रवर्तिनी किताब घेतला व ह्या मोठ्या मानमरातबाप्रमाणें त्यांत खर्च केला पाहिजे ह्मणून त्यांची नेमणून वाढणार आहे असें ह्मणतात.

ब्राऊन नावाचे अमेरिकेंतील एका मनुष्यानें एक गाय डयूक आफ डेवनशायर यांजपासून ३१,५०० रुपयास विकत घेतली.

विलायतेस एक दररोज प्रसिद्ध होणारें पत्र लवकरच निघणार आहे व त्यांत हिंदुस्थान संबंधानें सर्व विषय येणार आहेत असें इंडियनमिररवरून समजतें

मुंबईस पर्जन्य आजपर्यंत सुमारें १२ इंच पडला. वाळकेश्वरीं पटकीच्या आजारानें कांहीं मनुष्यें मेल्याचें कळतें शहरांत रोगराई नाहीं.

रा. रा. शिवाजीराव ( बडोद्याचे ) नानासाहेब खानविलकर हे हल्लीं कुठें येथें नाहींत कोठें अज्ञातवासास गेले असें ह्मणतात.

पुणें पेथील प्रदर्शन पहाण्यास मुंबईचे कमांडर इनचीफ हे गेले होते. प्रदर्शनांतील पदार्थ पाहून त्यांनीं संतोष झाल्याचें दर्शविलें व ह्या प्रदर्शनाचे ते वार्षिक वर्गणीदारही झाले असें समजतें.

पी. आणि ओ. कंपनीचे आस्ट्रेलिआ नांवाचे आगबोटीवर पुन्हा चिनांत पाठविण्याचें लढाईचें कांहीं सामान सांपडलें तें पकडलें आहे.

कऱ्हाड येथें एक पशुयज्ञ झाला त्याचा पंचवीस रुपयांत खर्च उरकला !

भिंवडीचा एक मनुष्य कांहीं चमत्कारिक गोष्ट कळवितो व त्याविषयीं पक्का शोध होऊन त्यांतील खरे टिपणाविषयीं स्पष्टीकरण होणें जरूर आहे. तो ह्मणतो कीं, भिंवंडीपासून एक कोसावर एक विहीर खणली आहे तिचें पाणी चांगलें गोड व पाचक असून पिणाराच्या शरिरांतील रक्त शुद्ध करणारें आहे. या पाण्यावर तयार होणारीं केळीं, अंजीर वगैरेही फार च रुचिकर होतात. ज्यांच्या शरिरांतील रक्त नासून ज्यांस रक्त विकाराचे रोग झाले होते अशा दहा पांच लोकांस या पाण्यापासून गुण आला आहे. ने. ओ.

---

## सूर्याच्या किरणांचा यंत्राकडेस उपयोग

शंभर वर्षांमागें ज्या गोष्टी अशक्य व असंभवनीय अशा वाटल्या होत्या त्या हल्लीं सिद्ध झाल्या असून व्यापार, जलप्रवास व निरनिराळ्या देशांचा परस्पर संबंध इत्यादि कामांत त्यांचा फार उपयोग होत आहे. वाट साहेबानें वाफेची शक्ति शोधून काढून तिचा यांत्रिक कामांत कसा उपयोग होतो हें सिद्ध करून दाखविलें. वाफेच्या यंत्रानें हजारों कोस गाडी चालविणें, वाफेनें चालणाऱ्या आगबोटी करणें, व सर्व प्रकारचीं यंत्रें वाफेच्या योगानें चालविणें, वगैरे कित्येक गोष्टी त्याकाळीं कोणाच्या मनांत तरी आल्या असतील ? एकाद्याचा त्यावेळीं असला तर्क धांवला असता तर तो त्याकाळीं उपहासास्पद झाला असता. तसेंच कलकत्त्याची बातमी पंधरा मिनिटांत तारायंत्रद्वारें विलायतेस पोंचेल अशी त्यावेळच्या लोकांच्या मनांत कल्पना देखील आली नसेल. परंतु या सर्व गोष्टी सिद्धीस गेल्या असून त्यांपासून होणाऱ्या उपयोगाचा आपण हल्लीं अनुभव घेत आहोंत. मर्त्यलोकाहून स्वर्गलोकीं देव विमानांतून [...] असल्याचें पुराणांत वर्णन [...] जर विमानें ( बलून )लोकांच्या दृष्टीस पडलीं नसतीं तर पुराणांतील वर्णन कदाचित कल्पित कादंबरी सारखें वाटलें असतें. परंतु हल्लीं जीं विमाने उडतांना आमच्या दृष्टीस पडतात त्या[...]रून त्याकाळींही अशाच प्रकारचीं [...] असतील असें एक अनुमान होतें. विमानें वर उडविण्याची युक्ति चांगली साधली आहे परंतु तीं पाहिजे तेथें व पाहिजे त्यावेळीं सुखरूप खालीं उतरवितां येत नाहींत. विमानें सुखरूप खालीं उतरवितां येतील अशी युक्ति शोधून काढण्याकडेस युरोप अमेरिकेंतील कित्येक लोकांचीं मनें लागलीं आहेत. त्यांचा शोध सफल झाला असतां लांब लांबचे देश आंगण ओसरीसारखे वाटूं लागतील. व्यापारांत विमानांचा विशेष उपयोग होईल या विषयीं आज कांहींच सांगतां येत नाहीं; परंतु डांक व प्रवास फारच थोड्या काळांत करतां येईल यांत संशय नाहीं. याचप्रमाणें सूर्यापासून जी उष्णता उत्पन्न होते तिचा यंत्राकडे उपयोग करितां येईल अशी युक्ति शोधून काढण्याविषयीं युरोपांतील कित्येक विद्वानलोक झटत आहेत. स्विडनदेशांतील एरिक्सन नांवाच्या एका इंजिनेरानें सूर्याच्या किरणाच्या योगानें वाफ उत्पन्न करून आगगाडीचें यंत्र चालविलें त्याचप्रमाणें फ्रान्स देशांतील एका शिल्पशास्त्रज्ञानें एक आगगाडीचें यंत्र तयार करून त्यांत वाफ उत्पन्न करण्याकरितां कोळशांचा उपयोग न करतां सूर्याच्या किरणांचा उपयोग करतां यावा अशी तजवीज केली आहे, सूर्याच्या उष्णतेची प्रखरता पहाण्याकरितां त्यानें फक्त किरणाच्या सहाय्यानें कथील, शिसें व जस्त हीं वितळून पाहिलीं आहेत. कथील दोन मिनिटांत, शिसे पांच मिनिटांत व जस्त सहा मिनिटांत वितळतें असें त्यानें सिद्ध केलें. याचप्रमाणें मांस, भाज्या, फळे, चहा व काफी वगैरे किरणाच्या सहाय्यानें चांगलें शिजून विस्तवावर शिजल्यापेक्षां अधिक रुचकर असतात असें तो शिल्पज्ञ ह्मणतो. याप्रमाणें विस्तवाचे जागीं सूर्याच्या किरणांचा उपयोग करण्याची युरोपांतील कांहीं लोक योजना करीत आहेत. यंत्रशास्त्र व दुसरीं कांहीं शास्त्रें अजून नूतनावस्थेंत आहेत. यंत्रशास्त्र पुर्ण दशेस पोंचल्यावर काय काय चमत्कार दृष्टीस पडतील याची कल्पना करवत नाहीं. ने. ओ.

---

## नोटिस

---

महमद हासन वलद महमद हुसेन मुसलमान वस्ती कसबे पातुर शेखबाबु तालुके बाळापुर यांस मनु वलद दशरथ नानकशाई वस्ती कसबे मजकूर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तू दोन कर्ज रोखे लिहून देऊन १४ रुपये रोख व ॥ पांच मण जवारी घेतली आहे व मुदतीप्रमाणें दोन्ही रकमाचा उलगडा करारा बरहूकूम केला नाहीं सबब नोटिस दिली आहे तर नोटिस पावतांच मुद्दल रुपये १४ व कराराप्रमाणें आज पावेतों व्याज, तसेच जवारी पांच मण व तिची सवाई किंवा बाजार भावानें जवारीची एकंदर किंमत असे नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत द्यावे न दिल्यास दिवाणी कोर्टांत दावा करून खर्चासुद्धां सर्व रकम द्यावी लागेल. व या नोटिसीचा खर्च द्यावा लागेल कळावें तारीख २६ जून सन १८७६ इ.

( सही ) मनु वलद दशरथ नानकशाई वस्ती पातुर शेखबाबु
दस्तुर खुद्द

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. म.

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोला रविवार ता० ९ माहे जुलै सन १८७६ इ० अंक २८

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| कुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY.

## ग्रेट इंडियन पेनिनूसुला रेलवे.

NOTICE

## नोटिस

CLOSING OF THE KHAMGAON [ STATE ] RAILWAY.

## खामगाव (सरकारी) रेलवे बंद करण्याविषयीं.

सरकार हुकुमावरून असें जाहिर करण्यांत येतें कीं, खामगाव सरकारी रेलवे तारीख १५ माहे जुलै सन १८७६ इसवी रोज शनिवार या दिवशीं व त्या दिवसापासून पुढें दुसरा हुकूम होईपर्यंत बंद करण्यांत येईल.

याकरितां तारीख १४ शुक्रवारच्या नंतर खामगाव व जी. आय. पी. रेलवेचे स्टेशन जलंब यांचे दरम्यान आगगाड्या जाणार येणार नाहींत; आणि शनिवार तारीख १५ या दिवशीं व तेव्हांपासून पुढें या स्टेशनाकरितां किंवा थेट दुसरीकडे जाण्याकरितां टिकिटा देण्याच्या सर्व व्यवस्था रहित आणि रद्द केल्या आहेत.

हेनरी कांडर,

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई ता० ४ माहे जुलै सन १८७६ इसवी.

## नोटिस

जानजी वलद नावजी मुरे रहाणार निमगाव तालुके मलकापुर यास नारायणदास बनसीलाल दुकान निमगाव वहिवाटदार शाळकराम सादलसिंग याज कडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे जवारीचे पेव मौजे मजकुरीं आहे त्यांतील जवारी तीन खंडी तुह्मी दर खंडीस २० रुपये या भावानें गेल्या भाद्रपद मासीं आह्मास विकत दिली व आह्मी तुह्मास रोख रुपये ६० दिले व तुह्मी पेवाचें तोंड उघडून आमचे नावचें पेवपत्रक तीन खंडीचें त्यांत टाकलें. हल्लीं आह्मांस जवारी काढणें आहे याजकरितां नोटिस पोचल्यापासून १५ दिवसांचे आंत तुह्मी आह्माला जवारी मोजून देण्याकरितां यावें. तुह्मी न आल्यास तिऱ्हाईत मनुष्या समक्ष जवारी काढून उणी आल्यास तुह्मापासून भरून घेऊ व खराब निघाल्यास बाजार भावाप्रमाणें हिशेब करून नुकसानीचे रुपये तुह्मापासून घेऊ. कळावें तारीख ९ जुलै सन १८७६ इसवी.

( सही ) नारायणदास बनसिलाल दुकान निमगाव वहिवाटदार शाळकराम सादलसिंग दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

हैदराबाद.

मिती जेष्ट शुद्ध ७ शके १७९८.

रा. रा. न्यायसिंधु कर्ते यांस:—

वि. वि.— मृग नक्षत्र सुरू झाल्यापासून एक वेळ पर्जन्य पडला त्यावर अद्याप पर्जन्य पडला नाहीं. ऊष्मा विशेष होत आहे. मेघराजाकडे डोळे लागले आहेत. धारणही थोडी कडकली आहे.

हैदराबाद एथील हुजूर बादशाह यांचे आजे समशामतदौला यांजला थोडे दिवसांपूर्वी देवाज्ञा झाली. यांचें वय ९० वर्षांवर होतें. शरीर कटाक्ष असून तरुण मनुष्यांत जितकी ताकद तितकी यांचे अंगीं वसत होती. तमाम शहरांतील सरदार लोक उदासीन पोषाख करून हजर झाले होते व मोठे थाटानें जमियतनिशीं त्यांस मक्का मशीदींत पोहचविलें.

नवाब साहेब सर सालरजंग बहादूर यांनीं आणखी दोन महिन्यांची रजा मागि. तदवावरून मंजूर झाली आहे. शहरांतील तमाम आवाल वृद्ध —— यांचे आगमनाकडे लागले आहेत.

साल मजकुरीं हुजूर पुरनूर बादशाहा यांचा सालगिरा झाला. राजवाड्यांत आरास व रोषनाई फारच उत्तम प्रकारची केलेली असून तमाम सरदार लोक रात्रंदिवस हजर होते. कलवांतिनींचे ताफे तमाम शहरांतील नेले होते त्यांत मराठवडी देशा पैकीं रहिमु बीडकर इचा ताफा नेला होता याचा देखावा नृत्य व गीत व मराठी पेहेराव वगैरे पाहून संतोष झाला. पुढें आणखी तीन चार दिवस ठेवून घेऊन शेवटीं चारशें रुपये रोख व साडेतीनशें रुपयांचा दुपट्टा बक्षीस देऊन रवाना केलें व हमेशा येण्याविषयीं हुकूम फर्माविला. झालेली देणगी रहिमूचे गुणायोग्य होती. मर ठवडी देशांतील लोकांचा येथ पर्यंत हा पहिलाच रिघाव. पत्र विस्तारास्तव पुरें करितों. कळावें.

एक हैदराबादकर

'रहिवासी'

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य ३ शके १७९८.

## वऱ्हाडांतील पोलिस खात्याविषयीं माहिती.

( सन १८७४ इसवीचा अडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट )

वऱ्हाडच्या पोलिसांत एकंदर लोक २६३४ आहेत. यांतून २२७३ लोकांचा खर्च सरकार खजिन्यांतून, ६० मनुष्यांचा अंशतः रेलवे कडून व अंशतः सरकाराकडून, आणि ३०१ मनुष्यांचा म्युनिसिपल फंडाकडून चालतो. याजमध्यें १० ग्याझेटेड आफिसर आहेत.

पोलिसाला सर |सालांत खर्च रुपये ४६१२७९ रु० लागला. मागील सालीं ४६५२०८ रु० लागला होता.

वऱ्हाडांतील लोकवस्तीच्या मानानें दर ८३० मनुष्यांला एक पोलिस शिपाई संरक्षणार्थ आहे. व देशाच्या लांबी रुंदीच्या मानानें पाहिलें तर सुमार ६। चौरस मैलास एक पोलिस शिपाई आहे. पोलिसांत शेकडा सात दशांश ख्रिस्तियन आहेत. शेकडा ४३ मुसलमान, १८ ब्राह्मण, १३ रजपूत, आणि बाकी इतर जात आहे. नवीन भरती बहुधा मुसलमानाची होते. सेकंड ग्रेड कानस्टेबलचा पगार ५॥। रुपये होता तो आतां ७ रुपये केला आहे तेणेंकरून मनुष्य बरे मिळूं लागले आहेत. पोलिसांत शेतकरी लोकांची भरती होईल किंवा नाहीं याविषयीं सरकार प्रयत्न करून पहाणार आहे. पोलिसांत एकंदर जे लोक आहेत त्यांत शेकडा १० गुदस्त सालीं भरती झालेले आहेत. शेकडा ७४ सुमार दहा वर्षांच्या अनुभवांतले आहेत व शेकडा १६ दहाहून अधिक वर्षांचे नोकर आहेत.

पोलिसापैकीं १२३५ मनुष्यांस हत्यारें आहेत आणि सर्वांस लाकडाचे सोडगे दिलेले आहेत.

या सालांत पोलिसानें आपले अख्त्यारांत गुन्हे धरले ते ७४९१ व त्यांत अपराधी मिळाले ते ८६८९ [illegible] त्यांत १२० मरण पावले, सुटले आणि ट्रान्सफर झाले. १५२१ चौकशीपूर्वी माजिस्त्रेटाकडून सुटले, व ६९८५ मनुष्यांची चौकशी झाली त्यांत ७८६ सुटले, व ६१७० मनुष्यांला शिक्षा झाल्या.

या सालांत चोरीस गेल्या मालाची किंमत १५३०३९ रुपये होती. गुदस्त सालीं २०५१८३ रुपये होती. तींत शेंकडा ३९ प्रमाणें माल मिळाला. गुदस्त सालीं शेंकडा ४२ रुपये व तिगस्त सालीं शेंकडा २५ रुपये मिळाल्या मालाचा आकार होता. गुदस्त सालापेक्षां चालू सालांत चोरीस गेल्या मालांतून सापडलेल्या मालाची संख्या कमी आहे याचें कारण गुदस्त सालीं बुलढाणे जिल्ह्यांत एकाचे ३० हजार रुपयांचे रोखे चोरीस गेलेले एकदम सापडले होते ह्मणून त्यामुळें त्या सालची संख्या अधिक लागली.

या सालीं अति घोर कर्माचे गुन्हे घडले ते:—

खून १७, खुनाचा प्रयत्न १२, दरवड्यांत खून २, चोऱ्यात खून १२, खुनाशिवाय दरोडे ७, रस्तेलूट २१ साधारण चोऱ्या १२ झाल्या.

माजिस्त्रेटाचे हुकूमावरून पोलिसानें गुन्हे पकडले ते १९१२, गुदस्त सालीं पकडले होते २२७१; या सालीं या गुन्ह्याचे संबंधी लोक ३६५९ व गुदस्त सालीं ४९४२ होते. यांतील सुद्धां निमे सुटले व निम्यांस शिक्षा झाल्या. पोलिसाचे पहाऱ्यांतून सालमजकुरीं १४ असामी पळून गेले व त्यांपैकीं २ पुन्हा धरले. गुदस्त सालीं १३ पळाले होते.

या सालीं पोलिसानें आपलें काम चांगलें केलें. पोलिसातील ५२ मनुष्यांची जुडिशियल खात्याकडून चौकशी होऊन त्यांस शिक्षा झाल्या. गुदस्त सालीं ७६ लोकांस शिक्षा झाल्या होत्या. व पोलिस खात्यांतून चौकशी होऊन ५९९ मनुष्यास सालमजकुरीं शिक्षा झाल्या, गुदस्त सालीं ६७५७स झाल्या होत्या. साल मजकुरीं ८४ लोक डिस्मिस केले. गुदस्त सालीं ११२ केले होते. पोलिसांतून एकंदर लोक सालमजकुरीं २८२ कमी झाले, त्यांतून २८ लोकांस पेनशन किंवा बक्षिस मिळाले, १२६ नीं राजिनामे देऊन नोकऱ्या सोडल्या व १९ मरण पावले. व बाकीचे वेगवेगळ्या कारणानीं काढले गेले. २९ लोकांनां डिटेक्टीवचें काम चांगलें केल्याबद्दल बक्षिसें मिळालीं. या वर्षांत एक पोलिस इन्स्पेक्टर ( करीमखान ) व एक चीफ कानस्टेबल [ शिवरामसिंग ] यांस जबरीनें गुन्हा कबूल करविल्याच्या मुकदम्यांत मोठाल्या शिक्षा झाल्या.

पोलिसांत ६०० मनुष्य लिहिणारे वाचणारे आहेत. आणि १३५७ मनुष्य लिहावयास शिकत आहेत.

या सालांत ३३ वार्षिक जत्रा भरल्या त्यांत पोलिसानीं बंदोबस्त चांगला ठेविला व मनुष्यांचें आणि त्यांच्या मालाचें संरक्षण चांगलें केलें. जत्रांत ४९ चोऱ्या झाल्या त्यांतून २९ धरल्या गेल्या.

[illegible]टी चे पोलिस हें उमरावती आणि [illegible] त्याचा [illegible]

अकोला जिल्ह्यांत रेलवेच्या लाइनीवर आहे. त्यांत एक इन्स्पेक्टर, दोन चीफ कानस्टेबल, व ६० कानस्टेबल आणी हेड कानस्टेबल मिळून आहेत. रेलवे लाइनीवर गुन्हे या सालीं ९१ झाले, गुदस्तसालीं ८९ झाले होते. ९० मनुष्य मालमजकुरीं आरोपावरून धरले. त्यांतून १४ सुटले व ३६स शिक्षा झाल्या. या मुकदम्यांतून मालाची चोरी ३९७३ रुपयांची झाली होती तींतून २३६२ रुपयांचा माल सापडला.

रेग्युलर-पोलिसाशिवाय एक छोटेखानि पोलिस आहे त्यास भागले किंवा गाव पोलिस ह्मणतात.त्याची संख्या १०४२ आहे. यांतून १९२ लोकांची-नेमणूक धाऱ्याची आहे. २१ लोकांस कांहीं जमीन व कांहीं पगार आहे. ३० जणांस जमीनी आहेत व बाकीच्यांस २ पासून ५ रुपयेपर्यंत पगार आहे. या लोकांची स्थिति चांगली आहे. व यांस रेग्युलर पोलिसांत घेण्याचा यत्न केल्यास ते खुशी नसतात.

टाकणकर, पारधी वगैरे जाती वऱ्हाडांत घरफोडी चोरी करण्याच्या धंद्यांन ल्या आहेत. राठोड आणि भिना हे लोक याच धंद्यांतले पण मेजर जेमिसनसाहेब अकोल्याचे पोलिस सुपरइंटेंडेंट यांनीं यांवर सक्त नजर ठेवून यांचा पुष्कळ बंदोबस्त केला आहे. व वणजारी लोकांचाही हा धंदा कमी होत चालला आहे असें इन्स्पेक्टर जनरल साहेब लिहितात.

## शेतकीची शाळा

ज्या देशांत विद्या परिपूर्णतेस आली आहे, व सर्व प्रतीचे लोक ज्ञानसंपादनार्थ झटतात तेथें अनेक विषयांच्या परोपरीच्या शाळा असतात व त्यांत अभ्यास करण्याच्या योगानें लोक ज्ञानवान, उद्योगी, व श्रेष्ठ होतात हें इंग्लंड देशाचा हल्लीं जो क्रम आहे व त्याचें श्रेष्ठत्व साऱ्या पृथ्वीवर आहे त्याकडे लक्ष्य दिलें असतां सर्वांस सहज कळून येईल.

आपल्या देशांत शाळांचा विशेष उपक्रम झटला ह्मणजे लिहिण्या वाचण्याच्या विद्याशाळा एवढाच आहे. सुतार कामाच्या शाळा, लोहार कामाच्या शाळा, गाण्याच्या शाळा, शास्त्रीय विषयाच्या निरनिराळ्या शाळा तिकडील सुधारलेल्या देशांत जशा अनेक आहेत तशा आपल्या इकडे अजून झाल्या नाहींत. सुधारणेच्या कामीं आपला देश अजून बाल्यावस्थेंत आहे ह्मणून या कामास उशीर आहे. पण परमेश्वराचे कृपेनें तसाही प्रकार आपल्या देशांत कालांतरानें होईल अशी चालल्या क्रमावरून आपण उमेद बाळगावी.

सदर्हू शाळां पैकीं शेतकीची एक शाळा आपले देशांत व्हावयाचा नेम ठरला आहे त्याची माहिती टा० आफ इं० वरून कळते ती अशी:—

मद्रास सरकारचे सांगण्यानें सिदापेठ येथें शेतकीची शाळा होणार आहे. या विद्यालयांत शेतकीचें शास्त्रीय ज्ञान व या देशचें व्यावहारिक ज्ञान हीं दे शिकविणार. सिदापेठ येथें सरकारानें नमुन्यासाठीं शेती केली आहे तेथेंच या शाळेच्या इमारती होणार. ह्मणजे खेड्यापाड्यांतील मुलें तेथें शिकावयास व रहावयास ही येतील. ह्मणजे शेतांतून नित्य नवें नवें काय होईल तें सर्व त्यांचे पहाण्यांत येईल. व शेती कामाला जीं हत्यारें लागतात तीं करण्यास व त्यांची दुरुस्ती करण्यास वगैरे त्यांस शिकविलें जाईल. हें खातें जरी शाळाखात्याला जोडलें जाईल तरी त्याची विशेष व्यवस्था सरकारी फार्मचे सुपरइंटेंडेंट मि० राबर्टसन यांकडे दिली जाईल. ह्मणून कोणा विद्यार्थ्यांस शिकावयास जाण्यासाठीं अर्ज वगैरे करावयाचे ते त्यांजकडे केले पाहिजेत. तेथें ३ वर्षे विद्याभ्यास चालेल. या विद्यालयांत शिकविण्याच्या कामाच्या २ बैठका ह्मणजे भाग होतील. उन्हाळा आणि हिवाळा. उन्हाळ्यांतील शिकविण्याची तारीख १ एप्रिलपासून तारीख ३० जून पर्यंत व हिवाळ्यांतील शिकविणें तारीख १ आक्टोबरपासून तारीख ३१ मार्चपर्यंत. हिवाळ्यामध्यें क्लासांतील व व्याख्यान प्रकारांतील शिक्षणास जरी आक्टोबरचे पहिले तारखेशिवाय आरंभ केला जाणार नाहीं तरी विद्यार्थ्यांनीं यावयाचें तें सिदापेठ येथें सपटंबरचे पहिले तारखेस यावें. ह्मणजे त्या सुमारास थंडीच्या हंगामांतील पिकाच्या पेरण्या होतात त्या पहाण्यास व शिकण्यास त्यांस सापडतील. या विद्यालयांत जें शिक्षण दिलें जाईल तें शेतकीसंबंधी सर्व प्रकारांनीं परिपूर्ण असून त्याशिवाय रसायन शास्त्र, भूरचना शास्त्र, जीवजंतु शास्त्र, वनस्पति शास्त्र, पशुवैद्य शास्त्र यांचाही शेतकीच्या कामास अवश्यक इतका भाग शिकविला जाईल. याशिवाय हिशेबी ज्ञान, मोजणी, चित्रविद्या हेही विषय शिकविले जातील. या विद्यालयांत तीन तऱ्हेनें विद्याभ्यास होईल. एक व्याख्यानें देऊन विषयाचें स्पष्टीकरण होईल, वर्गांत मुलांकडून आपसांत वाटाघाट करवून विषय ठसविले जातील. व शेतांतून विद्यार्थ्यांकडून हस्तक्रिया करवून प्रत्यक्ष ज्ञान त्यांस करून दिलें जाईल. दर रोज कांहीं वेळ घराबाहेर शेतांत जीं कामें चालतात तीं पहाण्यास व त्यांत शरीक होण्यास सर्व विद्यार्थ्यांस मोकळीक दिली जाईल. व प्रत्येक विद्यार्थी प्रतिदिवशीं शेतांत चाललेल्या प्रत्येक कामांत व प्रत्येक विषयांत पुरा वाकबगार झाला किंवा नाहीं याविषयीं फार बारकाव्यानें परीक्षा घेऊन पहातील. व विद्यार्थ्यानें दररोज जें ज्ञान संपादन केलें त्याची डायरी (दिनलेख ) त्यानें बरोबर रीतीनें राखिली आहे किंवा नाहीं तें पहातील. फी घेतल्याशिवाय कांहीं करारावर कांहीं विद्यार्थी, मग ते युरोपियन, युरेशियन अथवा नेटिव कोणीही असोत, घेतले जातील. कांहीं विद्यार्थ्यांस पगारही दिला जाईल. जेवढ्या जागा भरावयाच्या असतील त्यांहून अधिक उमेदवार आल्यास प्रवेश परीक्षा होणार नाहीं या विद्यालयांत विद्यार्थी घ्यावयाचा त्याची म्याट्रिक्युलेशनची परीक्षा झालेली असली ह्मणजे तेवढें सर्टिफिकिट पुरें आहे. पहिले सहा महीनें जे २४ विद्यार्थी परीक्षेंत उत्तम ठरतील त्यांस पुढच्या सहा महींत सरकारांतून दरमहा १२॥ रुपये पगार मिळेल. दुसऱ्या वर्षी १५ रु. मिळेल, व तिसरे वर्षी १७॥ रु. मिळेल. प्रत्येक सालीं जी ठरीव परीक्षा नेमिली जाईल तींत पास झाल्यावाचून बढती मिळणार नाहीं. हमेशा हुकूम मानणार नाहीं, काम बरोबर करणार नाहीं तर तशा विद्यार्थ्यांचा सर्व किंवा कांहीं पगार बंद केला जाईल, कोणी विद्यार्थी सहेतुक शिकत नाहीं अथवा त्यास चांगली धारणा नाहीं असें दिसून येईल तर त्याची पगारी जागा बंद केली जाईल. अठोंव वर्षांहून अधिक काल कोणाकडे पगारी जागा रहाणार नाहीं व कोणी विद्यार्थी बारा महिन्यांत बढतीच्या पगारास परीक्षेंत योग्य झाला नाहीं तर त्याचा पगार पुढें चालू रहाणार नाहीं- दहा दहा रुपयांच्या ३ स्कालरशिपाही सदरील पगारी जागांशिवाय ठेविल्या जातील. व तीन वर्षे विद्याभ्यास पुरा झाल्या नंतर विद्यार्थ्यास 'कृषिकर्मवेत्ता' असें सर्टिफिकेट दिलें जाईल.

## लवादकोर्ट

( Communicated. )

लवाद कोर्ट ह्मणजे पंचानीं न्याय निवाडे करण्याचें विशेष स्थळ. हें मुद्दाम जरी पूर्वीं कोणीं स्थापिलें नव्हते तरी गांवोगाव चार भले मनुष्य पंचादाखल असत व त्यांजकडून योग्य वेळीं सार्थ न्याय मिळून गैर चालीच्या मनुष्यांची फटफजिती होत असे. किंबहुना तो सर्वांस खपेनासा झाला ह्मणजे त्या सर्वांकडून त्याच्या गैरवर्तनास योग्य असें शासनही मिळत असे. व तेणेंकरून क्षुल्लक कारणासाठीं न्याय कोर्टांत जाण्याची कोणास गरज पडत नसे, व तशा क्षुल्लक कारणाची कोणी दादही घेत नसे. अलीकडे इंग्रजी झाल्यापासून ती वहिवाट अगदीच बंद झाली असें ह्मणण्यास फारसा बाध येणार नाहीं. कारण तालुक्यानिहाय न्याय कोर्टें स्थापन झालीं, त्यांतून वाकबगार असे सनदी वकील नेमिले तेणेंकरून गरीब गुरिबास व भल्या बुऱ्यास न्याय कोर्ट खेटावयास सुलभ झालें इतकेंच नाहीं तर एका कोर्टांत अनुकूल ठराव न झाल्यास एकावर एक अशीं २।३ कोर्टें फिरावयास मार्ग झाला व पैसा असल्यास बारिस्टरांचें वगैरे साह्य मिळूं लागलें. आतां झालें हें वावगें झालें असें ह्मणतां येत नाहीं कारण पूर्वीं पंचाचे हातून गुन्हेगारास प्रसिद्ध पणें शासन दिलें जात नसे व तेणेंकरून तसें वाईट काम करणारास दरारा बसत नसे तो हल्लीं सरकाराकडून चांगला बसतो.

दयाळु इंग्रज सरकारानीं अनेक साधनांनीं युक्त अशीं न्याय कोर्टें स्थापिलीं व त्यांत धर्मास, न्यायास, इमानास व साक्षी पुराव्यास अनुसरून इनसाफ चालविला. तेणेंकरून कित्येक अयोग्य दस्तैवज खोटे ठरून त्यांचे प्रवर्तकांस शिक्षा झाल्या. आतां यावरून असेंही अनुमान निघतें कीं कायदेशीर उपयोगी पडावे ह्मणून कांहीं बदचालीचे लोक खोटे दस्तैवज बनवून न्यायकोर्टांत उपयोगास आणू लागले आहेत. व त्याप्रमाणें अव्वल कोर्टांत अमलावारी न झाल्यास अपील कोर्टें हिंडून खऱ्या नाण्यांत मिसळूं लागले आहेत. यावरून सरकारच्या न्यायांत कमीपणा येतो असें नाहीं. सरकार नियमित साधनांनीं बारीक रीतीनें तपास करून फैसल करिते. तें त्यांचें खरें खोटें केलेलें कृत्य जातीनें पहावयास जात नाहीं. तेव्हां त्याकडे काय बोल? मात्र अशा प्रकारचे तंटे पूर्वी उपस्थित होत नसत अगर झाले तर त्यांची कल्पांतीही डाळ गळत नसे. कारण गावांतीलच पंच असल्या कारणानें त्याच्या इष्ट मित्रांच्या, व शेजाऱ्या पाजाऱ्यांच्या नजरे समोर ते असल्याकारणानें यथातथ्य वर्तमान त्यांच्या लक्षांत असे ह्मणून वर लिहिल्याप्रमाणें हल्लींच्या लबाड्यांस थारा मिळत नव्हता हें निर्विवाद आहे. आतां त्याकाळीं ही 'बळी तो कान पिळी' असे कांहीं प्रकार घडत असतील त्याविषयीं आमचें कांहीं ह्मणणें नाहीं, पण पुष्कळ कमी.

हल्लीं आपणावर राज्यकर्ते नीतिमान इंग्रज सरकार असल्यामुळें त्यांनीं लवाद कोर्ट ( पंचाचें कोर्ट ) स्थापण्याविषयीं परवानगी दिलेली आहे. व त्याप्रमाणें व ज्याच ठिकाणीं देश हितेच्छु लोकांनीं प्रयत्न करून त्यांची सुरुवातही केली आहे. व तीं कोर्टें बिनधोक चालण्याविषयीं ते खबरदारी ठेवित आहेत. आतां स्टांपाचा वगैरे खर्च बुडतो तरी सरकार खेद करीत नाहीं. हें औदार्य सामान्य ह्मणावें काय? नाहीं. याकरितां तें औदार्य व देश बांधवांची दरिद्रावस्था मनांत आणून पंचाचीं कोर्टें आपल्या वऱ्हाडांतही ठिकठिकाणीं स्थापावीं. व त्यायोगें निष्पक्षपातानें सर्वांस खरा न्याय मिळेल असें करावें. ह्मणजे पैशावाचून ही खऱ्याचें खरें ठरेल, खोट्याची खोड मोडेल. व पूर्वीची आपली रीति वहिवाटींत येईल.

## वऱ्हाड.

दिवाण साहेब सर सालरजंग यांची व नामदार विक्टोरिया महाराणी साहेब यांची विलायतेस भेट झाली व महाराणी साहेबांनीं आपले पंक्तीस त्यांस भोजनास बोलाविलें होतें. दिवाण साहेब पाय दुखण्यानें आजारी होते तर दररोज २ वेळ महाराणी साहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव प्रिन्स आफ वेल्स त्यांचा समाचार आणवीत असत. याप्रमाणें आपलें राजघराणें हिंदुस्थानच्या आपल्या पाहुण्याचा उत्तम प्रकारें आदर सत्कार करीत आहे हें पाहून संतोष वाटतो. दिवाण साहेबांस लंडन शहरचे फ्रीडम ही पदवी महाराणी साहेबानीं दिली.

सर रिचर्ड मीड साहेब हैदराबादचे रेसिडेंट यांची गेल्या आठवड्यांत त्या कामावर कायमची नेमणूक केल्याविषयीं हिंदुस्थान सरकारचे ग्याझेटांत प्रसिद्ध झाले आहे.

मि० एच. ए. हिय आफिशियेटिंग पोलिस सुपरइंटेंडेंट यांस गेले महिन्याचे २१ वे तारखेपासून ३ महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

---

खामगावची स्टेट रेलवे १९ वे तारखेपासून बंद होणार.

---

नागपुरच्या सिटी स्कुलाचे हेड मास्तर रा. रा. वामन महादेव कोल्टकर एक वर्षाचे रजेवर आहेत ते येथें आपले बंधूस भेटावयास आले आहेत. थोडे दिवसांनीं नागपुराकडे जातील.

---

या आठवड्यांत सोमवारीं रात्रीं व मंगळवारीं दोन प्रहरपर्यंत भीजपाऊस उत्तम पडला. तेणेंकरून लोकांची काळजी दूर झाली. नदीला चांगला पूर आला व पेरण्यांचा झपाटा चालू झाला.

---

क्या० एच डी पी रेनिक असिस्टंट कमिशनर यांनीं विलायतेहून आल्यावर आणखी ३० दिवसांची रजा आपले जागेवर रुजू होण्यापूर्वीं घेतली होती ती संपून ते कामावर रुजू झाले.

---

क्या. सी. बी. ई. स्मिथ सी. एस आय हैदराबादचे फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट व एक्स आफिसिओ सेशन जडज यांस जस्टिस आफ धि पीस केलें.

---

मि० ई. जे. किट्स वऱ्हाडांतील थर्ड क्लास आफिसियेटिंग असिस्टंट कमिशनर आणि फर्स्ट क्लास माजिस्ट्रेट यांस जस्टिस आफ धि पीस केलें.

---

सालमजकुरीं पोलिसपट्टीचा दर निमें उतरल्यामुळें इलिचपुरच्या म्युनिसिपल कमिटीचें उत्पन्न फार कमी झालें सबब तेथें गाड्यांवर एक नवीन कर बसविला. दर दिवशीं दर गाडीस ती शहरांत जावो किंवा शहरांतून बाहेर जावो, तसेंच ती भरलेली असो किंवा रिकामी असो, तिजपासून ६ पै कर घ्यावा. तसेंच भरलेले टटास ६ पै व भरलेलीं तट्टें व गाढव यांस तीन पै कर घ्यावा, असा ठराव केला.

---

अधिकारी लोक कागदपत्रांवर सह्या स्पष्ट व सुवाच्य करीत नाहींत त्याकरितां पुष्कळ वेळा समजुती दिल्या तरी कांहीं बंदोबस्त झाला नाहीं ह्मणून हल्लीं मुंबई इलाख्यांत असा ठराव झाला आहे कीं प्रत्येक कागदावर आरंभीच तो कागद कोणाकडून कोणाकडे जाण्याचा हे कारकुनाच्या हातचेंच स्पष्ट लिहिलेले असावें ह्मणजे खालील दिव्य सह्यांची विचक्षणा करीत बसण्यांचे कारण नाहीं

---

मुंबईच्या युनिव्हर्सिटीच्या परिक्षेसंबंधी प्रकारांत कांहीं फेरफार होत आहेत असें ऐकतों. म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेचे शेकडो उमेदवार बाहेरून खर्च खाऊन मुंबईस जातात व इंग्लिश परीक्षेमध्येंच निभ्याहून अधिक घसरतात सबब इंग्लिश विषयाची परीक्षा जागच्या जागीं व्हावी असा विच्यार चालू आहे.

---

खामगावच्या रेलवेप्रमाणेंच उमरावतीची स्टेट रेलवे सालमजकुरीं बंद करावी असा विच्यार निघालेला आहे पण अजून निश्चय समजण्यांत आला नाहीं. दोन वर्षांपासून उमरावतीचे व्यापाऱ्यांनीं बरसातींत रेलवेला उत्पन्न कमी असतें सबब तितक्या पुरतें मालावर दर मणास ३ पई भाडें अधिक देण्याचें कबूल केलें आहे. व टिकिटाचा दरही एरवींपेक्षां बरसातींत दिढीनें देण्याचा कबूल केला आहे व या करारावर बाराही महिने सरकारानें तेथें गाडी चालू ठेवण्याचें कबूल केलें आहे असें ऐकण्यांत आहे. ह्मणून सरकारानें आतां गाडी बंद केली तर घेतलेला अधिक पैसा लोकांस परत द्यावा लागेल असेंही कोणी कोणी ह्मणतात. गुदस्त सालीं उमरावती रेलवेला उत्पन्न ९७९६८ रुपये झालें व खर्च ४९०४० रुपये झाला. याजवरून पहातां नफा १२९२८ रुपये झाला असें दिसतें. ही रेलवे तयार करण्याकरितां एकंदर भांडवल ४३७२७८ रुपये लागलेलें आहे. यावरून सरकारास तीन रुपये शेकड्याचें व्याज मिळालें आहे. अशी गोष्ट आहे तर सरकारानें उमरावती रेलवे बरसातींत बंद करूं नये असें आह्मांस वाटतें.

---

उमरावतीच्या क्यावटरींतील क्लार्क नारायणराव यांस दगाबाजीबद्दल तीन महिन्यांची शिक्षा झाली होती ती कमी होण्याकरितां कैदीनें अपील केलें होतें त्याच्या चौकशींत शिक्षा कमी न होतां २ वर्षांची झाली.

---

अकोल्यांतील मुलींची हिंदुस्थानी एक शाळा कमी झाली व एक हिंदुस्थानी आणि एक मराठी अशा दोन आहेत त्यांस निमें पैसा म्युनिसिप्यालिटीनें द्यावा असें ठरलें. व या शाळा पुढें चालविणें अवश्यव सोयवार आहे किंवा नाहीं यांविषयीं रिपोर्ट करण्याकरितां एक कमिटी नेमिली आहे. तींत रा. रा. श्रीराम भिकाजी जटार, रा. रा. देवराव विनायक वकील, मि. जोरावरखा व मि. सलीमखा यांस मेंबर नेमिलें आहे.

---

इलिचपुरच्या लायब्ररीस लोकलफंडाकडून दरमहा १० रुपये मिळत होते ते बंद झाले.

---

## रेसिडेंट साहेबांचा जाहिरनामा

तारीख १९ जून सन १८७६ इ०

लायसेन्सवाले स्टांपवेंडर लोक व इतर लोक यांनीं सन १८७६ चे जुलैचे पहिले तारखेपासून पहिले क्लासचे स्टांप सरकारांतून खालीं लिहिल्या शर्तीप्रमाणें विकत घेतले तर त्यांस कमिशन मिळेल असा ठराव झाला आहे तें कमिशन येणेंप्रमाणें.

लायसेन्सवाले वेंडरलोकांस.

१. प्रत्येक स्टांप आठ आण्याचे वरचे दराचा नाहीं, व एकंदर रकम ९ रुपयांहून कमी नाहीं इतके घेतले तर दर शेकडा कमिशन........................ ३८

२. प्रत्येक स्टांप आठ आण्याचे वरचा व ९ रुपयांचे आंतला असून एके वेळीं ५० रुपयांहून कमी नाहींत इतके घेतल्यास कमिशन शेकडा.................. ...... २

३. प्रत्येक स्टांप ९ रुपयांचे वरचा व ५० रुपयांचे आंतला व एकेवेळीं १०० रुपयांहून कमी नाहींत इतक्या किमतीचे स्टांप घेतल्यास शेकडा कमिशन ........... १रु०

इतरांस.

लायसेन्स वेंडराशिवाय दुसऱ्या कोणीही मनुष्यानें सदरील तिन्ही शर्तीं पैकीं कोणत्याही शर्तीचे स्टांप सरकारांतून घेतल्यास शेकडा एक रुपयाप्रमाणें, त्यास कमिशन मिळेल असा ठराव झाला आहे.

---

पुसदच्या दवाखान्यावरील आस्पितळ असिस्टंट रामप्रसाद यास एक महिन्याची हक्काची रजा मिळाली.

---

चिखलीपासून मेहेकरास, खामगावापासून बाळापुरास, व पारसपासून तेथल्या रेलवे स्टेशनास नवीन चांगले रस्ते होत आहेत असें दिसतें. तारीख २० जूनच्या रेसिडेन्सीआर्डरमध्यें या तिन्ही ठिकाणच्या लोकांच्या जमीनी सडकेच्या लायनींत आल्या त्या सार्वजनिक कामाकरितां घेण्याचा ठराव केला ह्मणून जाहिराती प्रसिद्ध झाल्या आहेत.

---

पुढील दोन वर्षांकरितां इलिचपुरच्या म्युनिसिप्यालिटींत खालीं लिहिलेले मेंबर मुकर केले आहेत.

१ भगवंत नरहर
२ वजीरखान
३ बाळाजी नरसिंव्ह मुधोळकर
४ इनायत मोहिदीन काजी
५ हिरा सावजी
६ लाला बसंतराय
७ चतुरसिंग
८ चनसूक छागलाल

---

रेसिडेन्सी आर्डर छापणारानीं नावें लिहिण्याच्या कामांत फार काळजी घेत जावी अशी आमची त्यांस शिफारस आहे. कारण हा कागद सरकारी आहे, सबब त्यांत चुका नसाव्या. वरील यादींतील तिसरें नाव बाळाजी नरसिंव्ह असावयाचें त्या ठिकाणीं बाळाजी मोहिदीन असें रे. आ. मध्यें लिहिलें आहे. व थोड्या महिन्यांमागें खामगावच्या स्कूलमास्तराचें नाव लिहितांना अशीच चमत्कारिक चूक झाली होती.

## वर्तमानसार

म्हैसुरचे चीफ कमिशनर मि० सी. बी. साँडर्स सी. बी. तेथील महाराजांचे भेटीस राजवाड्यांत गेले होते. दोन तास त्यांची भाषणें झालीं. राण्यांचे दुःखोद्गार त्यांनीं सर्व ऐकले व त्याविषयीं विच्यार करूं असें वचन दिलें.

क्या० उइलसन यांस म्हैसूरच्या महाराणींचे शिक्षक नेमिलें.

ग्वाल्हेर स्टेट रेलवेचें काम चांगलें चाललें आहे. व सामान नेण्याची आगगाडी लवकरच चालू होईल.

ढाका येथें नार्थब्रूकहाल नावाची इमारत बांधणार त्यासाठीं ३७००० रुपये जमले आहेत. पुढील महिन्यांत सर रिचर्ड टेंपल साहेब पायाचा दगड बसविण्याचा समारंभ करणार आहेत.

चिनांत रेलवेची गाडी चालवून पाहण्याचा पहिला प्रयत्न ता. २६ मे रोजीं शांघाई येथें केला.

### हवामान वगैरे.

आमदाबाद— पाऊस साधारण आहे. वाख्याचा उपद्रवही आहे.

खेडा— पाऊस साधारण आहे. वाख्याचा उपद्रव बराच आहे.

सुरत— पाऊस मध्यम बरा असून वाख्याचा उपद्रव आहे.

भडोच— पाऊस मध्यम असून वाख्याचा उपद्रव साधारण आहे.

खानदेश— पेरण्या सुरू झाल्या. पावसाची जरूरी आहे. आरोग्य चांगलें आहे.

नाशिक— पाऊस थोडा आहे पेरण्याकरितां जास्त पाहिजे.

ठाणें— पाऊस बराच आहे. कांहीं तालुक्यांत वाख्याचा उपद्रव व कांहीं तालुक्यांत देवींची सांथ आहे. पेरण्या चालू आहेत.

पुणें— बहुतेक तालुक्यांत थोडा बहुत पाऊस पडला. इंदापूर व पुरंधर तालुक्यांत अद्याप गुरांचा आजार आहे. अद्याप पेरण्याची सुरवात झाली नाहीं. लोकांस आरोग्य चांगलें आहे.

अहमदनगर— पाऊस थोडा आहे पेरण्याकरितां अधिकाची जरूर आहे.

सोलापूर— पाऊस साधारण आहे. सोलापूर तालुक्यांत वाख्याचा उपद्रव वाढत चालला आहे. करमाळे तालुक्यांत खरीपाचे पेरण्यास सुरवात झाली.

सातारा— पाऊस साधारण असून तासगाव, वाई आणि वाळवे तालुक्यांत वाख्याचा उपद्रव आहे. पेरण्याची तयारी चालू आहे.

बेळगांव— पाऊस साधारण बरा असून वाख्याचा उपद्रवही जारी आहे. खरीपाच्या पेरण्या सुरू आहेत.

धारवाड— पाऊस एकंदरींत बरा आहे. कांहीं तालुक्यांत पावसाच्या आधीमुळें भाताच्या पेरण्या होणें राहिल्या आहेत. वाख्याचा उपद्रव कमी होत चालला आहे.

कानडा— पाऊस खूप आहे. भाताच्या पेरण्या चालल्या आहेत. घाटावर वाख्याचा उपद्रव आहे.

कलादगी— पाऊस साधारण बरा असून बहुतेक तालुक्यांत वाख्याचा उपद्रव जारी आहे.

कुलाबा— पाऊस चांगला असून पेरण्या बहुतेक सरल्या. लोकांचें अरोग्य चांगलें आहे.

रत्नागिरी— पाऊस साधारण असून अधिकाची जरूर आहे; तेणें करून पेरण्याची खोटी झाली आहे. वेंगुर्ला येथें थोडा वाख्याचा उपद्रव आहे.

मुंबई व मद्रास येथील गवरनरास "एक्स्ट्रा नाईट ग्रांड कमांडर आफ धि स्टार आफ इंडिया" हा किताब दिला.

हिंदुस्थान सरकार व विलायत सरकार यांचा परस्पर संबंध आहे याविषयीं लार्ड सालिसबरी हे आपल्या ता. ३१ मेच्या पत्रांत असें ह्मणतात कीं, हिंदुस्थानांतील कायद्यांबद्दल पार्लमेंट प्रधानास जबाबदार धरितें आणि ते कायदे हिंदुस्थान सरकारानें पास केल्यानंतर नापसंत करतां येत नाहींत सबब निदान मुख्यत्वें जमाबंदी संबंधी कायदे तरी पास होण्यापूर्वी इंडिया आफिसाकडून पसंत व्हावे. ते पास करण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकाराकडे आहे.

सरकारानें रिविन्यु कमिशनराकडे एक तक्ता पाठविला आहे. त्यांत जिल्ह्यांतून लवादी मोकद्दमे फैसल झाल्याची संख्या, दाव्याचा आकार वगैरे माहितीबद्दल १० प्रकार गेल्या मे अखेर विचारिले आहेत.

टर्कीवरील प्रसंग टर्कीपुरताच आहे. त्याचा प्रवेश इतर ठिकाणीं होणार नाहीं, याविषयीं उत्तरेकडील राष्ट्रांचें ऐक्य आहे.

स्लेटींचा दगड-- मालवणापासून सुमारें ८ कोसांवर रामगड ह्मणून गांव आहे, तेथें स्लेटी होण्याजोगे मोठमोठे दगड पुष्कळ आहेत असें मालवण येथील एका बातमीदारानें सत्यशोधक पत्रास लिहिलें आहे.

डा. मार्टिन हाउ हे संस्कृत भाषाभिज्ञ विद्वान गृहस्थ पुण्याच्या कालेजांत सहा वर्षेंपर्यंत संस्कृत भाषेचे गुरु होते. यांस संस्कृत, झेंद वगैरे जुन्या भाषांचा शोध करून धर्मसंबंधी माहिती मिळविण्याची मोठी आवड असे. यांनीं ऐतरेय ब्राह्मणाचें भाषांतर आणि "पार्शी लोकांची पवित्रभाषा, ग्रंथ आणि धर्म यांवर निबंध हीं लिहिलीं आहेत

विलायतेंतील कापडावर हिंदुस्थानांत पडणारी जकात रद्द होण्यासाठीं मांचिस्टरचे लोक अर्ज करीत असून त्यावर ३० हजार सह्या झाल्या आहेत.

विलायतेंत चांदीचा भाव अतिशय उतरण्याच्या कारणांची वगैरे चौकशी करण्यासाठीं नेमिलेली सिलेक्ट कमिटी असा रिपोर्ट करणार आहे कीं, तिला ही स्थिति बदलण्यास कांहीं मार्ग दिसत नाहीं.

इं. प्र.

## सार्वजनिक सभेचा स्तुत्य प्रयत्न.

पुण्याच्या सार्वजनिक सभेनें सिविल सर्विहस परीक्षेच्या कामीं नेटिव लोकांस नवीन ठरावापासून ज्या अडचणी उत्पन्न झाल्या आहेत त्यांचे निरसनार्थ विलायतच्या ईस्ट इंडिआ असोसियेशनानें स्टेट सेक्रेटरीकडे उद्योग करावा ह्मणून एक पत्र त्या असोसियेशनाकडे पाठविलें आहे. २३ वे तारखेच्या टाइम्स मध्यें हें पत्र छापिलें आहे हें समग्र वाचण्यास आह्मी लोकांस शिफारस करितों. हिंदुस्थानांतील सरकारी कामदारांची संमती घेतली त्यांत उमेदवारांचें २२ वर्षांचें वय असावें अशीं मतें मिळालीं त्याविषयीं कांहीं विच्यार न करितां व पहिला ठराव २१ वर्षांचा असतां नवीन १९ वर्षांच्या वयाचा ठराव झाला ही केवढी मोठी नेटिवांच्या कल्याणाची गोष्ट झाली! वाः! शाबास! जों जों आमचे नेटिव लोक या महात्विक परीक्षेच्या पाठीमागें लागतात तों तों सरकार त्यांच्यावर नव्या नव्या अडचणीचे बोजे लादित आहे हें पाहून मोठा चमत्कार वाटतो! हिंदुस्थानांत परीक्षा घ्या ह्मटलें तर चक्क नाहीं ह्मणतात; वयाची यत्ता वाढवा ह्मटलें तरी नाहीं हाच जबाब. युरोपियन लोकांची तेथल्या तेथें परीक्षा असतांही त्यांस वयाची यत्ता सढळ ठेविली आहे व नेटिवांच्या कामीं मोठी काटकसर चालली आहे. प्रालब्ध नेटिवांचें! अठरा वर्षांचें हिंदु मूल ६००० मैल लांब परदेशांत जाईल काय? आणि परभाषेंत सिविल सर्विससारखी बिकट परीक्षा देईल काय? अशानें नेटिवास या जागा द्यावयाच्या नाहींत असें मुखानें स्पष्ट न ह्मणतां कृतीनें तसा प्रकार चालला आहे, असें जे लोक ह्मणतात त्यांस हें एक टीकेस कारण मात्र अधिक होत आहे. अस्तु. नेटिवावर दया करणार सरकारच आहे.

## काश्मीर देशाचें वर्णन.

काश्मीर हा मोठा विस्तीर्ण खोरा किंवा पर्वतमध्य प्रदेश आहे. तो पंजाबाच्या उत्तरेस उत्तराक्षांश ३३ व ३५ आणि पूर्व रेखांश ७४ व ७६ यांच्या दरम्यान आहे. तो समुद्राच्या पृष्ठभागावर ५,३५० फूट उंच आहे. त्याच्या दक्षिणेस पीरपंजल ह्मटलेल्या पर्वतांची ओळ आहे. समुद्राच्या पृष्ठापासून ह्या पर्वताची उंची फूट १२००० आहे. त्यांतून रहदारीचे दोन मार्ग किंवा घाट आहेत; एकाचें नाव बनिहलघाट, तो ९,२०० फूट उंच आहे. दुसऱ्याचें नाव पीरपंजलघाट, तो फूट ११,४०० उंच आहे. काश्मिराच्या चौफेर पर्वत असून त्यांच्यावर सर्वदा बर्फ असतें. जे पर्वत उत्तरेस आहेत ते ज्यास्त उंच असून त्यांवर बर्फही अधिक असतें. काश्मीरचा खोरा सपाट व सुपीक आहे. त्याची लांबी सुमारें २५ कोस वरुंदी १० कोस आहे. त्याच्या मधून जलम नदी पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहते. त्याची राजधानी काश्मीर ऊर्फ श्रीनगर हें त्या नदीच्या दोहों तिरावर वसलें असून तें त्याच्या सीमांपासून सारख्या अंतरावर आहे. जलम व तिचे पुष्कळ पाट यांच्या योगानें श्रीनगर स्वच्छ व आरोग्यसाधक असें करण्यास उत्तम सोयी असतांही तें शहर अत्यंत मलीन आहे. तेथील हवा चांगली आहे. जूनच्या १५ व्या तारखेपासून आगस्टच्या १५ वीपर्यंत दिवसां ऊष्मा होऊन थोडा त्रास होतो पण रात्रीं चांगलें गार वाटतें. घरांत ठेवलेल्या उष्णमापकांत पारा केव्हां केव्हां १० अंशांपर्यंत चढतो.

त्या प्रांतांत लोकवस्ती ४,०२,७०० आहे; त्यांत ३,१२,७०० सुन्नी व शिय्या मुसलमान १५,०००; व ७५,००० हिंदु आहेत. श्रीनगरची वस्ती १२७४००; ९५४०० सुन्नी, ७००० शिय्या व हिंदु २५००० लोक आहेत. पुरुषांचा व स्त्रियांचा पोषाग बहुत करून सारखाच, ह्मणजे गळ्यापासून घोट्यांपर्यंत ढिला घोळदार झगा असतो व पुरुष प्रवासास जातात किंवा कांहीं शक्तीचें काम करतात तेव्हां कंबर बांधतात. बाह्या इतक्या सैल असतात कीं त्यांतून त्यांस हात सहज काढून आंतल्याआंत अंगाशीं ठेवतां येतात. त्यांचीं घरें सर्व लाकडाचीं असून अगदीं खिळखिळीं व पडकीं आहेत ह्मणून हिवाळ्यांत जबर थंडीपासून लोकांचें बरोबर रक्षण होत नाहीं. त्यांस ऊब यावी ह्मणून विस्तव पेटविण्यास जागा नसती, आणि विस्तव केलाच तर धूर जाण्यास दरवाज्याशिवाय दुसरा मार्ग नसतो. खिडक्यांस भिंगांच्या ऐवजीं सुंदर जाळ्या असतात, त्या करण्यांत तेथील सुतार फार कुशल आहेत दक्षिणेंतल्याप्रमाणें तेथेंही लाकडें व शेणी जाळतात. तेथील लोक दरिद्री व आळशी असून, तेथें थंडी पराकाष्ठेची पडती ह्मणून ते अक्षय गळ्यांत मातीच्या शेगड्या वागवितात त्या फार तापतात व त्या झग्याच्या आंत अंगाशीं लागून असतात त्यावरून त्याच्या कातडीवर मोठाले चट्टे उठतात. पुरुष व स्त्रिया, लहान व मोठे, हिंदु मुसलमान वगैरे सर्व लोक असेच करतात.

त्या प्रदेशाचें वर्णन करतांना एक लिहिणारा असें लिहितो कीं हा देश एकंदरीनें जितका सुंदर आहे तितका दुसरा कोठें असेल? मात्र शहराकडील रस्त्यांनें गेलें तर देश फारसा सुंदर दिसत नाहीं देशाच्या मध्यभागीं गेल्याशिवाय त्याचें सौंदर्य दिसून येत नाहीं. सर्व देश हिरवाचार असून त्याच्या चौफेर बर्फानें झांकलेले पर्वत आहेत, त्यावरून तो चांदीच्या कोंदणांत मोठा विशाळ पाच बसविल्यासारखा दिसतो. शिवाय सुंदर व रुंद जलम नदी मधून वाहती, ठिकठिकाणीं विस्तीर्ण सरोवर असून त्यांवर विशाळ खडक छाया करतात, जिकडे तिकडे थोर व गगनचुंबित चित्रविचित्र पल्लवयुक्त वृक्षांच्या राई, फळबागा, पर्वतांतून वहात येणाऱ्या लहान लहान नद्या, सुंदर गावें व खेडीं, आणि मोडून पडलेल्या प्राचीन इमारती असे अनेक देखावे आहेत. पर्वतावर उभें राहून पाहिलें तर अवर्णनीय देखावे पहाण्यांत येतात. तेथील लोकही स्वरूपानें सुंदर आहेत. पुरुष देखणे व असे बळकट आहेत कीं ते मण दीड मण ओझें घेऊन बिकट डोंगरांतून ७।८ कोस सहज जातात. त्यांच्या शरीराचा बांधा शिक लोकांच्यापेक्षां फार सुदृढ आहे. ते कारागिरींत फार कुशळ आहेत. ते शाली विणण्यांतच कुशळ आहेत असें नाहीं तर सुतार, लोहार, सोनार वगैरे कामांतही फार चतुर आहेत. जडावकाम तर फार उत्कृष्ट करतात. स्त्रिया तर हिंदुस्थानांतील स्त्रियांपेक्षां खरोखर रूपवान आहेत. त्यांचा वर्ण तेजस्वी, चेहऱ्याची ठेवण सुरेख व चर्या आनंद प्रदर्शक असती. देश सुपीक असून त्यांत उत्पन्न जसें असावें ह्मणून वाटत असतें तसेंच आहे. तेथील मुख्य उत्पन्न ह्मटलें ह्मणजे तांदुळ पण दुसऱ्याही बहुत प्रकारचीं धान्यें पिकतात. शेतकऱ्यांवर सरकार देण्याचा अत्यंत कहर आहे, तरी शेतकरी दक्षिणेंतील कुणब्यांसारखे दुर्बळ व लंगोट्या नेसणारे नाहींत तर सुदृढ असून अंगभर वस्त्रें लेणारे आहेत. तर तिकडील शेतकी अशी फलद्रूप आहे हें यावरून लक्ष्यांत येईल. तिकडे फळफळावळ नानाप्रकारची असून विपुल आहे.

पण त्यांत मोठा थोरला "परंतु" आहे त्यावरून या सर्व सौंदर्याची व सुबत्तेची घाण होती. तो "परंतु" कोणता ह्मणाल तर तेथील सरकारचा जुलूम. हा जुलूम कसा आहे तो पहा. शेतें पिकून तयार झालीं ह्मणजे पहिल्या सपाट्यास त्यांतील निम्में उत्पन्न सरकार घेतें. हा निम्मे हिस्सा धान्यांचाच घेतें असें नाहीं तर हरएक मालाचा, हरएक जिनसेचा व हरएक प्रकारच्या उत्पन्नाचा व मिळकतीचा. गाईस दोनदां दोन वासरें झालीं तर त्यांतून एक मालकानें ठेवावें व एक सरकारास द्यावें. कोंबडीस ६ पिलें झालीं तर तीन आपण ठेवावीं व तीन सरकारास द्यावीं. फळझाडांवर सरकारचें राखण असतें. आणि फळें पक्क होतांच बुभुक्षित सरकार त्यांतून अर्धीं घेतें. सरकारच्या हातून वाचून जें कांहीं राहतें त्यांतून निम्मे भाग सरकारचे शेकदार, कारकून, जिल्हेदार, शिपाई वगैरे भुरटेचोर लुबाडून नेतात. असें असतां लोक निभावून जगतात तरी कसे याचें नवल वाटतें. काश्मिरांत कोणालाही विचारा, त्यांच्यांत ह्या गोष्टी नाकबूल करणारा एकही मिळणार नाहीं. शेतकऱ्याचीच अशी गोष्ट आहे असें नाहीं शाली विणाराची दशा तर त्याच्यापेक्षां ही वाईट आहे. ते सर्व सरकारचे गुलाम आहेत. त्यांस सरकार सर्व माल मसाला पुरवितें व त्यांस रोज दोन आणे मजुरी देतें, आणि मग जे तांदुळ शेतकऱ्यांपासून घेतलेले असतात ते त्यांस मनास वाटेल त्या भावानें विकत देतें. हे शाली विणणारे अगदीं रोड व निस्तेज असतात. कोणी ह्मणेल ते लोक अशा दुःखांत कां रहातात, इंग्रजी राज्यांत कां येऊन वस्ती करीत नाहींत? याचें एक कारण हें कीं, हिंदुस्थानच्या तप्त भट्टींत तडफडून मरावें त्यापेक्षां आपल्या आनंदमय देशांत उपास काढून मरावें हें फार बरें असें त्यांस वाटतें. तरी देखील हिंदुस्थानांत प्रत्येक मनुष्य स्वतंत्र असून त्याला आपल्या सर्व मिळकतीचा उपभोग घेतां येतो ह्मणून बहुत लोक इकडे येऊन उष्णतेचा ताप सोसण्यास तयार आहेत. पण तेथील सरकार त्यांस येऊं देत नाहीं. ज्या थोडक्या लोकांचें येणें होतें त्यांस आपण लौकर परत येऊं ह्मणून आपलीं कुटुंबें हमीस ठेवावीं लागतात. मी हिंदुस्थानांत येण्यास निघालों तेव्हां २।३ शाल विकणारे बिगाऱ्यांचें काम धरून मजबरोबर आले. त्यांस पीरपंजल घाटावरील चौकीदारांनीं अटकाव केला पण बिगारीस देण्यास दुसरीं माणसें नव्हतीं ह्मणून त्यांनीं त्यांस येऊं दिलें.

ज्ञा. द.

(पु॰ चा॰)

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोला रविवार ता० १६ माहे जुलै सन १८७६ इ० अंक २९

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचें अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८४ |
| " दुसरे खेपेस | ८२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

विनंती विशेष— जिल्हे बुलढाणें तालुके मेहेकर मौजे जानेफळ हें गांव बऱ्याच स्थितांत असून येथील रचनाही कांहीं शहराप्रमाणें दिसून येते कारण सर्व गावांतील सडका स्वच्छ रीतीनें तयार असतात इतक्यास कारण हेंच कीं रा. रा. हणमंत रामचंद्र तहसिलदार तालुके मेहेकर यांचें लक्ष सर्व तालुक्यावर फार चांगल्या प्रकारें असून वारंवार तालुक्यांतील गावें पहातात. व हें गांव तालुक्या नजीक असल्यानें विशेष लक्ष आहे. तहसिलदार यांचें लक्ष विद्यावृद्धीकडे बऱ्या प्रकारें असून पाटील कुळकर्णी व रयत लोक यांस वारंवार उत्तेजन देत असतात या कारणानें राजश्री मारुती जानजी कपाळ हे पाटीलकीचे कामांत फार दक्ष असून मोठ्या इमानानें सरकारचें काम करितात व प्रत्येक कामांत फार काळजी घेतात. येथें सेकंड ग्रेड लोअर क्लास स्कूल आहे त्यावर मेंबर राजश्री मारुती जानजी व उत्तम भवानी आणि पुंजापा कडापा वाणी हे तीन इसम आहेत त्यांत पाटील कुळकर्णी शाळेची स्थिति चांगली होण्याविषयीं व मुलांनी संख्या ज्यास्त जमविण्याविषयीं मेहनतीनें खटपट वारंवार करीत असतात. सदर्हु शाळेंत हल्लीं ६२ पर्यंत मुलें आहेत परंतु असिस्टंट मास्तर नसल्यामुळें शाळेचें काम जसें व्हावें तसें होत नाहीं. तर या गोष्टीकडेस मेहेरबान डे. ए. इ. जिल्हे बुलढाणे व मेहेरबान डायरेक्टर साहेब बहादूर प्रांत वऱ्हाड यांनीं लक्ष पुरविलें असतां फार चांगलें होईल. एथील मेंबर व ग्रामस्थ लोकांनीं शाळेस आश्रय दिला आहे तो खाली लिहिल्या प्रमाणें—

| | |
|---|---|
| रु० | |
| ९ | मारुती जानजी पाटील |
| २ | मल्हार सखाराम कुळकर्णी |
| २ | पुंजापा कडापा वाणी |
| २ | हरी उकासा कलाल |
| २ | राजाबा लक्ष्मण फितवे मेहेकरकर |
| १। | शिवराम बाळाजी जाधव |
| १ | नारायण पुंजापा वाणी |
| १ | बिरदीचंद गोवर्धन मारवाडी |
| १६। | |

येणें प्रमाणें सदर्हू मनुष्यांनीं पैसे दिले आहेत. यांतून १० रुपयांचें पड्याळ घ्यावें व ६। रुपयांचीं पुस्तकें मुलांस वाटावीं अशी त्यांनीं आपली इच्छा दर्शविली.

सांप्रत पाऊस अगदी नाहीं दिवसा स्वच्छ ऊन व रात्रीं स्वच्छ चांदणें आगर ताग पडतात. या कारणानें लोकांची मनें हवालदील होत चाललीं आहेत. पुढें ईश्वर काय करील तें खरें. रोगराई कांहीं नाहीं कळावें तारीख १० माहे जून सन १८७६ इसवी.

एक
क्ष

रा. रा. वऱ्हाडसमाचाकर्ते यांस—

वि. वि. अधिकोत्तर मजकूर थोडे कळवितों. खंडाळे गावचा पुंजाजी कुणबी याणें तालुके चिखली येथें तहशिलदारास अर्ज केला कीं मी महामारीचे कांहीं साधन करितों तेविषयीं सरकारची परवानगी असावी. ज्या गावीं मी साधन करीन त्या गावीं तो रोग येणार नाहीं. ही गोष्ट विचाराची होय सबब त्यांनीं आपल्या रिपोर्टबरोबर मे० बुधनीसाहेब यांजकडेस त्या मनुष्यास पाठविलें त्यांनीं ही गोष्ट आश्चर्यकारक मानून हुकूम दिला कीं याजला अशा कामीं चांगली मदत द्यावी व तो दर्शविलेला हेतु खरोखर सिध्धीस नेईल तर त्याला चांगले प्रकारें इनाम मिळण्याची शिफारस करूं. असें झालें आहे.

सालाबादप्रमाणें आषाढीपावेतों तुसार व खरीपाची पेरणी आटोपून लोक व गुरें आनंदानें काम करून जगली लोक रंगरी भाजी पाला व गुरें तृणांकूर आनंदानें मुखांत घालीत असतात. या वर्षी तसें नसून शेतकरी लोक दिलगीर आहेत ते मेघराजाची चातका प्रमाणें इच्छा करितात. मोठी दिलगिरी वाटत आहे. हल्लीं तिसरें नवें नक्षत्र लागल्यापासून पाऊस तीन चार इंच दोन रोजांत पडल्यानें पेर सुरूं आहे.

नवीन सर्व्हेअर कमिशनर साहेब बहादूर यांजकडून प्रत्येक तालुक्याची पोटभागिणीची रुजुवात तहशिलदार व तालुकदार लोकांनीं करण्याविषयीं आलें आहे. व तें काम आतां येत्या जमाबंदी पावेतों आटोपण्याची गडबड सुरूं होणार आहे

सरकारानें असा विच्यार केला आहे कीं, दोन महिने दिवाणी कोडत बंद ठेविल्यानें रयतेस विशेष फायदा झाला नाहीं. करितां नेहमीं हिंदू लोकांचे सणाचा मोसम ज्या काळांत असेल व ज्यांत नेहेमीं सुट्या द्याव्या लागतात तशा काळांत कोडत बंद ठेवण्याचा विचार चालला आहे व नेहेमीं प्रसंग हल्लीं असे येतात कीं, सणाचे दिवशीं कोडत सुरूं असतें असे एकंदर बारा महिन्याचे सणांची निवड करून पाहिली असतां ४० दिवसांवर जातात करितां त्या दिवशीं दिवाणी कामें तरी न नेमावीं असेविषयीं विचार चालू आहे

मलकापुरचे आनररी माजिस्ट्रेट कांहीं दिवसांकरितां खनगी कामासाठां हैदराबादेस गेले आहेत.

बुलढाणें जिल्ह्यापैकीं मलकापुर तालुक्याचे तहशिलदाराचे रिपोर्टावरून महारलाकांचो बदली बडतर्फी गावकरी पाटील लोकांच हातांत दिली आहे. महार पाटलास तुच्छ मानीत होते ते आतां चांगले वागूं लागतील.

तालुक्यांत सभ्य, संभावित, विद्वान पेनशनदार यांपैकीं टेंपररी सब रजिस्टर मोठा गाव पाहून त्या ठिकाणीं नेमण्याचा विचार चालू झाला आहे व त्यास कामशन फी ४० पासून ७५ रुपये शेकडा पर्यंत मिळेल असा विच्यार चालू झाला आहे. कळावें हा विनंती. तारीख १० जुलै १८७६

एक पत्र वाचणारा.

रा. रा. वऱ्हाडसमाचाकर्ते यासः—दारव्हाहून

वि. वि. आलिकडे अपोलय अकांत पुष्कळ ठिकाणचें वर्तमान एकण्यांत येत असल्यावरून एथीलही थोडीशी हकीकत कळवावी अशी इच्छा होऊन पुढील चार ओळी आपणाकडेस पाठविल्या आहेत, त्यांजला स्थळ मिळेल अशी आशा आहे.

येथें तालुकाकचेरी स्थापन झाल्यापासून हा गाव हळूं हळूं प्रसिध्धीस आल्यासारखा दिसतो. गावच्या भोंवताल सडका असून आंतही कांहीं सडका चुनेगच्ची गटर बांधून तयार केल्या आहेत. व त्या नेहेमीं स्वच्छ राखण्याविषयीं अधिकारी यांची सक्त नजर असते. ह्या गावास तिसरे वर्षी पाण्याची कमताई होत असें ह्मणतात. त्या वेळेस गावांत एक दोन विहिरी सिराजवरून बाकीच्या धान्यसाठविण्याजोग्या होतात आणि ज्यांत कांहीं पाणी असतें, त्या देखील पुढें टिकाव धरीत नाहींत. गावांत पाणी नसल्यामुळें गावाच्या बाहेरील विहिरी पहाव्या लागतात. त्या फार दूर असल्यामुळें गरीब गुरिबास उन्हांतून पाणी आणण्याचा फार त्रास होतो तो न व्हावा ह्मणून मेहेरबान डिपुटी कमिशनर साहेब बहादूर ह्यांनां येथील तहशिलदार यांच्या सूचनेवरून अशी तजवीज काढली होती कीं, येथून अर्धे कोसावर कुपटी नावाची एक नदी आहे तिला धरण बांधून तिचें पाणी गावानजीकच्या ओढ्यांत सोडावें; ह्मणजे पाण्याची तकलीफ होणार नाहीं. परंतु असें झाल्यानें पाण्यांच दूरत्वाचे मानानें साखेंच रहून फक्त विहिरींतून पाणी काढण्याचेंच काय ते श्रम वाचले असते. असो. वरील कामास सरकारांतून पांच हजार रुपयांची मंजुरात मिळाली होती असे ऐकण्यास बरेच दिवस झाले असून अद्याप त्या गोष्टीची कांहींच तयारी दिसत नाहीं यावरून तें काम राहित झालें कीं काय? कोण जाणे.

गेल्या २ वर्षांत पर्जन्य चांगला झाल्यामुळें उष्ण काळांत एथें पाण्याचा दुकळ पडला नाहीं यंदाचें तिसरें वर्ष असून अद्याप पावेतों बरसात सुरू होत नाहीं यामुळें लोक फार दिलगीर आहेत आणि पुढें असेंच झालें तर येत्या उन्हाळ्यांत खचित पाण्याचें दुर्भिक्ष्य होणार. ईश्वरकरो आणि तसा प्रसंग न येवो.

एथें एक लहान पण टुमदार असा सरकारी बगीच्या माजी तहशिलदार रा. रा. अंबादास संतो यांचे हातून स्थापन होऊन हल्लींचे तहशिलदार यांचे कारकीर्दीत बराच सुधारला गेला आहे परंतु तिसरे वर्षी पाण्याचे दुर्भिक्षामुळें पूर्ण दशास येईल असा भरवसा येत नाहीं तथापि बगीच्या व गावांतील सफाईच कामा आमचे तहशिलदार फार लक्ष्य देत असतात. हे दयाळू, सुशील, निरभिमानी व निःपक्षपाती असल्यामुळें उत्तम रीतीनें लोकप्रिय झाले आहेत. मध्यंतरीं ह्या जिल्ह्यातील तहशिलदार लोकांच्या बदल्या झाल्या त्या वेळेस ह्यांचीही कदाचित होईल असें वाटून लोक बरेच दिलगीर झाले होते परंतु तो प्रसंग टळल्यामुळें हल्लीं लोकांचीं मनें स्थीर झालीं आहेत.

एथील पोस्ट आफीस गावांत आहे परंतु त्यास आफीस हें नाव बिलकूल शोभत नाहीं. त्या खात्याचे अधिकारी चीफ इन्स्पेक्टर हे स्वतः कांहीं महिन्यांपूर्वीं हें आफीस पहाण्याकरितां आले असून त्यानीं एथें नवीन पोस्ट आफीस बांधण्याची तजवीज कांहींच केली नाहीं हें पाहून पराकाष्ठेचें आश्चर्य वाटतें. तर सदर्हू अधिकारी इकडे लक्ष्य देतील अशी पूर्ण आशा आहे.

येथें आपले दयाळु सरकारानें धर्मार्थ दवाखाना स्थापन केल्यास सुमार पांच वर्षें होऊन गेलीं. परंतु गावांतील लोक याचा विशेष अनुभव घेतातसें दिसत नाहीं; ह्याचें कारण एक तर डिस्पेन्सरी ही अगदी गावाच्या बाहेर आहे. आणि दुसरें त्या ठिकाणीं दवा देण्याकरितां जे डाक्टर नेमितात ते बहुधा मुसलमान व कधीं मद्राशी लोक असे असल्यामुळें इकडील हिंदु लोक जातीचा संकोच धरून औषधें घेण्यास जात नाहींत; ह्या मुळें डिस्पेन्सरी पासून लोक जास्त उपयोग क

रून घेतील अशी तजवीज आमचे सरकार करील तर फार चांगलें होईल. कळावें. दारव्हें, ता० ९ जुलै सन १८७६इसवी.

एक क्ष.


# वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य १० शके १७९८.


## पब्लिक वर्कस खात्याकडलि माहिती.

(अडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट १८७४)

या सालांत या खात्याकडे खर्चासाठीं रकमा मिळाल्या होत्या त्या खातेवार:—

| | रु० |
|---|---|
| लष्करी खातें | ५६००० |
| शेतकी खातें | ५०००० |
| सिविल खात्याच्या इमारती | २२७९३२ |
| रस्ते | २९७६०० |
| इस्टाब्लिशमेंट | १६३९६८ |
| हत्यारें | ४५०० |
| | ८,००,००० |

यापैकीं या सालीं ७२००६२ रुपये खर्च झाला.

लष्करी खात्यांत कामें झालीं तीं:— इलिचपुरास घोडेस्वार व पायदळ पलटण यांकरितां इमारती बांधिल्या. अकोल्यास काळ्या पायदळ पलटणीच्या लाइनीचें रूफ बदलून नवें घातलें. औरंगाबाद येथील गंधनाला पूल रुंद करण्याचें काम चालू आहे. लिंगसुगर येथें कांहीं कामें चालू आहेत.

सिव्हिल खात्याकडील कामें— उमरावतीस युरोपियन जेलर करितां व तार मास्तराकरितां घरें बांधिलीं व तुरुंगांत कांहीं नवीन सोपे काढिले. हायस्कुलाचें काम चालू, व सरकारी इमारतीला फेन्सिंग चालू. अकोल्यास तुरुंगांत कांहीं कामें केलीं व कांहीं चालू. इलिचपुरास मिडल क्लास स्कुलाचें काम व जतीच्या कामाकरितां कोठडी बांधण्य चें काम चालू. यवतमाळास तुरुंग बांधला व जप्तीचे मालाकरितां कोठडी बांधिली. वाशिमास तुरुंग बांधिला बुलढाण्यास डिपुटी कमिशनर कचेरीचें काम पुरें केलें. व नेटिव डाक्टराकरितां घर बांधिलें. वणीस तहशिलकचेरी बांधिली. मूर्तिजापुरास तहशिलकचेरी बांधली, पुसद येथें तहशीलकचेरीचें काम चालू. मेहकरास तहशिलकचेरीवर नवें रूफ घातलें व खजिन्याची जागा बांधिली. अकोटास सदर्हू प्रमाणें व खामगावास तार मास्तराकरितां घर बांधिलें.

या शिवाय यवतमाळ, बोरखडी, अकोला रिझर्व, अकोलापेठ, तळेगाव, खामगाव आणि मानोरा इतक्या ठिकाणीं पोलिस स्टेशनें बांधलीं.

अकोट, मलकापुर, खोरी, नांदुरा, उमरखेड, धामणगाव, वाशिम, तळेगाव, पातूर, हनशील, आणि इलिचपुर या ठिकाणच्या शाळा बांधण्यास मदत दिली.

धामणगावाहून यवतमाळचा रस्ता, इलिचपुराकडील पिली रस्ता, अकोल्याहून पातुरचा रस्ता, वाशिमाहून हिंगोलीचा रस्ता, शिगावाहून अकोटचा रस्ता, अकोल्याहून अकोटचा रस्ता, मलकापुराहून बुलढाण्याचा रस्ता, व खामगावाहून अमडापुर रस्ता या पैकीं कित्येक पुरे केले, कांहींस नाल्या बांधिल्या, कांहींवर भराव व मुरूम टाकिले व कांहींची पहाणी केली व चार धर्मशाळा बांधण्याचीं कामें सुरू केलीं. हीं या सालांतील रस्त्यासंबंधी कामें आहेत.

लोकलफंडाकडूनही शाळा, चावड्या, रस्ते, सराया, व लहान धरणें अशीं कामें झालीं व तीं सिव्हिल खात्याच्या देखरेखीनें झालीं आहेत.

खामगाव रेलवे सन १८७४ चे तारीख १ एप्रिल पासून तारीख १५ जून पर्यंत व तारीख १ डिसेंबर सन १८७४ पासून तारीख ३१ मार्च सन १८७५ पर्यंत चालू होती व आगगाडी बंद झाल्या पुढें लारीस चालू होतें. बारा महिन्यांत या रेलवेला उत्पन्न झालें व खर्च आला तो—

| | |
|---|---|
| उत्पन्न | २७८०३ रु० |
| खर्च | १४१६७ |
| नफा | १३७३६ |

यावरून खर्चाच्या किमतीवर शेकडा सुमार पावणेतीन रुपये नफा झाला. गुदस्त सालीं शेकडा नऊ आणे नफा झाला होता.

उमरावती रेलवे— ही रेलवे या सालांत अक्टोबर व नोवेंबर दोन महिने बंद होती व १० महिने चालू होती बंद असल्या महिन्यांत लारिस चालू होतें. या रेलवेचें बारा महिन्याचें उत्पन्न व खर्च येणेंप्रमाणें—

| | |
|---|---|
| उत्पन्न | ३०६४७ |
| खर्च | २९९६० |
| नफा रुपये | ६८७ |

हा नफा रेलवेस लागलेल्या खर्चाचें मानानें शंभर रुपयांस सुमार साडेनऊ आणे आला आहे. व हा जरी लहान आहे तरी मागील सालाशीं ताडून पहातां चांगला आहे. मागील सालीं शेकडा अकरा आणे तोटा झाला होता. सन १८७५ सालीं अनुभव पहाण्याकरितां सर साल आगगाडी चालू ठेवावी. आणि मालावर मणास ३ पै ज्यास्त घ्याव्या असा ठराव केलेला आहे.

तारायंत्रखातें—या खात्याचीं तीन कायमचीं आफिसें मागील सालाप्रमाणेंच आहेत. व कापसाचे हंगामांत अकोटास हंगामी आफिस ठेविलें होतें. या सालांत ५२९३ बातम्या पाठविण्यांत आल्या व ६४९८ बातम्या बाहेरून आल्या. एकंदर जमा ७१३२ रुपये झाली व खर्च रुपये ९१४४ रुपये झाला यावरून या खात्यांत कांहीं नफा नाहीं असें स्पष्ट दिसून येईल

पाटबंधाराखातें— या खात्याकडून वऱ्हाडांत कामें ह्मणण्यासारखीं कांहीं चालू नाहींत. व सरकारांतून सांगशनही जुजबी मिळतें. नळगंगेचा बंधारा बांधावयाचा होता त्याचे सुरवातीचें काम सन १८७५ चा पावसाळा होईपर्यंत तकूब ठेविलें. चिवण येथें बागाइताकरितां बंधारा बांधण्याचें काम या सालीं चालू होतें व वणी येथील तळ्यांत गाळ जमला आहे तो काढून नवे पाण्याकरितां साठवण करण्याचें काम चालू होतें. याकरितां कांहीं पैसा सरकारानें दिला, कांहीं लोकलफंडाकडून मिळाला व कांहीं लोकांनीं वर्गणी करून जमा केला. खेर येथें बागाइताकरितां नवीन बंधाऱ्याचें काम यासालीं चालू होतें. फत्तेखेलडा येथील तळें गाळानें भरून गेलें होतें तें यासालीं मोकळें केलें व रिसोडच्या तळ्याचें त्याप्रमाणेंच काम चालू केलें.

याप्रमाणें एग्झिक्युटिव इंजिनियराकडून ७२००६२ रुपयांचीं कामें झालीं व लोकलफंडाकडूनही ३१६०२० रुपयांचीं या शिवाय कामें झालीं आहेत. यावरून पहातां प्रतिवर्षीं सुमार दहा अकरा लक्ष रुपये वऱ्हाडांत सार्वजनिक कामाप्रीत्यर्थ खर्च होतात. हा पैशाचा विनियोग उत्तम आहे यांत संशय नाहीं.

## सर्पदंशावरील औषधाची परिक्षा

अकोल्यास ताजनापेठेंत हिंदुस्थानी शाळेवर मागें मि. महंमद इद्रूस नावाचे मास्तर होते. ते कांहीं औषधी जाणतात. मागें कांहीं दिवस खडकवासल्याच्या डिस्पेन्सरीवरही हे होते. सर्पदंशावर हे औषध देत असतात. मागें टाइम्समध्यें १।२ वेळां सर्पदंशावरील औषधाचेच संबंधानें यांचीं १।२ पत्रें प्रसिद्ध झालेलीं आह्मी पाहिलीं आहेत व या इतक्या दिवसाच्या उद्योगावरून हल्लीं त्यांस वाटलें कीं या रामबाण औषधाचे योगानें आपण जगप्रसिद्ध डाक्टर व्हावें. व रक्त पित्तविर नवें औषध योजून जसें कै. डाक्टर भाऊ दाजी नामांकित झाले तसे या सर्पदंशाचे नवीन औषधानें आपण नामांकित होऊन इंग्रज सरकारच्या सर्व डाक्टरांपासून जयपत्रें घेऊन आपला झेंडा मिरवावा. याप्रमाणें त्यांचा दृढनिश्चय झाल्यावर त्यांनीं मुंबई सरकारास अर्ज पाठावला कीं सर्पदंशावर उत्तम औषध आपण जाणतों व डाक्टर लोकांची आपण कमिटी भरवून आमच्या औषधाची प्रचीती पहावी. काम मोठें महत्वाचें समजून सरकारास ती त्यांची गोष्ट मंजूर झाली व त्यांनीं मुंबईच्या ग्रांट मेडिकल कालेजाचे प्रिन्सिपाल यांस महमद इद्रूस यांचे औषधाचा प्रयोग पाहून रिपोर्ट करावा असा हकूम झाला. व महमद इद्रूसही त्यांकडे हजर झाले तेव्हां त्यांनीं बाटलीवाल्याचे दवाखान्यांत परीक्षा पहाण्याकरितां या महिन्याची ५ वी तारीख नेमिली. त्या दिवशीं तेथें कित्येक डाक्टर व विद्यार्थी जमवून २ सर्प व २ कुत्रे आणविले. प्रथम एक सर्प एका कुत्र्यास चावविला तेव्हां तें तडफड करूं लागलें असें पाहून महंमद इद्रूस यांनीं त्या कुत्र्याचें तोंड दाबून नाकांतून कांहीं औषध त्यास पाजिलें तेणेंकरून त्यास थोडा गुण आल्यासारखा दिसला. पण सर्प कुत्र्यास डसिण्यापूर्वीं तोंडासी आकड्यानें दाबला होता व तो जमीनीवर घासल्यामुळें त्याचें विष कांहीं पडून गेलें होतें यामुळें कुत्र्यास जबर दंश झाला नाहीं व त्यामुळें औषधाचा गुण आला असें डाक्टर ह्मणाले. त्यावरून दुसऱ्या कुत्र्याची प्रचीती पहावी असें इद्रूस ह्मणाले तेव्हां लागलीच दुसऱ्या कुत्र्यास दुसरे सर्पाचा दंश करविला व त्याला औषधोपचार होत आहे तों सुमार १२ मिनिटांत त्यानें मृत्यूचा पंथ धरिला व २० मिनिटांत पहिलाही मरण पावला. तरी इद्रूस हे ह्मणाले कीं परीक्षा फार सक्त झाली मी मनुष्यास गुण येण्याच्या बेताचें सौम्य औषध आणिलें होतें ह्मणून असें झालें. आतां तुमची मर्जी असल्यास जाज्वल्य औषध उद्यां आणीन त्याचा प्रयोग पहावा. त्यावरून त्याचे संतोषाकरितां डाक्टरांनीं पुन्हां तारीख ६ गुरुवारची सकाळ त्या कामाकरितां नेमिली. व पुन्हा पूर्व दिवसां प्रमाणें २ सर्प व २ कुत्रे आणविले व सर्पाकडून कुत्र्यास दंश करविले व महंमद इद्रूस यांनीं आपलें औषध त्यांचे नाकांत पुष्कळ ओतलें पण त्याचें कांहीं फल न होतां दहा दहा मिनिटाचे आंतच दोन्ही कुत्रे मरण पावले व परीक्षा देण्यास आलेले गृहस्थ हिरमुसलेलें तोंड करून आपले घरीं गेले.

मि० महमद इद्रूस यांणीं ही विनाकारण अप्रतिष्ठा व हसें करून घेतलें आणि बिचाऱ्या चार जिवांचा वध केला असें आह्मी ह्मणतों. त्यांनीं आपल्या औषधाचा प्रयोग प्रथम खासगी रीतीनेंच एकादे जनावरावर करून पहावयाचा होता व तो चांगला प्रत्ययास आला असता तर सरकारांत अर्ज करून परीक्षेस उभे रहावयाचें होतें. असतु. जें झालें तें त्यांचे अधिक प्रसंगास योग्य झालें. तरी यावरून दुसऱ्या कोणा औषधी जाणणारांची पुढें येण्याची उमेद न खचो व एकादें खात्रीचें औषध प्रत्ययास येवो असें आम्ही इच्छितों.

## वऱ्हाड.

दिवाण साहेब सर सालरजंग यांचा पाय बरा होत चालला आहे व ते गाडींत बसून शहर पहाण्यास निघत असतात असें विलायतेकडील खबरेवरून समजून आह्मास संतोष होतो.

हैदराबादेस या महिन्याच्या अखेरीस जी. आय. पी. रेलवेचे मुख्य मुख्य कामदार जमून तिकडील स्टेट रेलवे संबंधी कांहीं विचार होणार आहे असें समजतें.

स्यानिटरी कमिशनर डा. आवट साहेब यांचे गैरहजेरींत इलिचपुर छावणींतील डा. ईवस यांना काम पहाण्यास नेमिलें आहे.

उमरावतीस चोऱ्या फार होऊं लागल्या व पोलिसाकडून त्यांचा बंदोबस्त होत नाहीं याजविषयीं फार बोभाटा झाला आहे मुंबईच्या व पुण्याच्या पत्रांतूनही या गोष्टीची हाकाटी झाली आहे. न पावलां. च्या वऱ्हाडसमाचारांत थोडे दाभोळकर यांच्या उमरावतीचे चोऱ्यांचे संबंधाने खबर फिर्याद झाली अनुलक्षून एक पत्र प्रसिद्ध झालें १३ जुलै रोजी बाबदींत पोलिसाचे मुख्याधिकारी मजला नाहीं.

कमिशनर साहेबांनीं खुलासा मागितला असेंही प्रसिद्ध झालें आहे. तें खरें असेल तर फार चांगलें. व येणेंकरून वर्तमानपत्रांतील लेखांवर सरकारचे अधिकारी चांगलें लक्ष्य पुरवितात हें सर्वत्र प्रसिद्ध होईल, दुसऱ्या खात्यांतील कांगाळ्या बाहेर येतील, व वर्तमानपत्रांतून लिहिणारे काळजीपूर्वक जें खरें असेल तेंच लिहितील. ही सुधारणा सामान्य नाहीं.

अकोल्यास मि. वजीरखा नावाचे या आठवड्यांत एक मोठे गवई आले आहेत त्यांस नागपुरकरांचे पदरीं ५०० रुपये दरमहा होता असें ह्मणतात. ते फार उत्तम गातात. एथील मंडळीनीं गुरुवारीं रात्रीं त्यांचें गाणें करविलें व त्यांस ५० रुपये बिदागी दिली.

येथील वकील रा. रा. त्राबाजी रामकृष्ण पांडे यांची सनद ते खामगावास असतां कांहीं प्रकरणावरून रद्द करण्याविषयीं मागें लिहून जाऊन त्याप्रमाणें अंमलही झाला होता पण हल्लीं त्याविषयीं विच्यार होऊन त्यांस सनद माघारी द्यावी असा ठराव झाला आहे.

मि० डिसोजा साहेब अकोल्याचे रेलवेकडील परमेनंट वे इन्स्पेक्टर या विरुद्ध कांहीं बिगारी लोकांनीं लाच मागतात वगैरे मजकुराचे अर्ज केले होते ते त्यांचे वरिष्ठानीं पाहून रेलवे माजिस्त्रेटकडे त्यांची चौकशी व्हावी असा हुकूम केला त्याप्रमाणें ११ वे तारखेस मूर्तिजापुर मुक्कामीं मि० हेर साहेब यांपुढें त्यांची चौकशी झाली. त्यांचे तर्फे काम चालविण्यास रा. रा. देवराव विनायक वकील गेले होते. माजिस्त्रेटानीं डिसोजा साहेब निर्दोषी आहेत असें ठरविलें.

रा. रा. बाळकृष्ण शास्त्री बापट उमरावतीचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर तीन महिन्याचे रजेवर गेले होते ते गुरुवारीं येथें आले. आज उमरावतीस जाणार आहेत.

मि० टी हामिलटन अकोल्याचे एक्झिक्युटिव इंजिनियर विलायतेस रजेवर आहेत ते पुढील महिन्यांत येथें येतील असें समजतें;

क्याप्टन रेनिक साहेब इलिचपुरचे असिस्टंट कमिशनर व क्यांटनमेंट माजिस्त्रेट गेले सोमवारीं आपले कामावर रुजू झाले.

येथील सिव्हिल आस्पितळावरील अपाथिकरी जे पिट्स यांस लष्करी खात्याकडे दिले. व त्यांचे जागेवर असिस्टंट अपाथिकरी जे रीड यांची नेमणूक झाली.

हिंदुस्थानसरकारचे ग्याझेटवरून समजतें कीं मि० एदलजी जामासजी आणि मि० सी. भीमराव यांस हैदराबादच्या रेसिडेंट साहेबाकडे अस्या ची नेमिलें. यांतील [illegible] नाव चुकलें आहे. तें एदलजी बहिमन [illegible] पाहिजे. आमचे मे. द. बहिमनजी लक्ष पुर[illegible]स्टंट कमिशनर यांचे चिरंजीव एथील [illegible]जी बहिमनजी यांस अस्याचीची आश्रय [illegible]ळाली. हें पाहून आह्मास संप्रमाणें [illegible]टतो. यांस प्रथम वयांत यांच्या कुळाच्या भूषणाप्रमाणें उत्तम महत्वाची ह्मणजे राजे, नबाब वगैरेस मिळावयाची तीजागा मिळाली हें यांचे सद्भाग्यास व हुशारीस अनुरूप झालें. मि० एदलजी आजपर्यंत आपले वडील व चुलते जे एकाहून एक प्रतिसूर्य त्यांचे तेजानें प्रकाशित होते ते आतां स्वगुणानें ख्यात होत्साते स्वयंप्रकाशी होण्याचे मार्गास लागले. तर हुशारीनें व काळजीनें ते सरकारी कामें करून उत्तरोत्तर अधिक वैभवास चढोत असें आह्मी इच्छितों व मागील ओघावरून अप्रतिबंध तसें घडेल अशी उमेद बाळगतों.

हवामान—या आठवड्यांत आकाश नेहमीं पयोधर मेघांनीं आच्छादित असे व मधून मधून स्वच्छ ऊन व चांदणें पडत असे. पाऊस बिलकूल आला नाहीं. हवेंत गारटा नाहीं तरी उष्णतेचें मान पुष्कळ कमी झालें आहे. तूर्त रोगराई विशेष नाहीं पण पावसाची जरूर आहे.

सबरजिस्टरच्या नेमणुका----अकोल्यास रा. रा. सखाराम महादेव यांस ४० रुपयांवर नेमिलें. तसेंच उमरावतीस रा. रा. आनंदराव यांस ह्याच पगारावर नेमिलें. बुलढाणे जिल्ह्याकरितां रा. रा. नारायण केशव यांस ४० रुपयांवर नांदुऱ्यास नेमिलें. मि. हणमंतराव ह्यांना ७५ रुपयांवर अडगावास नेमिलें.

वऱ्हाडचे डेपुटी कान्सरवेटर आफ फारेस्ट मि. ए. डी. ड्रेसडेल याना कायम केले.

रा. रा. खंडेराव यशवंत नायब तहशिलदार मेहेकर यांना थर्ड क्लास माजिस्त्रेटचे अधिकार दिले.

मि. गोविंदराजअय्या मोर्शीचे तहशिलदार ह्यांना खाजगी कामाकरितां दोन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

रा. रा. वासुदेव त्रिंबक नायब तहशिलदार दारव्हा ह्यांना तिसरे क्लासचे माजिस्त्रेटचे अधिकार दिले.

मि. मीर इनायतहुसेन तहशिलदार उमरावती ह्यांना तारीख २४ जुलै पासून ३९ दिवसांची रजा मिळाली.

मि. ए. एच. हीथ आफि. डि. सुपरिंटेंडेंट पोलिस उमरावती ह्यांना तारीख २९ जुलै पासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

मे० जुडिशियल कमिशनर मेजर अलार्डाईस हे थोड्या दिवसांत हैदराबादेस जाऊन येणार आहेत असें ह्मणतात.

शेट भगुलाल ताराचंद यांचे एथें नारायण महिपत माजी नाजर यांचे दागिने ठेविलेले आहेत अशी खबर मिळाल्यावरून मे. दस्तुर बहिमनजी साहेब, उमरावतीचे क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. एकनाथ मोरेश्वर कान्हेरे, व एथील तहशिलदार यांनीं त्या दुकानची मालकीण पन्नाबाई इचे एथें काल दोन प्रहरीं जाऊन जप्ती केली व खोल्यांना कुलुपें लाविलीं असें समजतें. नाजर महात्म अजून फैलावतच आहे!

येथील विद्याखात्याचे डायरेक्टर रावसाहेब नारायण भाई दांडेकर हे थोडे दिवसांत उमरावतीस जाणार आहेत.

विंचवाच्या दंशावर औषध हजारीबाग येथील मि० गालाघर नावाच्या मनुष्यानें शोधून काढिलें आहे तें असें:—विंचू चावतांच एक चिंचोका घेऊन तो चपट्या भागाकडून दगडावर पांढरा होईपर्यंत त्वरेनें घांसून जखमेवर ठेवावा आणि दोन मिनिटें आंगठ्यानें तेथेंच दाबून ठेवावा ह्मणजे तेथलें सर्व विष शोषून घेईपर्यंत तो तेथें चिकटून रहातो आणि सर्व विष सरलें ह्मणजे आपोआप तेथून सुटून दंश झालेला मनुष्य हुशार होतो.

हिंदुस्थानसरकारानें ठराव केला आहे कीं सरकारीपगारदारानीं आपले हुद्याचें काम योग्य रीतीनें करण्याबदल स्वतां लिहून दिलेले अथवा जामिनाकडून दिलेले करारास स्टांप लागत असे तो या पुढें लावण्याची जरूरी नाहीं.

मूर्तिजापुर येथील जप्तीकारकून रा. गोपाळ रघुनाथ यांणीं सरकारी पैसा खाल्याबद्दल यांस २ वर्षें सक्तमजुरी कैदेची शिक्षा झाली.

अकोला येथें बाजारांत नवीन तऱ्हेचीं चांगलीं दुकानें बांधण्याकरितां कित्येक लोकांनीं जागा मागितल्यावरून या आठवड्यात म्युनिसिपाल कमिटीनें थोड्या जागा विकल्या. त्यांचे ४७९ रुपये आले. अजून पुष्कळ मागणी आहे व जागाही पुष्कळ विकावयाच्या आहेत. लोखंडी मार्केट बांधलेलें आहे त्याचे चौफेर नवीन तऱ्हेचीं दुकानें करून बाजार सुशोभित करण्याचा मे. दस्तुर बहिमनजी साहेब यांचा विच्यार आहे. व ते त्या कामीं फार परिश्रम करीत आहेत व लोकही त्यांच्या मतास अनुकूळ आहेत ही संतोषाची गोष्ट होय. अकोल्याच्या बाजाराचे कामीं मे० बहिमनजी साहेबांनीं जसें इतकें लक्ष पुरविलें आहे त्याप्रमाणेंच कापसाचा तग पुन्हा एथें स्थापन होण्याचे कामीं ते चित्त पुरवितील तर खरोखर अकोल्याची स्थिति सुधारेल असें आह्मास वाटतें.

अलीकडे थोडे दिवसांत सोनें महाग झालें आहे व तें दिवसेंदिवस अधिकाधिक महाग होत चाललें आहे. या आठवड्यांत पुणें मुंबईकडील भाव २३।२४ रुपये तोळ्याचा लिहून आला आहे. सुमार १७।१८ रुपयांनीं सोनें हमेशा मिळत असे तें इतकें महाग झालें याबद्दल लोकांस फार आश्चर्य वाटतें. याचें कारण असें सांगतात कीं रुप्याची किंमत फार उतरली. आपला सुर्ती रुपया हल्ला जो प्रचारांत आहे त्याची किंमत १२ आणे सुमार झाली आहे. व त्यामुळें विलायतेंत व्यापारी लोक रुपया हातीं धरीनातसे झाले आहेत त्यामुळें सोनें विलायतेस जाऊं लागलें आहे व त्याकरितां सोन्याचा दर चढत चालला आहे. रुप्याचा दर कमी होण्यास आणखी एक असें कारण झालें आहे कीं युनैटेडस्टेट एथील सरकारानें रुप्याचें नाणें चालू होतें तें बंद केलें आहे. व त्यामुळें रुपें पुष्कळ होऊन त्याचा दर उतरला आहे असें ह्मणतात. विलायतेस पैसे पाठवितात त्यांच्या हुंडीचाही भाव हल्लीं बराच चढला आहे. सुमार ५ रुपये शेकडा सरासरी भाव असतो तो २५ चे वर प्रस्तुत झाला आहे. विलायतेहून माल आणवून देणाऱ्या कंपन्या आपल्या छापील दराप्रमाणें हल्लीं माल देत नाहींत. अशा एकंदर स्थितीनें देशांत तूर्त मोठी हालचाल होऊन राहिली आहे, सोनें चढत जाऊन रुपया उतरत चालला आहे व पर्जन्यानें ही डोळे वटारले आहेत तेव्हां पदार्थांचे भावही चढतील असें दिसतें. आणि तसें झाल्यानें गरीबगुरिबास व ज्यांची नियमित प्राप्ती अशा सरकारी व इतर नोकरांस नुकसान सोसावें लागेल असें दिसतें.

## सिंक्लेर मेमोरियल फंड.

| | |
|---|---|
| रा. हरी मोरेश्वर हे. मा. मलकापुर | १० |
| रा. रामचंद्र आबाजी अ. मा. अकोला | ५ |
| | १५ |
| मागील जमा | ९९४ |
| | १००९ |

## वर्तमानसार

मनमाड पासून दौंड पर्यंत रेलवे लैन वहवयाची त्याकरितां मि० हामल साहेब ए. इंजिनियर, मि० नेवल साहेब व मि. व्हाईटफोर्ड सा० आणि त्यांच्या हाताखालीं मि० गणेश हरी सर्व्हेयर सोलापूर व लक्ष्मण पांडुरंग सर्व्हेयर खानदेश व मि० हाईम सालमन सर्व्हेयर कलादगी व मि. शेख महमद सर्व्हेयर सातारा याप्रमाणें नेमिले आहेत. प्रथम हिवरे एथें सुरुवात होणार. कारण त्या ठिकाणीं बोगदा करावा लागतो तो चुकविणार आहेत. काम मोठें झपाट्यानें चालवून ६ महिन्यांत सर्व्हे अटपावी असा सर० चा हुकूम आहे.

पुण्यास कसब्यांत व नारायण पेठेंत महामारीचा तुरळक उपद्रव सुरू झाला आहे ह्मणून बंदोबस्ताकरितां गावांत २ ठिकाणीं डाक्टर ठेविले आहेत.

प्रसंग आल्यास हिंदुस्थानांतून ४०००० गोरी फौज लढाईवर पाठवितां येईल असा शोध काढिला आहे.

माळव्यांत चहाचें पीक असामापेक्षां चांगलें होईल असें ह्मणतात.

मद्रास व पांदीचरी याजमध्यें रेलवे होणार आहे.

मणिपुरचे पो० एजंट डा ब्राउन यांस सस्पिंड केलें आहे.

बंगाल ब्यांकेला सहा महींत रुपये १३७०००० फायदा झाला. त्यांतून १० लाख रुपये मालकास वाटले.

लार्ड लिटन साहेब गवरनर जनरल येत्या हिवाळ्यांत म्हैसुरास जाणार आहेत.

कलकत्याहून ४७००० रुपयांचा खुर्दा मुंबईस अगगाडीनें आला. असाच पूर्वींही आला होता.

पंढरपुरास आषाढी एकादशीच्या यात्रेच्या प्रसंगीं महामारीचा उपद्रव होऊन दररोज २५।३० मनुष्यें मरण पावलीं.

कै० नारायण वासुदेव दाभोळकर यांच्या बायकोप्रकरणी ज्ञानप्रकाशावर फिर्याद झाली आहे तिची चौकशी ता० १३ जुलै रोजीं नेमिली होती. निकाल समजला नाहीं.

तारेंतून वर्तमान आलें आहे कीं सरव्हियन फौजेची व तुर्क लोकांची लढाई सुरू झाली. ते लोक तुर्कस्थानचे हद्दीचे आंत शिरले पण त्यांचा पराजय झाला व २००० लोक मरण पावले.

## विंजर कासल.

विलायतेंत आपल्या राज्यकर्त्या विक्टोरिया महाराणी साहेबांचे चार मोठाले राजवाडे आहेत. ते निरनिराळ्या ठिकाणीं असून जशी त्यांची हौस असेल तशा त्या त्यांत रहातात. विंजर कासल सर्वांमध्यें मोठा व सुंदर आहे. तो लंडन शहरापासून सुमारें २२ मैल आहे. त्याच्या सभोंवतालचा दोन चार कोसांचा प्रदेश त्याचाच बागबगीचा आहे. त्यांत मोठमोठाले व फार दिवसांचे वृक्ष आहेत कित्येक वृक्षांचें वय पत्र्यावर लिहिलें आहे. तेथें हरण, ससे, आणि नानाप्रकारचीं रानजनावरें अगदीं निर्भय रहातात. कारण त्यांस तेथें कोणी मारूं शकत नाहीं. त्या बागेमधून जिकडे तिकडे सुंदर रस्ते काढले आहेत, आणि अनेक ठिकाणीं कारंजीं उडत असतात. एक मोठा व सुंदर तलावही केलेला आहे. त्यावर राणी साहेबांच्या लहान लहान नावा चालतात

राजवाड्यांतल्या खोल्या इतक्या छानदार आहेत कीं त्यांचें वर्णन करावयास कठीण पडतें. युरोपाच्या नामांकित चितान्यांपैकीं कित्येकांनीं त्यांच्या भिंतीवर सुशोभित चित्रें व फुलांच्या माळा काढिल्या आहेत, आणि पूर्वींच्या राजांच्या व दुसऱ्या नामांकित मनुष्यांच्या तसबिरी जिकडे तिकडे टांगल्या आहेत. खोल्यांतील मेज खुर्च्या इत्यादि सामान इतकें उंची आहे कीं, फक्त एकाच लहान खोलींतील सामानाला दीड लाख रुपये पडले. भिंतीवर खिडक्यांच्या दोहों बाजूंस असे उत्कृष्ट पडदे टांगले आहेत कीं, एकेकावरचें वेलबुटीचें काम बनवायाला एकेका स्त्रीला आयुष्यभर लागलें असेल. एका खोलींतील पडदे व दुसरें सामान सर्व असमानी रंगाचें असल्यामुळें तिला असमानी खोली ह्मणतात; दुसऱ्या खोलींतील सामान केवळ लाल असून तिला लाल खोली ह्मणतात. अशींच दुसऱ्या खोल्यास दुसऱ्या रंगांचीं नावें दिलेलीं आहेत.

पृथ्वींतील सर्व राजवाड्यांपेक्षां जरी हा सुंदर आहे, तरी त्यांतील रहाणारे त्याला नुसतें "आमचें घर" असें ह्मणतात. हें सुंदर "घर" कदाचित् आमच्या वाचकांच्या दृष्टीस कधीं पडणार नाहीं, पण देवाचें घर, जें स्वर्गांत आहे. तें यापेक्षांही अवर्णनीय सुंदर आहे आणि जर आपण देवाचीं लेंकरें होऊं, तर तें आपलेंच घर असें होईल; आणि आपण तेथें राहूं व राज्य करूं.

ज्ञा. द.

## नोटिस.

गणाजी वलद मानाजी माळी भुसकट वस्ती कसबे वाडेगाव तालुके बाळापुर जिल्हे अकोलें यांस देवराव भगवान नारगुडी रहाणार कसबे मजकूर जिल्हे मजकूर याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मी आह्मास उर्दू अखबारांतून नोटिस दिली कीं, तुमचे आमचे तकशिमी पैकीं २६२॥ रुपये फिरतात ते द्यावे. ही नोटिस तुह्मी अगदीं खोटी दिली आहे. मी प्रथम तुमचे एथें नोकरी १६ महिने केली त्याबद्दल दरमहा ६ रुपयेप्रमाणें ९६ व नक्त ९६ एकूण १९२ रुपये तुमशीं तकशीम करते वेळीं नफ्या तोट्याकारितां तुह्मांपाशींमी धरवर ठेविले व पुढें तकशिमींत व्यापार केला या व्यापारांत तोटा वगैरे कांहीं एक झाला नसून बरोबरी झाली पुढें कारंजेकर व्यापाऱ्याचे रुपये तोडते वेळीं तुमचा आमचा तकशिमीचा हिशेब पंचाचे समक्ष तुटला त्यांतील त्यांझा कांहीं एक राहिला नाहीं. माझे धरवर असलेले १९२ रुपये तुह्मी २ महिन्यांनीं देतों ह्मणून करार केला त्यास हल्लीं १२ महिने गुजरून गेले पण आपण देतों देतों करून दिले नाहींत व अलीकडे मी निकडीनें मागत असतां तुह्मी मजवर खोटी नोटिस माझे अनामतीचे रुपये पचविण्याचे इराद्यानें दिली पण अशा बेमानीनें ते धरवरीचे रुपये पचणार नाहींत करितां ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत सदर्हू रुपये माझे मला द्यावे नाहीं तर फिर्याद करून रुपये घेतले जातील व फिर्यादीचा आणि या नोटिशीचा खर्चही तुह्मापसून घेतला जाईल हें खूप समजावें. कळावे तारीख १३ माहे जुलै सन १८७६ इसवी.

( सही ) देवराव भगवानजी नारगुडे
रहाणार कसबे वाडेगाव
दस्तुर खुद्द

### नोटिस.

दालुराम बनसिधर साहू वहिवाटदार रघुनाथदास मारवाडी दुकान दहिगाव प्रगणें बडनेरगंगाई तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें कीं सन १२८३ फसलीच सालापासून तुमची व आमची देवघेव झाली त्यानंतर आह्मी आलीचा रोजगार करून तुह्मापासून शेकडो रुपये नेत होतों व तसेच देतही होतों परंतु तुह्मी आपले खात्याच्या हिशेबानें मजवर रकम कायम केली आणि रकम कायम करून दस्तैवज हे तेसमयीं आह्मास तुह्मी भुलथाप दिली कीं दस्तैवज लिहून द्यावा ह्मणजे आह्मी सर्व हिशेब दाखवू. त्यानंतर आमची सालबंदी देणें सुरू करावी अशा नेमाप्रमाणें तुह्मी आह्मापासून दस्तैवज लिहून घेऊन हिशेब मागत असतां तुह्मी दाखवित नाहीं तर ही नोटिस पोंचल्यापासून पंधरा दिवसाचे आंत आमचे मनाची निर्मळता हिशेब दाखवून करावी अगर सदरहू मुदतीचे आंत तुह्मी हिशेब दाखविणार नाहीं तर ज्यास्त वसूल घेतल्याबद्दल योग्य कोर्टांत दावा करून नोटिसीच्या खर्चासुद्धां भरून घेऊं कळावे तारीख १२ जुलै सन १८७६ इसवी.

( सही ) जानजी वलद नारायण
ह्माली मौज दहिगाव ता०
अकोट निशाणी
खुद्द हातची

### नोटिस.

ती. रा. रा. बामनराव वासुदेव व माधवराव वासुदेव आणि दामोदर वासुदेव इनामी जहागिरदार संस्थान मोव्हरी डिघोळ वगैरे तालुके जामखेड जिल्हा नगर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते तीं कलमें अशीं—

१ वासुदेवराव मेघःशाम इनामी जहागिरदार हे तुमचे व आमचे तीर्थरूप यांणीं लग्नाच्या ३ बायका केल्या. त्यांत वडील बायकोचे तुह्मी त्रिवर्ग, मधले बायकोचा मी एकटा आणि धाकटे बायकोचीं ३ मुलें. याप्रमाणें वासुदेवराव यांची आवरस पुत्र संतती हल्लीं कायम असून त्यांचे इस्टेटीचे मालक आहेत.

२ वासुदेवराव हे थोडे दिवस झाले मरण पावले ह्मणून मी गेल्या मे महिन्यांत आपला हिस्सा तुह्मी वडील असले कारणानें मागण्यास आलों होतों त्या वेळेस एका गृहस्थाच्या द्वारें तुह्मास हिस्सा देण्याविषयीं विच्यारलें असतां तुह्मी देण्यास कबूल झाला परंतु आमच्या कांहीं अटी असलेल्या कबूल झाल्या नाहींत ह्मणून मी हिस्सा घेतला नाहीं.

३ वासुदेवराव यांच्या स्वकष्टार्जित व वडीलोपार्जित व ते जीवंत असता तुह्मी मिळविलेल [illegible] अशा इस्टेटाचा स्थावर व जंगम एकंदर सर्व जहागिरींत सातवा हिस्सा माझा आहे तो तुह्मी ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत पाठवून देण्याची तजवीज करावी. सदर्हू मुदतींत हिस्सा न दिल्यास नोटिसीचे खर्चासह दिवाणी कोर्टांत फिर्याद करून भरून घेण्यांत येईल

४. तुमचा व आमचा सापत्न संबंध असल्यानें तुमचा व आमचा द्वेष आहे. ह्मणून आह्मास कांहींएक मिळू नये या हेतूनें तुह्मी वासुदेवराव यांचे नावचें पोकळ गहाणखत कांहीं इस्टेटीवर तुह्मी आपले मामाचे नावचें करून दिलें आहे. त्या गहाणखताचा पैसा मला माझ्या हिश्याप्रमाणें मागता त्यांस वासुदेवराव हे जिवंत असतां त्यांनीं सदर्हू खत पोकळ झालेलें आहे मी पैसा राजेंद्र याजकडून कर्जाऊ घेतला नाहीं व तें खत माझे दप्तरांत असलेलें तुह्मी चरून नेलें आहे ह्मणून वगैरेबद्दल नोटिसीनें कळविलेंच होतें यावरून स्पष्ट होतें कीं. त्यांनीं राजेंद्र यांजकडून कर्जाऊ पैसा घेतला नाहीं व त्यांजला तो दस्तैवजही कबूल नव्हता. तुमची मर्जी असल्यास तुह्मी आपले हिश्शावर सदर्हू दस्तैवजाचा पैसा आदा करावा. मला तें कबूल नाहीं.

५ तुह्मी आपले मयत बंधूचे बायकोस आपले मतलबासाठीं आपला एक मुलगा दत्त दिला आहे त्याचा हिस्सा द्या ह्मणून ह्मणता त्यास सदर्हू मुलाचे सशास्त्र दत्तविधान झालेलें नाहीं व अधिकारपत्र असल्यावाचून विधवेस दत्त घेण्याचा हक्क नाहीं व ज्या वेळेस दत्तविधान झालें ह्मणता त्या वेळेस सरकारचे परवानगीची आवश्यकता होती व सर्व भाऊबंदाची मान्यता पाहिजे होती याप्रमाणें एकही झालेलें नाहीं सबब तें कबूल नाहीं. कळावें तारीख ११ जुलै सन १८७६ इसवी.

[ सही ] रामचंद्र वासुदेव जहागिरदार संस्थान मोव्हरी

### नोटिस.

महादू वलद कृष्णा शिंपी रहणार पिंपरी गवळी तालुके खामगाव यास अजबसिंग वलद महताबशिंग रजपुत दुकान पिंपरी गवळी याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं बापू पाटील यांची जागा सरकार मार्फत आमचे मालकीची होऊन आमचे कबजांत आलेली आहे. त्या जागेवर तुह्मी दुकान लावलें आहे तें काढण्याविषयीं तुह्मास १।२ वेळां कळविलें असतां अजून काढलें नाहां ह्मणून ही नोटिस मुद्दाम दिली आहे तर नोटिस पोंचल्यापासून ८ दिवसाचे आंत तुह्मी आपले कुडाचें छप्पर व कूड काढून न्यावें, न न्याल तर तुह्मापासून दरमहा ५ रुपये या जागेचें भाडें घेतलें जाईल. व ती जागा तुह्मास विकत घेणें असेल तर ५० रुपये रोख नोटिसीचे तारखेचे आंत आणून द्यावे. व भाड्यानेंच रहाणें असेल तर भाडेचीठ्ठी लिहून द्यावी. व या पैकीं कांहींच न कराल तर तुह्मावर दिवाणी कोर्टांत दावा करून खर्चासुद्धां रकम भरून घेतली जाईल व या नोटिसीचा खर्चही तुह्मास द्यावा लागेल. कळावे तारीख १२ जुलै सन १८७६ इसवी.

[ सही ] अजबशिंग वलद महताबशिंग रजपुत दस्तुर खुद्द

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY.

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे

NOTICE

## नोटिस

CLOSING OF THE KHAMGAON [ STATE ] RAILWAY.

## खामगाव (सरकारी) रेलवे बंद करण्याविषयीं.

सरकार हुकुमावरून असें जाहिर करण्यांत येतें कीं, खामगाव सरकारी रेलवे तारीख १५ माहे जुलै सन १८७६ इसवी रोजि शनिवार या दिवशीं व त्या दिवसापासून पुढें दुसरा हुकुम होईपर्यंत बंद करण्यांत येईल.

याकरितां तारीख १४ शुक्रवारच्या नंतर खामगाव व जी. आय. पी. रेलवेचें स्टेशन जलम यांचे दरम्यान आगगाड्या जाणार येणार नाहींत; आणि शनिवार तारीख १५ या दिवशीं व तेव्हांपासून पुढें या स्टेशनाकरितां किंवा थेट दुसरीकडे जाण्याकरितां टिकिटा देण्याच्या सर्व व्यवस्था रहित आणि रद्द केल्या आहेत.

**हेनरी कांडर,**
जनरल ट्राफिक म्यानेजर
मुंबई ता० ४ माहे जुलै सन १८७६ इसवी.

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १०　अकोला रविवार ता० २३ माहे जुलै सन १८७६ इ०　अंक ३०

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

वि. वि. महाराज जरूड हा गाव मोर्शी पासून आठ कोसांवर पूर्वेकडे आहे. येथून एक कोसावर वरूड गावीं पोष्ट आफिस व पोलिस स्टेशन असून मोर्शी हा तालुक्याची जागा आहे. पूर्वी वरूड येथेंच तहशिल कचेरी होती.

पूर्व वऱ्हाडांतील मोर्शी हा तालुका इतर तालुक्यांपेक्षां पर्वताला सन्निध असून याचा पूर्वेकडील भाग दोन डोंगरांच्या मधे आहे. येथून नागपुर इलाख्याची सरहद चार पांच कोसांवर उत्तरेच्या बाजूनें व आठ कोस पूर्वेच्या बाजूनें असून दक्षिणेच्या अंगीं पांच सहा कोसांवर नागपुरची हद लागते. याचा उत्तरेकडील भाग सातपुड्यानें वेष्टित असून पूर्व दक्षिण भाग वर्धा नदीनें वेष्टित आहे

उमरावतीहून सडकेनें मोर्शीस येऊं लागलें ह्मणजे मोर्शीच्या मार्गे ४।५ कोसांवरून असा कांहीं चमत्कारिक व भयंकर देखावा दिसूं लागतो कीं सातपुडा पर्वत हाच कोणी पृथ्वीचा शेवट असून मत्त गजाप्रमाणें आपल्या विक्राळ शुंडा [ टेकाडें ) सूर्यास अडिवण्याकारितां वर करून हात पाय मोकळे चाकळे सोडून बसला आहे कीं काय ? व मोर्शींत जाणाराला असें वाटतें कीं आपण या विस्तीर्ण पाहाडांतच जात आहो. व या भव्य अरण्यांत रहाण्याचें नवीन प्रवासी तर तेथूनच नाकारून परत जाईल.

असा जरी तेथें भास होतो तथापि मोर्शीच्या पुढें तीन कोसांवर हिवरखेडें ह्मणून गांव आहे व तो गांव दोन डोंगर चिलनींत असून पुढें उत्तम खोरें लागतें. हिवरखेडें हा झाडी प्रांताचा दरवाजा ह्मटल्यास साजेल. तेथून इकडे ह्मणजे जरूड वरूड शेंदुरजण वगैरे गावें चांगलीं व मोठालीं आहेत. इकडे बागाईत फार असून पुष्पें फळें भाजी पाला वगैरे चांगला असून विड्याच्या पानांचे तांडे गांवोगाव फार आहेत. हवा वऱ्हाडा प्रमाणें नसून पाणी किंचित जड आहे.

इकडे पाऊस आजपर्यंत नव्हता परंतु या आठवड्यांत चांगला पडला पिकांचें स्वरूप बरें आहे. जोंधळ्याची पेर सुरू आहे कळावें. बाकी पुढें लिहीन. मु. जरूड ता. मोर्शी तारीख १९ माहे जुलै सन १८७६

तुमचा बातमीदार

क्ष.

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुध्द ३ शके १७९८.

## शेतकीची सुधारणा.

हिंदुस्थान देशांत जमीन पुष्कळ व ती पिकाऊ चांगली पण तिची मेहेनत बरोबर होत नसल्यानें व तिला नवीन पौष्टिक साधनें बरोबर मिळत नसल्यानें ती अगदी निकस होऊन गेली आहे. व तेणें करून लक्षावधि लोकसमूह जो शेती काम करणारा तो केवळ दरिद्री व बुभुक्षीत राहून इतर सुधारणांच्या केवळ पराङ्मुख झाला आहे हें पाहून देशहितेच्छु लोकांस फार वाईट वाटतें. इतर शकडों सुधारणा या वरपंगी आहेत आणि शेतकीची सुधारणा ही साऱ्या देशाची अतरंग सुधारणा होय सबब तिजविषयीं जे लोक झटतील ते देशाचे खरे हितेच्छु व ईश्वराचे वरदहस्त समजावयाचे.

आपणास शहाण्या व कुशल इंग्लिश लोकांचा सहवास आज पांच पन्नास वर्षे मिळाला पण त्यापासून आपल्या शेतकीची कांहीं सुधारणा झाली नाहीं. हें खालील टिपणावरून दिसून येईल.

ऐनअकबरी ह्मणून ग्रंथ आहे त्यांत २०० वर्षांपूर्वीची पिका पाण्याच्या संबंधानें माहिती दिली आहे तिजवरून समजतें कीं, आपले देशांत त्या वेळीं दर एकरास २२३ रत्तल कापूस होत असे. पुढें हें मान इंग्रजी अमलाच्या सुमारास १२८ रत्तलावर आलें. नंतर कांहीं वर्षांनीं ६७ रत्तल होऊन हल्लींच्या काळीं फार कापूस पिकला तर दर एकरास ९२ रत्तल हें परिमाण झालें आहे. तसेंच दोनशें वर्षां पूर्वीं तांदूळ दरएकरास १३३८ रत्तल होत असत ते आतां आठ नऊशें रत्तलावर आले आहेत. गहूं ११९९ रत्तल होत असत ते ६६० वर आले आहेत.

तेव्हां या गोष्टीचा विच्यार केला असतां असें दिसतें कीं जे मोगलाई राज्य फार जुलमी अशी प्रसिद्धी आहे त्या राज्यांत लोकांस खाण्यापिण्याची समृद्धि होती आणि इंग्लिश राज्यांत जें राज्य दयाळू ह्मणून ख्याति आहे त्यांत हमेशा दुष्काळ पडतात व बहुत लोक अन्नान्न करून भटकतात. अशी स्थिति अशा न्यायी राज्यांत व्हावी ह्मटलें ह्मणजे देशाचें महत् दुर्भाग्य होय यांत संशय नाहीं.

युरोपखंडांत पिकाचा अजमास आहे तो असा:— तेथें एकरास गहू १५०० रत्तल होतात व पो ह्मणून एक भात खाचराच्या जमिनीचा दरा आहे त्यांत दर एकरास २१०० रत्तल तांदूळ होतात. अमेरिकेंत कापूस दर एकरास सरासरी रत्तल २०० होतो व इजिप्त देशांत ३०० पासून ४०० रत्तल होतो. अशी स्थिति जर त्या राष्ट्राची आहे तर तिकडून आलेल्या आमच्या राज्यकर्त्यांनीं या देशांतील शेतकीची सुधारणा अवश्य करावी हें त्यांस उचित आहे. मागें लार्ड मेयो साहेब गवरनर जनरल होते त्यांनीं असें स्पष्ट लिहिलें आहे कीं विलायतेंत जसे ल्यांड लार्ड आहेत तसे हिंदुस्थानांत नाहींत. हिंदुस्थानांत सरकार हेंच ल्यांड लार्ड ह्मणजे जमीनीचे मालक आहे सबब त्यांनींच खर्च करून या देशाची स्थिति सुधारणें जरूर आहे. प्रशिया देशचे सरकार दरसाल शेतकीचे कामाकरितां सहा लक्ष रुपये खर्च करिते आमचे सरकार किती करते हें अजून बाहेर पडलें नाहीं. मद्रास इलाख्यांत शेतकीची शाळा होणार हा याच महिन्यांत काय तो बूट बाहेर पडला आहे. तर या विषयीं सरकारानें चांगलें मनावर घेऊन इलाख्या इलाख्यास अशा दोन दोन च्यार च्यार शाळा स्थापिल्या पाहिजेत. व कृषिकर्मवेत्ते लोक बनविले पाहिजेत. व लोकांस पहाण्यासाठीं कांहीं नमुने केले पाहिजेत. पण ते नमुने वऱ्हाडांत केले होते तसे आंतबट्ट्याचे नकोत. ह्मनजे खर्च १०००० व उत्पन्न ३०० अशा प्रकारचे नकोत. त्यांपासून लोकांना कांहीं उत्तेजन यावयाचें नाहीं. थोड्या खर्चानें व बहुत मेहेनतीनें उत्तम पीक येईल व कुणबी लोकांचें दरिद्र जाईल अशी पद्धति त्यांस घालून दिली पाहिजे. खोल नांगरटीपासून फायदा व अमुक प्रकारच्या खतापासून अमुक फायदा हें त्यांस व्यक्त करून अनुभवशीर दाखविलें पाहिजे.

आमच हल्लेंचे नांगरानें सुमार सहा इंच खोल जमीन नांगरली जाते व विलायती नांगरानें एक फूट खोल नांगरली जाते व त्याच्या पिकाचा फरक असा सांगतात कीं, सहा इंच खोलीच्या जमीनींत जर एक खंडी पीक झालें तर बारा इंचाचे जमीनींत साडेसहा खंडी होतें. तसेंच जमीनींत परोपरीचें खत घालणें. यांतही सर्वांपेक्षां मनुष्याच्या मलमूत्राचें जें सोनखत त्याचा गुण इतर सर्व खतांपेक्षां अति उत्तम आहे. व त्याची तर आपले लोक किळस करून फेकून देतात. चिनामध्यें सोनखत इतक्या काळजीनें साठवून ठेवितात कीं, जसें कांहीं इतर धन. त्या देशांत पशु पक्ष्यादिकांच्या मलमूत्रापेक्षां सोनखताची मातबरी विशेष आहे. व तिकडील ४० कोटि प्रजेचा उदरनिर्वाह तिकडील शेतकीपासूनच विशेषें होतो याचें कारण सोनखताचा ते चांगला उपयोग करितात हें होय असें लंडन टाइम्समध्यें प्रसिध्ध झालेलें आहे.

इत्यादि गोष्टींचा विच्यार केला ह्मणजे आपले देशांत सरकारानें शेतकीचे कामीं मन घालून तिच्या सुधारणेचे सर्व प्रकार लोकांस दाखवून व समजावून द्यावे याचें फार अगत्य आहे.

## हिंदुस्थानांतील पर्जन्य.

सरकारानें या देशांतील जंगल तोडून कमी केल्यामुळें पाऊस कमी पडूं लागला व त्यामुळें देशांत पीक कमी होऊं लागलें असें बहुत लोक ह्मणतात. या गोष्टीकडे सरकाराचें लक्ष्य जाऊन लोकांस झाडें तोडण्याची मनाई झाली आहे, व जंगल वाढविण्याची तजवीज सुरू झाली आहे, परंतु हिंदुस्थानच्या सर्व भागांवर जंगल चांगलें होईल अशी गोष्ट नाहीं या साठीं जमीनीचे मालकानीं आपले जमीनींत थोडीं बहुत झाडें लावावीं अशा विषयीं सरकार त्यांस उत्तेजन देईल तर बरें होईल. परंतु जमीनीच्या सत्ते विषयींचे नियम हल्लींचे काळीं कांहीं तऱ्हेवाईक झालेले आहेत व जंगल खात्याचे रूळ तर असे सक्तीचे आहेत कीं कोणास आपले जमीनींत एकादें झाड लावावें अशी इच्छाच होत नाहीं.

बहुतकरून साऱ्या हिंदुस्थानांत दोन प्रकारची हवा आहे. एक शुष्क आणि दुसरी आर्द्र. तरी हिंदुस्थान देश फार मोठा आणि त्यांतील भाग भागाचे स्थितीचे मानानें पर्जन्य पडण्याचा काळ व त्याची समृध्धि हीही वेगवेगळ्या मानाची आहेत. उदाहरण इकडे व मुंबई इलाख्यांत पर्जन्य जून महिन्यांत सुरू होऊन सपटंबर पर्यंत असतो व त्यापुढें पडलाच तर थोडा हस्ताचा पाऊस पडतो. त्याशिवाय बाकी आठ नऊ महिने हवा बहुधा शुष्क असते. पर्जन्याचा एक थेंबही पडत नाहीं. हिवाळ्यांत काय थोडें दव तृणांकुरावर पडेल तितकेंच बाकी कांहीं नाहीं. याप्रमाणें एकच पावसाळा आपले भागास आहे. व मद्रास इलाख्याकडे दोन पावसाळे आहेत. जून पासून सपटंबरपर्यंत आपल्या इकडील प्रमाणे नैऋत्येकडील पाऊस तिकडेही असतो पण इकडच्याप्रमाणें विपुल नसून व

तुरळक असतो. आणि अकटोबर महिन्याच्या मध्यावर तिकडे ईशान्येकडील मोठा पाऊस पडू लागतो तेणेंकरून तिकडील मोठाली तळीं वगैरे जलमय होतात. याप्रमाणें तिकडे झालें नाहीं तर दुष्काळ पडण्याचा संभव फार. तरी हा दुसरा पावसाळा त्या भागास थोडेच दिवस असतो, पण त्या काळांत तळ्यांतून पाणी सठवून ठेवण्याची जी त्यांना आवश्यकता प्राप्त झाली तेणेंकरून तें पाणी पाटानें जमीनीच्या फलद्रूपतेकडे लावण्याची विद्या त्यांस सहजी अशी आली कीं तिकडील भागांत बहुत तलाव झाले आहेत तसे साऱ्या हिंदुस्थानांत दुसरे कोठें नाहींत. जून तागाईत सपटेंबरच्या नैर्ऋत्य पावसाळ्यांत कर्नाटकांत पाऊस पडत नाहीं तेव्हां तेथें तीव्र उन्हाळा व उष्ण वाऱ्याचे लोट असतात व पुढचा ईशान्य पावसाळा तिकडे चांगला पडतो. तरी दोन तीन वर्षांनीं एकदा आसी पडते व त्या सालांत नैर्ऋत्य पावसाळा हमेशा पेक्षां दुप्पट किंवा त्याहून अधिक होतो. असा प्रकार आहे तरी हिंदुस्थानच्या इतर सर्व भागांत हिवाळ्याच्या तोंडचा ईशान्य पावसाळा कमी आहे. तो मद्रासेपासून पूर्व किनाऱ्यावर फार अधिक असून दक्षिणेकडे सिव्हलद्वीपाकडे कमी कमी असतो. पश्चिम किनाऱ्यावर क्यानानोर आणि वेंगुर्लें यांमध्यें हिवाळ्याच्या तोंडचाच पाऊस बरा पडतो. त्या प्रमाणें जसजसें समुद्रापासून दूर जावें तसतसें ह्मणजे भागीरथी नदीच्या ( व्हाली ) दऱ्यामध्यें दोन्ही पर्जन्यकाळ कमी आहेत. व वायव्यप्रांत, आणि पंजाब प्रांत यांत तर तें मान कमी कमी होत जाऊन तिकडे पर्जन्य डिसेंबर महिन्याच्या अखेरीस पडत असतो.

कावेरी नदीच्या मुखाजवळचा हिमस्थांतील प्रदेश आणि मद्रास इकडे अकटोबर नोवेंबर महिन्यांत ईशान्य पाऊस अधिक पडतो. तसें गोदावरी आणि कृष्णा या नद्यांच्या मुखाजवळील प्रदेशांत दोन्ही पावसाळ्यांत पाऊस पडतो. उडिसा प्रांत पश्चिम बंगाल, कलकत्ता आणि कलकत्याच्या पूर्वभागचे प्रदेश यांत विशेषें ईशान्य पावसाळ्याचा पाऊस चांगला पडतो. व तो अकटोबरांत आणि कधीं कधीं नोवेंबरांत पडतो. आणि पूर्व बंगाल, पूर्व भागाचे डोंगर, बहार, बनारस, अलाहाबाद, आग्रा आणि दिल्ली यांत विशेषें पाऊस जून तागाईत सप्तेंबर पावेतों पडत असतो. फिरोजपुर आणि लाहोर या मुलखांत पर्जन्य फारच अनिश्चायक आहे व पेशावरकडे तर बहुतेक पर्जन्य वसंत ऋतूंत पडतो.

पावसाची सरासरी मोजदाद पुढें लिहिल्याप्रमाणें आहे. सिंध प्रांतांत तळभागास सरसालांत १० इंच पाऊस पडतो आणि बंगालच्या उपसागराचे शिराजवळ चिरापुंज एथें वर्षास ६०० इंच पाऊस पडतो. ही दोहोंकडील दोन परमावधीचीं ठिकाणें आहेत. महाबळेश्वरावर ४०० इंच व पश्चिमेकडील घाटावर सुमार२०० इंच पाऊस पडतो. व त्याच घाटाचे पूर्वेस दहा पंधरा कोसांवर येऊन पहावें ह्मणजे २५ इंचावर व पुढें सोलापुर वगैरे कडे याहून कमी इंचावर प्रमाण येतें. चिनायता ह्मणून स्थल आहे तेथें साऱ्या सालांत ५ इंच पाऊस पडतो व तेथून लाहोरच्या दिशेनें डोंगराकडे गेलें ह्मणजे १६ व २४ इंचांचें प्रमाण होतें. सिलकोट येथें ३० इंच व जमू येथें ६० इंच पाऊस पडतो.

विहिरी, तळीं, नद्या यांतील पाण्याचा आपण नित्य उपयोग करितों. तें सर्व पावसाचें पाणी होय ह्मणून पावसावर आपणा सर्वांस फारच अवलंबून रहावें लागतें, याकरितां पावसाची सर्व ठिकाणची गणती समजणें फार अवश्यक आहे. व त्यांचा शेतकी, हवा व आरोग्य यांशीं फार निकट संबंध आहे ह्मणून ठिकठिकाणीं पावसाचीं यंत्रें व त्यां बरोबर हैग्रामेटर ह्मणजे हवेंतील ओलावा मोजण्याचें यंत्रही असावें. विलायतेंत पावसाचीं यंत्रें एक हजाराहून अधिक ठिकाणीं ठेविलेलीं आहेत व त्यांचे लेख वर्षांस प्रसिद्ध होतात. आतां आपल्या देशांत या गोष्टीची केवळ हयगय झाली आहे असें नाहीं. बंगाल इलाख्यांत हें काम मि. ब्ल्यांड फोर्ड यांजकडे सोंपविलेलें आहे. त्यांनीं पूर्व बंगाल्यांत ४, मध्य बंगाल्यांत ३; वऱ्हाड प्रांतांत ३, आणि उडीसा प्रांतांत १ अशीं पाऊस मोजण्याकरितां स्थळें निवडिलीं आहेत. मद्रास इलाख्यांत मि. पागसन साहेबाकडे हें काम दिलेलें आहे व त्यांनीं २०० ठिकाणीं पाऊस मोजण्याचीं यंत्रें ठेविलीं आहेत. व मुंबई इलाख्यांत मि. चैंबर्स यांकडे हें काम आहे. तरी या सर्वांवर एक आणखी मुख्य आफीस साऱ्या हिंदुस्थानाकरितां असावें व त्यांनीं पावसाचे चांगले प्रकारें शोध, हवेचे शोध, व पुष्कळ पाऊस पडत असेल तेथें शेतकीकरितां पाटबांधाऱ्याचे कामाची योजना या गोष्टीकडे चित्त पुरवावें अशी तजवीज असणें अवश्य आहे.

---

## साहेबाच्या मारानें नोकराचा मृत्यू.

( हिं० सरकारचा ठराव. )

---

मि० आरथर हावेल हिं० सरकारचे आफिशियेटिंग सेक्रेटरी यांजकडून.

वायव्य प्रांतांतील सरकारचे सेक्रेटरी यांजकडेस पत्र नंबर १०९८ जे तारीख ७ जुलाई सन १८७६ इसवी मुक्काम सिमला.

आपलें पत्र नंबर ३१३ तारीख १८ माहे मे सन १८७६ इसवीचें आलें तें पावलें. व त्याजबरोबर आपणास हिंदुस्थान सरकाराकडून लिहून गेल्याप्रमाणें आर. ए. फुलर याजवर झालेल्या मुकदम्यांतील आग्रा येथील जाइंट माजिस्त्रेट मि. लीड्स याचा ठराव व मि० फुलर यास सदरील जाइंट माजिस्त्रेट यांनीं जी शिक्षा दिली तिजबद्दल वायव्य प्रांतांतील हाय कोर्टाच्या मताचें पत्र आपण पाठविलें तें पावलें.

२ सदहू मुकदम्याची हकीकत खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. एके रविवारीं सकाळीं मि० फुलर आग्रा येथील इंग्रजी वकील आपल्या कुटुंबासह देवळास जाण्याचे तयारींत होते. गाडी दरवाज्या समोर आणिली होती पण त्या वेळेस सैस त्या ठिकाणीं नव्हता. तो बोलावू पाठविल्यावर आला. ह्या कारणाकरितां मि. फुलर यांनीं आपल्या हातानें त्या सइसाच्या तोंडावर आणि डोक्यावर मारिलें. आणि त्याचे केस धरून ओढिले ह्यामुळें तो खालीं पडला. व मि. फुलर आणि त्याचें कुटुंब देवळाकडे चालते झालें. पुढें तो सईस हळूहळू अंगणांत गेला आणि तेथेंच मरण पावला.

३ याबद्दल मि. फुलर यांची आग्रा येथील जाइंट माजिस्त्रेट याजकडे चौकशी झाली व त्यांनीं इं. पि० कलम ३२३ प्रमाणें काटवारू सईस यास दुखापत केल्याबद्दल मि. फुलर याजवर च्यार्ज ठेविला. डाक्टरानीं प्रेताची परीक्षा करून पाणथरी फुटल्यामुळें तो मेला, पाणथरी रोगाच्या योगानें पोट मोठें झाल्यामुळें पडून किंवा थोडासा धक्का लागून जरी दुखापत झाली तरी ती फुटते अशी साक्ष दिली. व ह्या पुराव्यावरून दुसऱ्या प्रकारें मारलें असें दिसून आलें नाहीं. निदान दुसऱ्या प्रकारच्या मारास लागू पडणाऱ्या मुद्यावर जाइंट माजिस्त्रेट यांणीं उघडपणें योग्य दिसणाऱ्या कारणावरून भरवसा ठेविला नाहीं. व त्यांनीं मि० फुलर यास अपखुशीनें दुसऱ्यास दुखापत केल्याबद्दल दोषी ठरवून ३० रुपये दंड आणि दंड न दिल्यास १५ दिवसांची साधी कैद ही शिक्षा ठरविली आणि मेलेल्या मनुष्याच्या बायकोच्या स्वाधीन दंडाचे रुपये ३० करावे असा हुकूम केला. पुढें इलाख्याच्या सरकारच्या लिहिण्यावरून हाय कोर्टानें ह्या मुकदम्यांत मत दिलें तें असें कीं, मुकदम्यांत पुरावे वगैरे झाले यावरून हाय कोर्टानें जी शिक्षा दिली असती तिजपेक्षां जरी ही शिक्षा कमी आहे तरी बाध येण्यासारखी नाहीं.

४ अशा प्रकारचें नुसतें मत दिल्यानें ह्या प्रकरणांतील आपली जबाबदारी आणि कर्तव्यकर्म योग्य रीतीनें शेवटास गेलें किंवा नाहीं अशाबद्दल हाय कोर्टानें विच्यार केला नाहीं हें पाहून हिं. स-स फार वाईट वाटतें. ह्या देशांत ब्रिटिश सरकारच्या न्यायाची जी कीर्ति आहे तीस येणेंकरून बाध आला व याबद्दल वायव्य प्रांताच्या सरकारानें प्रथम आपण होऊन चौकशी केली नाहीं हें पाहूनही हिं. सरकार फार दिलगीर आहे.

५ हिंदुस्थान सरकारास निःसंशय वाटतें कीं फुलर साहेबानीं काटवारू यास मारलें व त्यामुळेंच तो मेला आणि ह्या ज्या दोन गोष्टी घडल्या त्यां मधील संबंध उघड आहे असें हायकोर्टानें मानिलें हेंही हिंदुस्थान सरकारच्या नजरेस आलें तथापि मि. लीड साहेब माजिस्त्रेट याचा ठराव वाचून पहातां त्यांनीं ह्या दोन गोष्टींमध्यें संबंध किती आहे व त्याचा परिणाम काय झाला आहे ह्या बाबदींत कांहीं विच्यार केला नाहीं असें दिसून आलें. फुलर साहेबांनीं दुखापत केल्याबद्दल पुरावा कोर्टापुढें आला होता व तो लीड साहेबानीं कांहीं कारणावरून नाकारला व हीं कारणें बस आहेत असें त्यांस वाटलें व असें मारल्यापासून मरण येईल व येणार नाहीं ह्या दोन्ही गोष्टी त्यांस सारख्याच वाटल्या असाव्या असें दिसतें.

६ अशा प्रकारचे गुन्हे ज्या गैरवर्तणुकमुळें घडतात त्या वर्तणुकी नाहींशा झाल्या असें वाटत होतें परंतु युरोपियन लोक आपल्या जातीच्या नोकर लोकांस ज्या रीतीनीं वागविणार नाहींत त्या रीतीनें नेटिव नोकरास वागवितात अशा बद्दलचीं उदाहरणें कधीं कधीं दृष्टीस पडतात आणि तीं पहाण्याचा हिंदुस्थान सरकारास फार कंटाळा आहे. युरोपियन लोकाची ही चाल फार वाईट आहे. आणि आपल्यास दुखापत केल्याबद्दल किंवा आपली अब्रू घेतल्याबद्दल ज्या नोकरास मोबदला देण्याची बिलकूल शक्ती नाहीं व त्या कारणामुळें नोकर धन्यानें केलेले अपराध निमुटपणानें सहन करतात ह्मणून धन्यानीं त्यावर दया करावी व त्यांचें संरक्षण करावें असा त्यांचा हक्क आहे. आतां हेंही खरें आहे कीं आशियाखंडांतील लोकांस अशा प्रकारचे रोग असतात कीं ज्याचे योगानें त्यांस थोडासा धक्का बसला असतां मृत्यू प्राप्त होतो. पण ही गोष्ट हिंदुस्थानांतील युरोपियन लोक मनांत बाळगून किक्यकजण वाईट परिणामाचीं कृत्यें करूं लागले आहेत. याजकरितां हिंदुस्थान सरकारास वाटतें कीं थोड्याशा रागावरून कोणी युरोपियनानीं आपले नोकरास मारलें तर त्यास योग्य शिक्षा होत जावी आणि त्यावरून अशा प्रकारचे हमेशा अपराध करणारानीं विच्यार करावा कीं एकादे प्रसंगीं महत् अपराधाचें फल आपणास भोगावें लागेल.

७ मि० फुलर यांजवर मोठी दुखापत केल्याबद्दल अथवा सदोष मनुष्यवध केल्याबद्दल चार्ज ठेविला असता तरी शाबितच झाला असता असें हिंदुस्थान सरकार ह्मणूं शकत नाहीं; तथापि खात्रीनें इतकें ह्मणतें कीं, फुलर साहेबानें आपल्या नोकरास जोरानें मारल्यामुळें तो मेला सबब जास्ती अपराधाबद्दल चौकशी होण्याकरितां त्यास पुढें पाठविण्याचें माजिस्त्रेटाचें काम होतें. आणि तें त्यानें केलें असतें तर फुलर साहेबास शिक्षा झाली नसती असें नाहीं. हा थोडाच अपराध जर वरच्या कोर्टांत शाबीद झाला असता तर त्यास खरोखर योग्य शिक्षा झाली असती.

८ हिंदुस्थान सरकारास असें वाटतें कीं, मि० लीड साहेब माजिस्त्रेट यांणीं या मुकदम्याची चौकशी स्वतः केली ही त्यांची चूक आहे. शिवाय फुलर साहेबाचे अपराधाचें स्वरूप त्यांस बरोबर समजलें नाहीं. हा अपखुशीनें दुखापत केल्याचा गुन्हा होता. ह्या अपराधाचे प्रकार पुष्कळ आहेत त्यांत एक नावाचा आहे व दुसरा इतका मोठा आहे कीं, पिनलकोडमध्यें त्यास १ वर्षाची कैद व एक हजार रुपये दंड अशी शिक्षा आहे. कोर्टानीं अशा अपराधाबद्दल शिक्षेचा ठराव करतांना दुखापत झाली कोणती व दुखापत करण्याला कारण कोणतें ह्या दोन गोष्टींचा मुख्य विच्यार केला पाहिजे. मि० फुलर याच्या मुकदम्यांत राग येण्यास कारण अगदी थोडें

होतें; परंतु दुखापतीपासून मृत्यू घडला. ह्या कारणास्तव नुस्ते नावाचे शिक्षेपेक्षां कांहीं जास्त शिक्षा असावी ह्मणून ३० रुपये दंड केला असें माजिस्त्रेटाचें ह्मणणें आहे. लोकांच्या फायद्याकडे अथवा मयताच्या कुटुंबाकडे मि० फुलरसारख्या स्थितींतल्या मनुष्यानें नुकसानीबद्दल जो पैसा दिला [ व कागदपत्रावरून असें दिसतें कीं, मि० फुलर यांणीं नुकसानीबद्दल जास्त पैसा दिला नाहीं. ) याकडे लक्ष्य दिलें असतां हिं० सरकारास असें वाटतें कीं, ही झालेली शिक्षा अगदी थोडी आहे. आणि मि० लीड साहेब यानीं तो अपराध नावाचा असें समजून त्यास केवळ नावाची शिक्षा दिली. तेव्हां अशा गुन्ह्याला योग्य शिक्षा न देणें हें केवळ गुन्हे कमी न करितां त्यास जास्त उत्तेजन देण्याचें वाईट उदाहरण आहे असें सरकारास वाटतें.

९ इत्यादि सर्व कारणांवरून मि. लीड साहेबाचे या मुकदम्यांतील वर्तणुकीबद्दल हिंदुस्थान सरकार फार नाखूष झालें आहे ह्याबद्दल त्यांजला समज द्यावी आणि चांगला विच्यार करणें व बरोबर न्याय करणें ह्या गोष्टीचा त्यांच्यांत कमीपणा आहे ह्याजबद्दल त्यांना चांगली खबरदारीनें ताकीद द्यावी आणि निदान एक वर्षभर तरी मि० लीड यानें माजिस्त्रेटाचें काम कोणतें व त्याची जबाबदारी किती ह्याची बरोबर किंमत समजल्याशिवाय व आपणास चांगला न्याय करितां येतो याची खात्री करून दिल्याशिवाय त्यांचे ताब्यांत हंगामी अगर कायमचा एकादा जिल्हा दिला जाऊं नये असें हिंदुस्थान सरकारचें मत आहे

---

* *आमचे नवीन गवनरजनरल लार्ड लिटन साहेब यांचा हा महत्वाचा ठराव पाहून हिंदुस्थानचे सर्व लोकांस संतोष होईल. बहुत साहेबलोक गरीब नोकरांस मारतात त्यांना या ठरावावरून कांहीं दहशत उत्पन्न झाल्यास फार चांगलें. युरोपियन लोक आह्मांपेक्षां चांगुलपणाच्या इतर सर्व गोष्टींत श्रेष्ठ असून या मारकटपणांतच त्यांनीं असें बोलून घ्यावें हें त्यांस योग्य नाहीं. माजिस्त्रेटानें शिक्षा किती थोडी दिली व त्याविषयीं हिं० स०नें काय ह्मटलें तें वर लिहिलेंच आहे. बहुत ठिकाणीं काळ्या गोऱ्याच्या कामांत बहुधा असेंच होतें. मुंबई इलाख्यांत मागें गोल्डस्मिड साहेबानीं आपल्या शिरस्तेदारास खूप मारलें व तो मरण पावला त्याबद्दल साहेबबहादुरास १ रुपया दंड झाला होता !

---

## वऱ्हाड.

**हिंदुस्थान वर्णनसार** नावाचें पुस्तक त्याच्या कर्त्यानीं आह्मांस नजर पाठविलें तें आदर पूर्वक स्वीकारून आह्मी त्याचे आभार मानितों. पुढील अंकांत त्याचे स्वरूप आह्मी आपले वाचकांस कळवूं.

---

बुलढाण्यास सेशन आहे त्याकरितां आज कर्नल अलार्डाइस साहेब जुडिशिल कमिशनर तिकडे जाणार.

अकोला हायस्कुलांत हिंदुस्थानी आसिस्टंटची जागा पुष्कळ दिवस रिकामी होती ती उमरावतीचे मि० समशेर अली जे गृहस्थ म्याट्रिक्युलेशन पास आहेत. त्यांस दिली. पूर्वीं ही जागा १५० रुपये पगाराची होती आणि हल्लीं या जागेचा पगार ३० रुपये केला आहे.

---

सर आर मीड साहेब रेसिडेंट हैदराबादस रहात होते ते आतां बोलारमच्या छावणींत गेले. बरसात संपेपर्यंत तेथेंच रहातील. हैदराबादेकडे थोडा थोडा वाखयाचा उपद्रव आहे.

---

सर सालरजंग साहेब दिवाण विलायतेस गेले अहित तिकडे त्यांनीं वऱ्हाड प्रांताविषयीं एक शब्द काढू नये अशी इंडिया कौंसलकडून त्यांस समज मिळाली असें वर्तमान आलें आहे. अशी तोंडबांधणी चांगली नाहीं असें कित्येक पत्रकर्ते ह्मणतात. कित्येकांचें मत असें आहे कीं हा वादविवाद अवेळीं उकरून काढला असतां पुढें मागें वऱ्हाडप्रांत निजामास मिळावयचा असल्यास तो या योगानें अधिक लांबणीवर पडेल. कोणी ह्मणतात वऱ्हाड प्रांत जुलुमानें घेतला आहे तो आतां परत द्यावा. कोणी ह्मणतात चांगल्या राज्यरीतीखालीं नांदत असलेले मुलुखाची मोगलाई आतां पुन्हा होऊं देऊं नये. अशी नानाविध मतें आहेत तीं लोकांपुढें व सरकारापुढें ठेवणें हें आमचें वऱ्हाडच्या पत्राचें काम आहे. आह्मांस वाटतें कीं तुह्मी आमचा मुलूख जुलमानें घेतलेला परत द्या हा मागण्याचा प्रकार प्रशस्त नव्हे. व अशानें देणारास दया उत्पन्न होत नाहीं. आतां यावेळचीं कार्य कारणें सरळीं असतील व हा मुलूख घेण्यांत अन्याय असेल तर सरकार आपली गोष्ट सुधारून मुलूख परत देईल. व निजामाची राज्य रीति हल्लीं नावें ठेवण्या जोगी नाहीं सबब इनसाफ व्हावा हें योग्य आहे.

---

रा. सा. नारायणभाई दांडेकर विद्याखात्याचे डायरेक्टर हे आज उमरावतीस जाणार आहेत. तेथें हायस्कूल नवीन बांधलें त्याचा प्रवेश समारंभ ते करणार आहेत.

---

पाऊस या आठवड्यांत गुरुवारीं दोन प्रहरीं सुमार पावतास मोठ्या जोराचा पडला. व काल रात्रौ कांहीं येंब आले होते. उमरावतीस, इलिचपुरास, व नाशिकास एक दोन पाऊस चांगले पडले असें समजतें.

---

सोन्याचा दर पुणें मुंबईकडे २४ पर्यंत चढला होता तो या आठवड्यांत उतरून १९।२० यावर आला आहे.

---

रा. रा. निळकंठ नारायण भट असिस्टंट मास्तर हायस्कूल यानीं गेल्या रविवारच्या सभेंत "नाणें" याजवर एक उत्तम निबंध लिहून वाचला.

---

हैदराबादेहून मे. मौलवी मेहदे अलीं साहेब नावाचे मुलकी खात्याचे रिविन्यु सुपरइंटेंडेंट सारखे कामदार एथें आले आहेत. अधिकाऱ्यास भेटून व इकडील कामकाजाची माहिती घेऊन ५—४ दिवशीं ते परत जातील.

---

जुडिशियल कमिशनरचे क्लार्क रा. रा. भास्कर सखाराम जयवंत एक आठवड्याची रजा घेऊन उमरावतीस आपले घरीं गेले.

---

पन्नाबाईचे मालावरील नाजर संबंधाची जप्ती खुली झाली व खबर देणारा मारुती गुमास्ता खोटा ठरला.

---

रा. रा. श्रीराम भिकाजी जटार अकोल्याचे डिपुटी एजुकेशनल इन्स्पेक्टर यांची इन्स्पेक्टरच्या जागेविषयीं शिफारस झाली आहे. व ती जागा त्यांस अजून मिळणें आहे तोंच त्यांची जागा भरण्याविषयीं शिफारसी चालल्या आहेत. उर्दुअखबारांत रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यांस श्रीरामपंताची जागा मिळावी असें लिहिलें आहे. व वऱ्हाडमित्रांत त्यांना हायस्कुलाचे हेड मास्तर करण्याकरितां राखून ठेवावें असें लिहिलें आहे आणि रा. रा. बजाबा रामचंद्र यांस २०० रुपयांची, रा. रा. बळवंत नृसिंह यांस १५० रुपयांची, व रा. रा. वामनराव बाळाजी किंवा रा. रा. केशव ब्रह्मगिरी यांस १२५ रुपयांची डिपुटी इन्स्पेक्टराची जागा द्यावी आणि वामनरावास दिल्यास केशवरावास त्यांची हेड क्लार्कची जागा द्यावी असें लिहिलें आहे.

आह्मांस असें वाटतें कीं रा. सा. नारायण भाई चांगले शोधक, निस्पृह, व उत्तम विवेचक आहेत याविषयीं सर्वांची खात्री आहे आणि आमची वर्तमानपत्रें "पब्लिक टोन" असें ह्मणण्याच्या स्थितींत अजून आलेलीं नाहींत असें आहे त्यापक्षीं कोणाविषयींच आपण अंगुलिनिर्देश करण्याचें प्रयोजन नाहीं.

---

'उमरावतीकर' या सहीचें पत्र उशीरानें पोचलें. तें पुढील अंकांत घेऊं

---

नोटिस.

बनाम गणपत वलद चतरीलाल रहाणार महान तालुक अकोलें यास खालीं सही करणाराकडून देण्यांत येतें कीं, मालमजकुरीं महान एथें कलालीभट्टीचे जागेंत भट्टी लावून वहिवाट करण्यास माझे बहिवाटदारास यऊं दिलें नाहीं. खुद्द आह्मी जागा मागितली असतां दिली नाहीं सबब सरकार मार्फत काम सुरूं आहे. जितके दिवस तुह्मी सदरील जागेंत भट्टी लावून वहिवाट होऊं देत नाहीं तोंपावेतों ज्या रीतीचें आमचें नुकसान होईल तें तुह्मापासून कोर्टमार्फत नोटिशीचे खर्चासह घेण्यांत येईल करितां जागा लवकर आमचे वहिवाटीस द्यावी. ह्मणजे थोडे दिवसाचें नुकसान तुह्मास भरणें पडेल पुढें जास्त होत आहे. कळावें. तारीख २२ माहे जुलै सन १८७६ इसवी.

( सही ) भिकारीलाल दालचंद मक्तेदार.

## वर्तमानसार

तुर्कस्थानचा माजी सुलतान याचे खासगीकडे ६००० मनुष्यें होतीं. याचे खासा स्वारीचे बसण्याचे घोडे ६२५ होते. व मोतद्दार ९२५ होते. जनान खान्यांत स्त्रिया १६०० होत्या. त्यांस किरकोळ खाऊ देण्याकरितां १६००० रुपये वर्षास लागत. याचे खाटिक व भाकरीवाले यांचें वार्षिक बिल अडीच लक्षांचें होत असे. डाक्टर खासगीकडे ४८ असून त्याप्रीत्यर्थ ५ लक्ष रुपये खर्च होत असे.

लंडन शहरांतील सर्व रस्ते मोजले तर ७०० मैल भरतील. तेथील वस्ती ४० लक्षांची आहे. त्यांत परदेशीय लोक एक लक्ष आहेत. जनन मरणाचा हिशेब काढला आहे त्यावरून कळतें कीं लंडन शहरांत दर ५ मिनिटास एक मूल जन्मतें व दर ९ मिनिटाला एक मनुष्य मरतो. अपघात दररोज ७ होतात. नवे रस्ते प्रति वर्षीं २८ मैल होतात व नवीं घरें १०००० होतात. लंडन शहराला १००० तारवें व ९००० खलासी आहेत. लंडन शहरांत प्रतिवर्षीं २३ कोटि ८० लक्ष पत्रें टपालांतून येतात.

नगरच्या पुढारी मंडळीनीं एक बैलानें चालणारें मोठेंचें यंत्र कोणी करील त्यास १०० रुपये बक्षीस देण्याचा ठराव केला आहे.

सोलापुरास महामारीचा उपद्रव सुरू आहे.

देगाव येथें देव मामलेदारांच्या पादुका कोणी कावेबाज लोकांनीं मांडिल्या होत्या व तें त्यांचें ढोंग बाहेर पडलें आणि वाटणीविषयीं भांडण होऊन एकानें त्या पादुका निवडुंगांत टाकून दिल्या असें कल्पतवरून समजतें.

मुंबईचे कलेक्टर मि० आर्बथनाट साहेब यांनीं मिसेस लेसी नावाचे एका मडमेशी कांहीं गडबड केली त्याबद्दल तिच्या नवऱ्यानें फिर्याद केली आहे. चौकशी एकांत खोलींत बसून चालविणार आहेत असें कळतें. असें कां ?

तुर्कस्थानचे सुलतान मरण पावले त्यांच्या राणीस आपल्या महाराणी साहेबांनीं दुःखोद्गाराचें पत्र पाठविलें व आतां त्यांनीं इंग्लंडांत रहावयास यावें असें सुचविलें त्याबद्दल त्यांनीं आभार मानिले व आह्मा तीन चारशें विधवा स्त्रियांचा आपण समाचार घ्याल काय ? असें विच्यारिलें आहे.

मि० मेकलालिन साहेब यांनीं एका रेलावर एका चाकानें चालणारी गाडी नवीन शोधून काढिली आहे. ही रेलवे तयार करावयास १५ हजार रुपये एका मैलास खर्च लागतो व हल्लीं आपल्याकडे दोन रेलावरून चालणाऱ्या गाडास दर मैलास ९० हजार रुपये खर्च लागतो. ह्मणून ही वरील थोड्या खर्चात एक रेलावर चालणारी गाडी आपल्या हिंदुस्थानात २० २० २५ २५ मैलाचे फाटे जागोजाग करावयाचे आहेत त्याठिकाणीं करून साधारण गावीं ही तिचा प्रसार करावा अशाविषयीं विच्यार चालू आहे.

## तुर्कस्थानच्या राज्याची संक्षिप्त हकीकत.

हल्लीं तुर्कस्थानांत मोठी गडबड चालली आहे. तेथें पूर्वीं जो सुलतान होता त्याला लोकांनीं गादीवरून काढून दुसऱ्याला गादीवर बसविलें आहे, हें आमच्या वाचकांस माहीत आहेच. हें नृपांतर होण्याचें कारण हें कीं, पूर्वींचा बादशहा आपल्या प्रजेविषयीं कांहीं काळजी न बाळगतां, तिजवर व्यर्थ मोठाले कर बसवूं लागला, आपल्या जनानखान्यांतील शेंकडों बायकांमध्यें राहून विलाससुखें भोगण्यांत निमग्न होऊन राज्यकारभार चालविण्यास नालायक झाला, आणि कांहीं कारण नसतां मोठी फौज ठेवूं व विनाकारण जहाजें खरीद करूं व अनेक रीतींनीं व्यर्थ द्रव्य उधळूं लागला. ह्मणून लोकांनीं त्याला नापसंत ठरवून पदभ्रष्ट केलें. आणखी सुलतानाच्या अमलांत युरोपखंडांत कित्येक प्रांत आहेत त्यांमध्यें जे ख्रिस्ती लोक रहातात त्यांस सरकारांत नौकरीच्या व हुद्यांच्या कांहीं जागा मिळत नाहींत, पण त्यांवर जबर कर बसविले आहेत. सर्व अमलदार मुसलमान आहेत ते ख्रिस्तविरोधी असल्या कारणानें ख्रिस्ती लोकांवर नाना प्रकारें जुलुम करतात. अशीं नानाविध दुःखें व जुलूम आणखी सहन करवतना ह्मणून एका प्रांतांतील ख्रिस्ती लोकांनीं सुमारें एक वर्षापासून त्या सरकाराविरुद्ध बंड केलें आहे. तें मोडण्याकरितां तुर्क सरकार फार प्रयत्न करीत आहे. परंतु अद्याप त्यांच्यानें तें मोडवत नाहीं. त्यांच्या आसपासच्या दुसऱ्या ख्रिस्ती प्रांतांतील लोकही बंडवाल्यास सहाय करून तुर्क सरकाराशीं लढत आहेत. या बंडाकडे बहुतेक ख्रिस्ती राष्ट्रांचे डोळे लागले आहेत; आणि जर्मनी, आस्त्रिया, रशिया, आदिकरून जीं मोठमोठीं पराक्रमी राष्ट्रें युरोपखंडांत आहेत तीं या बंडवाल्यांस सहाय करतील; कदाचित् त्यांतून कितीएक बंडवाल्यांच्या व कितीएक तुर्क सरकारच्या पक्षाकडे होऊन फार मोठाल्या लढाया होतील, असें भय आहे.

तुर्कस्थान देश अरबस्थान व इराण यांच्या पलीकडे भूमध्य समुद्राच्या उत्तर व ईशान्य तिराबर आहे. त्याचे दोन भाग आहेत. एक भाग युरोप खंडांत व दुसरा एशिया खंडांत आहे. त्या देशांत हल्लीं जे तुर्क लोक रहातात व राज्य करतात ते तेथील मूळचे रहिवासी नव्हत. जेव्हां येशू ख्रिस्त या जगांत होता तेव्हां पुष्कळ हेलेनी किंवा ग्रीक लोक त्या देशांत रहात होते, आणि सर्वत्र ग्रीक भाषा चालत होती. व प्राचीन ख्रिस्ती लोकांचे वंशज अजून त्या देशांत आहेतही.

त्या देशाची राजधानी कान्स्तांतिनोपल किंवा रूमशाम हें शहर ख्रिस्तानंतर ३२९ वर्षांनीं कान्स्तनतीन जो रोमी लोकांचा बादशहा त्यानें बांधिलें. तेव्हांपासून तेथें रोमी लोकांचे बादशहा राहूं लागले. पुढें दिवसानुदिवस त्या राष्ट्राचें वजन व सामर्थ्य कमी कमी होत जाऊन शेवटीं तें अगदीं निर्बळ झालें. ही गोष्ट ख्रिस्ती शकाच्या ३०० पासून ९०० वर्षांपर्यंत झाली. अशा प्रसंगीं मुलखांत जे रानटी लोक होते त्यांनीं जमाव करून व रोमी सरकाराशीं लढाई करून त्यांच्या राज्याचे कांहीं प्रांत जिंकून घेतले.

आतां तुर्क लोक कोण होते असें जर विच्याराल तर सांगतों. ते एशियाखंडांतील रानटी लोक होते. ते अलताय पर्वतालगतच्या प्रदेशांत रहात होते. हा पर्वत एशियाखंडाच्या मध्यभागीं आहे. ह्या लोकांची मूळची स्थिति व हकीकत सांगतां येत नाहीं. कारण आपल्यास ठाऊकच आहे कीं रानटी लोकांस कांहीं ज्ञान नसतें आणि ते आपल्या राष्ट्राचें वर्णन व इतिहास लिहून ठेवीत नसतात. त्याचप्रमाणें ह्या रानटी लोकांची गोष्ट होती. त्यांच्या विषयीं इतकेंच समजतें कीं ख्रिस्तानंतर सुमारें ५५० वर्षांनीं ते फार बलवान झाले. त्या वेळेस त्यांच्यावर सुधारलेला राजा होता असें नाहीं. त्यांच्या फौजेस कांहीं पुढारी मात्र होते ते लढाई करण्यांत फार हुशार झालेले होते. पुढें कांहीं काळानें ते आपलें मूळचें स्थान सोडून युरोपखंडाकडे जाऊं लागले. त्यांनीं पहिल्यानें थोडथोड्या व मग ज्यास्ती लढाया करून रोमी लोक व त्यांच्या सभोंवतालचीं दुसरीं राष्ट्रें यांपासून बहुत प्रांत हिसकून घेतले. पुढें त्यांचें सामर्थ्य वृद्धिंगत होऊन त्यांची सुधारणाही बरीच झाली आणि मुसलमानी धर्माची स्थापना झाल्यावर ते मुसलमान झाले. नंतर सन १२८९ इसवी या सालीं त्यांचा पहिला राजा गादीवर बसला. त्या राजाचें नाव आथ्मान. तुर्क लोकांनीं सन १४२२ मध्यें कान्स्तांतिनोपल शहरावर स्वारी केली. त्या प्रसंगीं जरी तुर्क लोकांची फौज अडीच लक्ष होती तरी त्यांस जय मिळाला नाहीं. त्या नंतर त्यांनीं कन्स्तांतिनोपलच्या बादशहाशीं पुनः लढाई करून ती राजधानी घेतली. ही गोष्ट सन १४५३ सालीं मे महिन्याच्या २९व्या तारखेस झाली. तेव्हां तुर्क लोकांचा सुलतान दुसरा महंमद हा होता त्यानें तें शहर घेतलें. त्या वेळीं तुर्कीं फौज २॥ लक्ष असून शहरांतील रहिवासी लोक एक लक्ष होते. तुर्क लोकांनीं शहर लुटलें व शहरवासी लोकांची कत्तल केली. तेथें ९०० वर्षां पूर्वीं बांधलेलें एक ख्रिस्ती देऊळ होतें त्यांत सोनें रुपें वगैरे अनेक प्रकारचें द्रव्य सांठवून ठेवलेलें होतें तें सर्व त्यांनीं लुटून नेलें, आणि त्या देवळाची मशीद केली. त्या दिवसापासून तुर्क लोक त्या ठिकाणीं राहूं लागले. आणि कान्स्तांतिनोपलही त्यांची राजधानी झाली. थोड्यादिवसांमागें ज्या अबदुल अजीज सुलतानानें आत्महत्या केली तो तुर्क लोकांचा ३३ वा राजा होता आणि आतां जो मुराद अफंदी त्याच्या गादीवर बसला आहे तो ३४ वा राजा आहे.

तुर्कस्थानांतील सर्व लोक मुसलमान आहेत असें नाहीं त्या राज्याचा जो भाग युरोपखंडांत आहे त्यांत १५६०००० लोक आहेत त्यांपैकीं केवळ २१००००० लोक मुसलमान आहेत आणि जो भाग एशियाखंडांत आहे त्यांत १६०५०००० लोक आहेत त्यांतून १०७००००० मुसलमान आहेत.

ब्रा. द.

## सिंक्लेर मेमोरियल फंड.

| | रु. |
|---|---|
| रा. केशव ब्रह्मगिरी हे. मा. इलिचपुर | १० |
| ,, वामनराव प्रभाकर परांजपे पुणें | १० |
| ,, धोंडो त्रिंबक फ. अ. मा. इलिचपुर | ६ |
| ,, परशराम बल्लाळ सोमण फ. अ. मा. इलिचपुर | ५ |
| ,, रामचंद्र विनायक भिडे से. अ. मा. इलिचपुर | ४ |
| ,, वामन गोविंद थर्ड अ. मा. इलिचपुर | ३ |
| ,, शिवराम रघुनाथ हे. मा. इलिचपुर | ३ |
| ,, विश्वनाथ परशुराम से. अ. मा. इलिचपुर | ३ |
| ,, पांडुरंग बापूजी हे. मा. आबासपुरा | ३ |
| ,, भिकाजी हनुमंत हे. मा. सुलतानपुरा | ३ |
| ,, जनार्दन गोपाळ देव हे. मा. करजगाव | ३ |
| ,, परशुराम दाजी दातार हे. मा. देउरवाडा | ३ |
| ,, गोविंद नागेश हे. मा. धामणगाव | ३ |
| ,, कृष्णाजी चिंतामण बापट हे. मा. चांदुर बाजार | ३ |
| ,, गोविंद धोंडदेव पिपुटकर हे. मा. ब्राह्मणवाडा | ३ |
| ,, गणेश बगाजी वैद्य हे. मा. सिरसगाव | ३ |
| ,, नारायण बज्याजी राजे हे. मा. सिंदी | ३ |
| मि. वजीरखा इस्मायलखा हें. मा. इलिचपुर | ३ |
| ,, सखाराम विनायक पुरोहित हे. मा. बोरगावपेठ | २॥८ |
| ,, गोपाळ धोंडदेव हेड मा. खिराळें | २ |
| ,, बळवंत बनसीलाल हेड मा. कांकडा | २ |
| ,, कृष्णाजी गोविंद अ. मास्तर परतवाडा | १॥८ |
| ,, दत्तात्रय गोपाळ हे. मा बेपापुर | १॥८ |
| ,, श्रीनिवास नागोराव हे. मा. कुरळ | १॥८ |
| ,, मारुती लक्ष्मण हे. मा. कुऱ्हा | १॥८ |
| ,, भगवंत बाबुराव हे. मा. लाडकी | १॥८ |
| ,, बाळाजी अनंत हे. मा. जसापुर | १॥८ |
| ,, नारायण वामन अ. मा. परतवाडा | १ |
| ,, सिताराम सखाराम अ. मा. इलिचपुर | १ |
| ,, व्यंकटेश गोपाळ अ. मा. इलिचपुर | १ |
| ,, माधव मुरारी अ. मा. अबासपुरा | १ |
| ,, गणपत यादव अ. मा. सुलतानपुरा | १ |
| ,, व्यंकटेश नारायण अ. मा. देहुरवाडा | १ |
| ,, बळवंत महादेव अ. मा. कुऱ्हा | १ |
| ,, रामचंद्र कृष्ण अ. मा. धामणगाव | १ |
| ,, लक्षुमण कृष्ण अ. मा. चांदुरबाजार | १ |
| ,, तुकाराम सिताराम अ. मा. ब्राह्मणवाडा | १ |
| ,, गुलाब आनंदराव अ. मा. ब्राह्मणवाडा | १ |
| ,, मुरहर अवधूत अ. मा. सिरसगाव | १ |
| ,, बापू शंकर अ. मा. शिंदी | १ |
| ,, गोविंद रामकृष्ण अ. मा. कापुसतळणी | १ |
| मि. सय्यद हसन सय्यद अली मुली मा. इलिचपुर | १ |
| ,, जुरानुदीन हिं. फ. अ. मा. इलिचपुर | १ |
| | १०५॥८ |
| मागील बेरीज | १००९ |
| एकंदर बेरीज | १११४॥८ |

### नोटिस.

गणेश राजाराम गुमास्ते रहाणार कसबे दहिहांडें तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मी आमचे एथें जुने बहुत दिवसांपासून गुमास्तागिरीचें कामीं नवकर असून माझा बाप उद्धव नाईक मेल्यानंतर मी अज्ञान असल्या कारणानें दुकानदारीची अव्यवस्था करून कागद पत्र बरोबर ठेविलें नाहीं. हालसालची जे दिपवाळी गेली त्या दिपवाळीपर्यंत मागील सालचे वह्याखातेंही बरोबर लिहिलें नाहीं याजकरितां कार्तीक शुद्ध १ रोजीं तुह्मास सांगितल्या प्रमाणें लोकांकडून जी बाकी येणें आहे तिची रुजुवात करून देऊन आपले घरीं बसावें त्या प्रमाणें तुह्मी रुजुवात करून न देतां परभारें कांहीं लोकांकडून वसूल घेतला व माझे दुकानचे देण्यांत जें शेत आलें तें तुह्मी आपले घरीं वहीत करून बायदा माझे दुकानांतून देत गेले. याजकरितां या नोटिशीनें कळविलें जातें कीं ही नोटिस पावल्या दिवसापासून एक महिन्याचे आंत असामीवार बाकया रुजू करून देऊन तुमचे खात्यांत जी बाकी निघत आहे ती व मुकाबल्यानें असामीवार जी तक्रार निघेल ती बाकी असा एकदर उलगडा करून द्यावा. नाहीं तर मोहोजबा द्यावयाबद्दल व बाकीबद्दल रीतीप्रमाणें फिर्याद करण्यांत येईल व कार्तिक शुध्द १ पासोन तुह्मी आपला पगार बंद आहे असें समजावें. कळावें. तारीख १६ जुलै १८७६ इसवी.

(सही) गोविंद उध्धव उबाळे
रहाणार दहीहंडे तालुके
अकोट दस्तुर खुद.

## जलम आणि खामगाव स्टेट रेलवे.

### लारी जाणें येणें.

या नोटिसीवरून सर्वांस कळावें कीं जी. आय. पी. रेलवेची आगगाडी जाण्याचे व येण्याचे धोरणानें जलम आणि खामगाव यांचे दरम्यान दररोज लारी नेण्या आणण्याचें काम चालविलें जाईल. त्यावरून प्यासेंजर (उतार करू) यांस बसविले जाईल. त्याचा आकार खालीं लिहिल्याप्रमाणें.

फर्स्ट क्लास .................... १ रुपया
नेटिव लोक .... ................ ४ आणे

मालाचे लारींतून कोणास माल पाठवावयाचा असेल तर दर मणास एक आणा घेऊन माल आणला अगर पोचविला जाईल.

धान्याचे पोत्यास दोन आणे घेतले जातील.

धाऊक मालाकरितां विशेष रीतीची वेगळी व्यवस्था केली जाईल.

वरील दरांत कार्टिंग ह्मणजे बैल गाडीनें माल पोचविण्याचा खर्चही दाखल आहे.

माल पाठवावयाचा तो लारी कंत्राक्टर यांच्या नावानें पाठवावा.

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. खा. मे.

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० | अकोला रविवार ता० ३० माहे जुलै सन १८७६ इ० | अंक ३१

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचें अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जलम आणि खामगाव स्टेट रेलवे.

लारी जाणें येणें.

या नोटिसीवरून सर्वांस कळावे कीं जी. आय. पी. रेलवेची आगगाडी जाण्याचे व येण्याचे धोरणानें जलम आणि खामगाव यांचे दरम्यान दररोज लारी नेण्या आणण्याचें काम चालविलें जाईल. त्यावरून प्यासेंजर ( उतारकरू ) यांस बसविलें जाईल. त्याचा आकार खालीं लिहिल्याप्रमाणें.

फर्स्ट क्लास .................... १ रुपया
नेटिव लोक .... ............... ४ आणे

मालाचे लारींतून कोणास माल पाठवावयाचा असेल तर दर मणास एक आणा घेऊन माल आणला अगर पोचविला जाईल

धान्याचे पोत्यास दोन आणे घेतले जातील.

घाऊक मालाकरितां विशेष रीतीची वेगळी व्यवस्था केली जाईल.

वरील दरांत कार्टिंग ह्मणजे बैल गाडीनें माल पोचविण्याचा खर्चही दाखल आहे.

माल पाठवावयाचा तो लारी कंत्राक्टर यांच्या नावानें पाठवावा.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० खालीं लिहिलेल्या च्यार ओळीं कृपा करून आपल्या येत्या अंकीं छापून प्रसिद्ध कराव्या.

सन १८७५ सालाबद्दल, डाक्टर आबट साहेब इन्स्पेक्टर जनरल आफ् च्यारिटेबल डिस्पेन्सरिज वऱ्हाड यांणीं वऱ्हाडांतील धर्मार्थ दवाखान्याबद्दल जो रिपोर्ट केला आहे तो मे० रेसिडेंट साहेब हैदराबाद यांच्या अभिप्रायासह नुकताच छापून प्रसिद्ध झाला आहे, तो रिपोर्ट माझे वाचण्यांत आला त्यांत दिलेली माहिती उत्तम असून दिवसें दिवस इंग्रजी पद्धतीवर केलेलीं औषधें लोकांस घेणें आवडतें व त्यांस गुणही येतो, असें त्यावरून कळतें. सहा जिल्हे मिळून धर्मार्थ दवाखाने २३ आहेत. वऱ्हाडांतील लोकसंख्येच्या मानानें ८४०३६ इतक्या लोकांकरितां एक दवाखाना हल्लीं आहे. दवाखान्याची जास्त संख्या वऱ्हाडांत याहून असणें हें अगदी रास्त आहे व सरकार याचा विच्यार करील असें इच्छितों.

दवाखान्यावरील नेटिव डाक्टरांस उत्तेजन यावें व ज्यांणीं गुदस्ता पटकीच्या प्रसंगीं फार झटून लोकांस त्वरित औषधें देण्याची इत्यादि मेहनत घेतली त्यांचीं नावें डा० अबाट साहेबांनीं रिपोर्टांत आणिलीं आहेत. व मे० रेसिडेंट साहेबही अशी त्यांची मेहनत पाहून फार खुष झाले अशाबद्दलही त्यांणीं आपल्या अभिप्रायांत लिहिलें आहे. जीं नावें लिहिलीं आहेत त्यांत उमरावतीच्या रिटेबूल डिस्पेन्सरीवरील मि० एम. दुर्गया पिल्ले यांचें नाव आढळलें नाहीं हें पाहून खरोखर वाईट वाटलें. गुदस्तां पटकीच्या प्रसंगीं ह्या डाक्टरांनीं जी मेहेनत घेतली त्याविषयीं जर लिहिलें तर आपले पत्राची बहुतेक जागा व्यापेल. पटकीच्या दिवसांत [ सरासरी ३।४ महिने ] ह्या गृहस्थांनीं झोंप सुद्धां थोडी घेतली असेल. रात्रीं बेरात्रीं सुद्धां सर्व शहरांत हिंडून कोणीही त्या रोगानें आजारी असल्यास स्वत: औषधें देत. पाहिजे त्या स्थितींतील मनुष्याचे घरीं त्या रोगानें आजारी कोणी असल्याचें समजतांच हे औषधें घेऊन जात. आणि ह्या त्यांच्या लोककल्याणार्थ झटण्याच्या योगानें हे डाक्टर या शहरांतील सर्व लोकांस फार प्रिय झाले आहेत. म्युनिसिपाल कमेटीनें ह्यांची वास्तवीक मेहेनत व व उत्तम काम करण्याची शैली पाहून पटकीचें वास्तव्य या शहरांत होतें तोंपावेतों दरमहा २५ रुपये पगार त्यांस जास्त दिला. जेव्हां अशा मेहेनती, योग्य व लोकप्रिय डाक्टराचें नाव कदाचित् नजरचुकीनें रिपोर्टाद्वारें जरी मे० रेसिडेंट साहेबांचे पुढे गेलें नाहीं तरी आपल्या पत्रीं हा वरील मजकूर छापून प्रसिद्ध झाल्यानें सदर्हू साहेबांस समजेल व असें झाल्यानें त्यांचें मेहेनतीचें पूर्ण सार्थक्य झालें असें त्यांस व येथील सर्व लोकांस सहजच वाटेल. ही विनंती.

आपला एक
उमरावतीकर.

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुध्द १० शके १७९८.

## सर सालरजंग साहेब बहादुरांचा मानमरातब.

विलायतेस सर सालरजंग साहेब दिवाण गेले आहेत त्यांस तेथें जी ईस्ट इंडिया असोसियेशन नामक सभा आहे तिणें एक मानपत्र दिलें त्यांतील मतलब आह्मी आमचे वाचकांस कळवितों. कारण विलायतेंतील युरोपियन लोकही आमचे दिवाण साहेबांची वास्तवीक योग्यता जाणतात व ही आनंदाची गोष्ट आमचे प्रांतांतील लोकांस कळविणें अह्मास इष्ट वाटतें.

सर सालरजंग के. सी. एस. आय
यांस.

महाराज,

आह्मी ईस्ट इंडिया असोशियेशनचे प्रेसिडेंट व मेंबर आपलें विलायतेंत सुखरूप आगमन झालें याबद्दल मनःपूर्वक संतोष मानितों. आणि आपल्या या आगमनानें हिंदुस्थानांतिल इंग्लिश राज्य आणि निजाम सरकार यांचा स्नेहसंबंध अधिक दृढ होईल असा भरवसा बाळगतों. आपल्या स्वतांच्या प्रयत्नावर व हिमतीवर सदर्हू गोष्ट अवलंबून आहे हें आह्मी जाणत नाहीं असें नाहीं. तसेंच आपल्याला कित्येक प्रकारचे कसे अडथळे असून आपण हुशारीनें त्यांचें योग्य निवारण कसें करिता हें आह्मी जाणत नाहीं असें नाहीं. बहुत दिवस आपण दिवाणगिरीचें काम योग्य रीतीनें चालवित असल्यानें कित्येक नाजुक प्रसंग आले असतां आपण आपले सरकार व ब्रिटिश सरकार यांचें सख्य बिलकूल बिघडूं दिलें नाहीं. व तहनाम्यांतील संकेतास बाध येऊं दिला नाहीं. याविषयीं एक अति उत्तम उदाहरण हें आहे कीं, सन १८५७ सालाचे पूर्वीं कांहीं वर्षें इंग्लिश सरकार व निजाम सरकार यांचा केवळ बेबनाव व्हावा असा प्रकार घडून आला होता व लागलीच साऱ्या हिंदुस्थानांत मोठें प्रचंड बंड झालें. असें असतांही त्या अणीबाणीच्या प्रसंगीं आपण इंग्लिश सरकारच्या सख्यसंबंधाचें प्रेम तिळमात्र ढळूं दिलें नाहीं. किती इमानदारीनें आपण त्या प्रसंगीं वागला हें आमच्यानें कधीं विसरवणार नाहीं. व आमचा ग्रेटब्रिटन देश ती तुमची सेवा विसरण्याजोगा कृतघ्न कधीं होणार नाहीं. मोठ्या विशाल राज्याची दिवाणगिरी आपण प्रशंसनीय रीतीनें इतकीं वर्षें करीत आहा येणेंकरून आपलें नाव पिढी दर पिढी कोणी विसरणार नाहीं व हिंदुस्थानच्या इतिहासांत नेटिव्ह राज्याचे जे उत्तम प्रधान त्यांत आपलें नाव गणलें जाईल. तुमच्या राज्यांत फार मोठी महत्वाची जी जागा ती तुह्माकडे आहे. व ब्रिटिश सरकारचा प्रशंसाप्रदर्शक स्टार आफ इंडियाचा आपणास किताब आहे यावरून आमची ईस्ट इंडिया असोशियेशन सभा तुमचे परिश्रम व उत्तम सन्मान्यता चांगली जाणते. आणि ती आणखी अशी आशा करते कीं, दयाळु परमेश्वराच्या कृपेनें आपण दीर्घकालमर्याद सुरक्षित राहून या सन्मानाचा अनुभव घ्यावा.

याप्रमाणें ईस्ट इंडिया असोसियेशन सभेनें दिवाण साहेबांस मानपत्र दिलें. त्या खालीं त्या सभेचे प्रेसिडेंट सर लारेन्स पिल यांची सही आहे.

दुसरी एक संतोषाची गोष्ट कीं तारीख २९ जून रोजीं कामन कौन्सिल कोर्टाची सभा भरली होती तींत मि० डिपुटी मेकडुगल साहेब यांनीं संकेतानुरूप भाषण केलें कीं निजाम सरकारचे मुख्य प्रधान सर सालरजंग यांनीं ग्रेटब्रिटन देशाची जी बिनमोल कामगिरी बजाविली आहे ती स्मरून हल्लीं ते आपल्या देशांत आले आहेत व त्यांस सिटी आफ लंडनची आनररी फ्रिडम हा एक मोठा मान देण्याचा ठराव झाला आहे तर तो मरातबाचा कागद एक हजार रुपये किमतीचा सोन्याचा डबा करून त्यांत घालून सालरजंग साहेबांस नजर पाठवावा. या भाषणास सर्वांनीं अनुमोदन दिलें व तसें करण्याचा ठराव झाला.

## सोनें महाग कां झालें?

अलीकडे आगगाडी व तारायंत्राच्या योगानें पृथ्वींतील बहुतेक देशाशीं दळणवळण वाढत चाललें असून त्यामुळें व्यापारांत कधीं कोणते प्रकारची अदलाबदल होईल याची बिलकुल शाश्वती राहिली नाहीं. काय चमत्कार आहे कीं पृथ्वींतील कोणतेही देशांत एखादे मालाचे संबंधानें न्यूनाधिक्य जरा झालें कीं त्या संबंधानें सर्व देशांत एकसारखी गर्दी होऊन जाते व त्या मालाचे संबंधानें कित्येक अघाटित घडामोडी होऊं पहातात. वास्तवीक ह्मटलें असतां व्यापाराचे संबधानें ही एक विलक्षण सोय आहे. कोठें काय चाललें आहे हें तावडतोब कळतें. व जो तो आपल्या सोई गैरसोई पाहूं लागतो. आगगाडी व तारायंत्र नसतें तर असें झालें असतें कां?

आपल्या देशांत सोन्याचा भाव या महिन्यांत एकदम वाढला व चांदीचा भावही त्याचप्रमाणें एकदम कमी झाला आहे. याचें कारण पाहूं गेलें असतां मोठें चमत्कारिक आहे.

असें ऐकण्यांत आलें आहे कीं अमेरिकेंत व जर्मनींत आजपावेतों चांदीचें नाणें होतें तें मोडून सोन्याचें झालें त्यामुळें जितकी चांदी नाण्यांत गुंतली होती ती गाळून पूर्वरूप तिला आलें व त्याचप्रमाणें कित्येक ठिकाणीं चांदीच्या नवीन खाणी सांपडल्या यामुळें त्या देशांत चांदी फार स्वस्त झाली व तिची किंमत विलायतेसही अर्थांतच उतरली गेली. विलायतेंत रुपया हें नाणें नसून पौंड सिलिंग असें आहे. पौंड हें नाणें सोन्याचें आहे. व विलायतेंत व्यापार चालतो तो पौंडानें चालतो. रुपयानें चालत नाहीं. यामुळें इकडेस जो विलायतेहून माल येतो त्याची किंमत तेथें पौंडानें द्यावी लागते. आजपावेतों चांदी साधारण होती ह्मणून सरासरी १० रुपयांस १ पौंड पडत असे परंतु वर सांगितल्या प्रमाणें चांदी स्वस्त झाल्यामुळें १० रुपयांऐवजी आतां १२॥ किंवा १३ रुपये १ पौंडास द्यावे लागतात. इकडून जो पैसा जातो तो आजपावेतों हुंडीनें किंवा नगदीनें जात असे व सरासरी १० रुपयांस एक पौंड मिळत असे आतां चांदी स्वस्त झाल्यामुळें इकडील व्यापाऱ्यांनीं नगदी किंवा हुंडी न पाठवितां १२॥ किंवा १३ रुपयांचें सोनें पाठविलें असतां एक पौंड होऊन कांहीं बचत रहाती ह्मणून विलायतेंत पैसा पाठविण्याचा तो सोन्याचे रूपानें पाठविण्याचें सुरूं केलें आहे ह्मणून इकडेस सोनें महाग होत चाललें आहे.

याजवरून सोन्याचा भाव अधिक कां झाला हें कळून येऊन शिवाय विलायतेंतील मालावर आपला देश किती अवलंबून आहे हेंही दिसून येईल. तिकडील गैरसोय न व्हावी ह्मणून आपल्या देशांत पाहिजे तशी काटकसर आपले व्यापारी करूं लागले आहेत. हें कां? असें विच्याराल तर, आपल्या जरूरीच्या वस्तु आपल्यास तिकडून आणिल्यावाचून गत्यंतर नाहीं ह्मणून. असो. परमेश्वर आपल्या देशाची दैन्यदशा लवकरच काढून टाको इतकेंच आह्मी इच्छितों.

## जुडिशियल कमिशनर आफिस.

अकोल्याचें जुडिशियल कमिशनर आफिस उमरावतीस जाणार अशी एक दोन आठवड्यांत बातमी निघाली आहे ती कितपत खरी आहे याविषयीं अजून चांगलें समजलें नाहीं, परंतु बूट निघाला आहे त्याअर्थीं अधिकाऱ्यांनीं जोर धरल्यास तसें होण्यास अशक्य आहे असें नाहीं. ह्मणून या प्रसंगीं आह्मी रयतेचें मत दोन शब्दांनीं कळविणें इष्ट आहे.

कोणत्याही शहराची सुधारणा करण्यास आवकाश लागतो तसा त्याचा विध्वंस होण्यास लागत नाहीं. अकोला शहर स्वरूपतः उमरावतीपेक्षां कमी महत्वाचें आहे तरी मध्यवर्तींत आहे व सोयीचें आहे ह्मणून कांहीं आफिसें अकोल्यास व कांहीं उमरावतीस ठेवून दोहोंची योग्यता सारखी राखिली. व वऱ्हाड प्रांताच्या लांबी रुंदीच्या व सोयीच्या मानानें असें करणें अवश्यही आहे. ह्मणजे हल्लीं कमिशनर आफिस उमरावतीस व जुडिशियल कमिशनर आफिस अकोल्यास आहे. पोलिस खात्याचे इन्स्पेक्टर जनरल उमरावतीस आहेत, विद्याखात्याचें डायरेक्टर अकोल्यास आहेत, रेजिस्टर जनरल उमरावतीस आहेत, स्यानिटरी कमिशनर अकोल्यास आहेत. शिवाय डिपुटी कमिशनर दोहोंकडे सारखे, स्मालकाज कोर्टें दोहों ठिकाणीं सारखीं आहेत. इत्यादि गोष्टींचा विच्यार केला ह्मणजे जुडिशियल कमिशनर आफिस जें अकोल्यांत सर्वांत महत्वानें मोठें तेंच एथून उचलावें हें बरोबर नाहीं असें सरकारास वाटावें.

उमरावतीच्या छावणींत कचेऱ्यांस पुरेसे बंगले नाहींत, अकोल्यास पुरून उरेशा लक्षावधि रुपयांच्या इमारती रिकाम्या पडलेल्या आहेत व त्या पोरा सोराच्या उपयोगास व वखारीच्या आणि भाडोत्री घराच्या कामीं लागलेल्या आहेत. तेंही असो पण येथें कमिशनर आफिस स्वतंत्र व चांगलें बांधलेलें असतां तें उजाड करून उमरावतीस जु० क० आफिस नेणें व त्याकरितां नवें आफिस बांधणें हें जरा पैशाचा व्यर्थ विनियोग केल्यासारखें होणार आहे.

शिवाय सहा जिल्ह्यांतील रयत जु० कमिशनरकडे अपिलाकरितां येणारी आहे तेव्हां तिला साऱ्या प्रांताच्या मध्यस्थितींत आफिस असणें फार अवश्यक आहे, व तशा योजनेनेंच मूळ स्थापना येथें झालेली आहे सबब त्यांत आतां बदल होऊं नये.

कोणी ह्मणतात अधिकाऱ्यांच्या सुखासाठीं व सोयीसाठीं ही योजना व्हावी असें ते इच्छितात. हें खरें असेल तर एकाद्या मोठ्या मनुष्याच्या सोयीकरितां हजारों गरीब मनुष्यांची गैरसोय करणें चांगलें नाहीं असें रेसिडेंट साहेबांस वाटेलच. कोणास थंड हवेकरितां चिखलदरा आवडतो ह्मणून तेंच आमचें सदर स्टेशन करून द्या असें त्यांनीं मागणें मागितल्यास रेसिडेंट साहेब ते देतील असें नाहीं. तसाच विच्यार हा आहे.

आतां हे खरें आहे कीं कमिशनर व जुडिशियल कमिशनर यांचे एकत्र विच्यारानें कांहीं महत्वाच्या कामाचे विच्यार व्हावयाचे असतात त्याकरितां उभयतांस एके जागीं मिळण्याची कधीं कधीं अवश्यकता येत असेल, तथापि याच गोष्टीकरितां जु. क. आफिस उमरावतीस उचलून नेणें व लाख पन्नास हजार रुपये खर्चून नवी इमारत बांधणें जरूरीचें नाहीं. उमरावतीला व अकोल्याला रेलवे आहे, व तारायंत्र आहे. जरूरीच्या कामीं एक तासाचे आंत तारेनें परस्पर अभिप्राय कळवितां येतील निदान च्यार तासांत परस्पर मुलाखती होतील. व तसें करणें त्यांस सहज व सुलभ आहे आणि रयतेस फार कठीण व दुर्घट आहे. सबब लोकांच्या अडचणीचा विशेष विच्यार करून जु. क. हपीस उमरावतीस नेण्याचें घाटत असल्यास तें रहित करितील अशी आह्मी उमेद बाळगतों.

### नेटिवाविषयीं लार्ड सालस्बरी साहेबांचें भाषण.

कूपर्स हिल येथें इंडि० सि० इंजि० कालेज आहे तेथें बक्षिसें वाटण्याचा समारंभ झाला त्यावेळेस अध्यक्ष स्थानीं लार्ड सालिस्बरी हे होते. त्यांनीं भाषण केलें तें आमचे देशास मोठें महत्वाचें होतें तें असें:—

रुप्याचे भावाची गडबड आवश्यक व्हावी. त्यापेक्षां उगीच अधिक झाली आहे. तरी पब्लिकवर्क्स खात्यांत आतां खर्च कमी करणें आवश्य आहे कारण हिंदुस्थानांत हें खर्चाचें मोठें तोंड आहे. जेव्हां खजिन्यांत पैसा पुष्कळ असतो तेव्हां अधिक खर्च करणें ठीक आहे पण आतां खजिन्यांत तंगी आहे तर काटकसरीची जरूरी आहे.

नेटिव लोकांस हिंदुस्थानांतील युरोपियन लोक चांगले वर्तवित नाहींत ही त्यांच्यांत मोठी उणीव आहे. प्रिन्स आफ वेल्स बरोबर पुष्कळ गृहस्थ हिंदुस्थानांत गेले होते. त्यांच्या सांगण्यावरून कळतें कीं, तिकडे नेटिवांशीं युरोपियनांचें चांगलें रहस्य नाहीं. ही मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं, युरोपियन लोकांनीं नेटिवांपासून असें अलग रहावें. नेटिव लोकांस त्यांच्या योग्य हक्कापासून दूर करणें वाजवी नाहीं याकरितां सिव्हिल सर्व्हिसच्या सनदी जागाही त्यांना देण्याचा क्रम सुरू करून त्यांचा मान वाढविणें आह्मास फार जरूर आहे.

याप्रमाणें स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं भाषण केलें तेव्हां त्याप्रमाणें व्यवस्थाही लवकर सुरू होईलच. त्यांत पब्लिकवर्क्स खात्याचा खर्च कमी होऊन सनदी नोकऱ्या आमच्या लोकांस सर्वत्र मिळूं लागतील असें आह्मी इच्छितों.

### पोलिसचा अनावर जुलूम.

मसुरी एथील पत्रावरून पोलिसाचे जुलमाविषयीं दोन गोष्टी समजतात त्या ऐकून कोणासही आश्चर्य व दुःख झाल्यावांचून रहाणार नाहीं. ह्मणून ती हकीकत आह्मी आपले वाचकांस सादर करितों ती अशी:—

रायपुर एथें एका बाईनें गर्भपात करून बाळकास पुरलें व गुन्हा छपविला या अपराधाबद्दल पोलिसानें तिला कैद केलें. माजिस्त्रेटापुढें त्या बाईनें गुन्हा कबूल केल्यावरून तिला सेशनकमीट केलें. तसेंच ती कबूलच होती ह्मणून जडजानेंही दुसरा साक्षी पुरावा न घेतां फाशीची शिक्षा ठरविली व जुडिशियल कमिशनर कडून ती शिक्षा मंजूर झाली. तारीख १९ रोजीं तुला फाशी दिलें जाईल असें तारीख १२ रोजीं तिला सांगितलें पण मध्येंच तारिख १४ रोजीं ती प्रसूत होऊन मुलगा झाला. हें पाहून कामगार लोकांची काय अवस्था झाली असेल बरें! सर्व कामगार तुरुंगांत जमा झाले व या बाईला विचारूं लागले कीं, असें होतें तर तूं कबूल जबाब कां दिलास? तिणें उत्तर दिलें कीं पोलिसाच्या जुलुमामुळें. त्याच प्रांतांत कांहीं दिवसांपूर्वीं एका मनुष्यानें आपली बायको ठार मारल्याचा गुन्हा पोलिसानें पकडला व माजिस्त्रेट, जडज यांजपुढें चौकशी होऊन कबूल जबाब दिल्यावरून फाशीच्या शिक्षेस पात्र ठरला. व तो आपल्या अंतकाळाचे दिवस मोजित तुरुंगांत बसला आहे इतक्यांत जिला ठार मारल्याबद्दल हा प्राणास मुकणार होता ती स्वतः आपल्या पतीची सुटका व्हावी ह्मणून अर्ज घेऊन कोर्टांत हजर झाली.

ह्या दोन्ही गोष्टी खऱ्या असतील तर पोलिसाच्या जुलुमाची व न्यायाची कमाल झाली खरी. कारण पहिल्या उदाहरणांतील गर्भार स्त्रिला पोलिसानें कशाप्रकारें जाचणूक केली असेल कीं ती गुन्हेगार नसतांही कबूल जबाब देऊन फाशी जाण्यास सिद्ध झाली. पण त्या पोलिस अधिकाऱ्यांस अगर न्यायाधिशांस ती पूर्णदषेस आलेली सगर्भमुद्रा कशी उमटली नसेल न जाणों.

### जयपुरच्या महाराजांवर संकट.

जयपुरचे महाराज मागें सिमल्यास नवीन आलेले गवरनर जनरल साहेबांचे भेटीस गेले होते. त्या वेळेस हिंदुस्थान सरकाराकडून सर लुईस पेली व कांहीं कामगार महाराजांस कांहीं राज्यसंबंधी सल्ला द्यावयास गेले होते; पण ती महाराजांस आवडली नाहीं व मान्य झाली नाहीं. ह्मणून त्याच प्रसंगीं सल्लागारांनीं असेंही बोलून दाखविलें कीं, हिंदुस्थान सरकारचा जर तुह्मी संतोष राखणार नाहीं तर तुमचें नुकसान निघेल. तेव्हां महाराज दिलगीर होऊन घरीं परत आले. या नाचक्कीचें कारण इतकेंच होतें कीं, सांबर मिठाचे सरोवराजवळ दरवडे सुरूं झाले आहेत व तो संबंध एका दरबारी कामगाराकडे पोंचतो ह्मणून त्यास कामावरून काढण्याविषयीं व्हैसराय साहेबांची सल्ला होती; पण सदर्हू कामदार महाराजांचे मर्जींतले असल्याकारणानें तसें घडलें नाहीं. ह्मणून इंग्रज सरकारांनीं त्या तळ्याच्या संरक्षणार्थ लष्करी व कांहीं पोलिसचे लोक योजिले आहेत. ही सर्व हकीकत टा. आफ इंडियाद्वारें त्यांचे चांगले माहितगार बातमीदारांनीं कळविल्यावरून समजतें. व तेच बातमीदार असेंही लिहितात कीं, याशिवायही बेबनाव होण्याचीं कांहीं राजकीय कारणें चालू आहेत तीं पुढें कळतील.

ही वरील हकीकत खरी असल्यास जयपुरचे महाराजांवर हें एक नवें संकट उद्भवलें खरें. जयपुर हें संस्थान इंग्रज सरकारच्या लोभांतील असून राज्यव्यवस्थाही टापटिपेनें चालल्याविषयीं सर्वत्र प्रसिद्ध होती. असें असतां त्यावर हा प्रसंग आल्याचें ऐकून सर्वांस फार खेद होईल.

## नाणें

(येथील सभेंत निळकंठराव नारायण हैस्कूलचे सेकंड असि० मास्तर यांनीं वाचलेला निबंध)

नाणें ह्मणजे एक जिन्नस देऊन दुसरा जिन्नस घेण्यास साधनीभूत असा पदार्थ सर्वांनुमतें ठरलेला असतो तो. ह्मणजे अर्थांत हा पदार्थ असा असला पाहिजे कीं कोणत्याही अन्य जिनसबद्दल हा पदार्थ मोबदला मिळावा व त्याचप्रमाणें या पदा

REGISTERED NO. 7, 1876



र्थाचे मोबदला हवा तो अन्य जिन्नस मिळावा अशा पदार्थाचें नाव नाणें अथवा चलन. हरएक प्रकारचीं नाणीं हीं मानवी कृतीचीं आहेत. इतर सृष्ट पदार्थांप्रमाणें पृथ्वीचे पाठीवर सर्व देशांत चालणारें नाणें असा एक सिद्धपदार्थ नाहीं. निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या प्रकारचीं नाणीं असतात. अगदीं पहिलीं नाणीं ह्मणजे मनुष्य रानटी अवस्थेत होता तेव्हांचीं नाणीं हीं पशू व माणसें हीं होतीं. सुमारें ३००० वर्षांपूर्वीं रोम देशांतील प्रचारांत असलेल्या ल्याटिन भाषेंत 'Peculium' ह्मणून शद्ब होता व त्याचा मूळ अर्थ 'पशुधन' हा होता, त्यावेळीं हल्लींप्रमाणें सुवर्ण रौप्यादि धन कोणाहीपाशीं नव्हतें, सर्वांचें धन काय तें पशू. तेव्हां एखादी जिन्नस हवी असेल तर लोक एक अगर त्या मोबदला जिनसेच्या मानानें अधिक पशु ज्याजपाशीं तो जिन्नस असेल त्यास देऊन घेत. हिंदुस्थानांत अति प्राचीन काळीं ही असाच प्रकार सुरू असावा असें दिसतें. संस्कृत भाषेंतील "पशु" हा शद्ब व पेक्युलम ह्या लातिन शद्बांतील 'पेक्यु' हा भाग हे दोन्ही एकच आहेत असा भाषातत्व वेत्त्यांनीं निर्णय केला आहे व आपल्या भाषेंतही 'पशुधन' 'गोधन' वगैरे शद्ब असून पुराणांतरीं एका राजानें दुसऱ्या राजाचें गोधन हरण केल्याच्या कथा सांपडतात. गोधन हेंच त्या वेळचें धन असल्या खेरीज एका राजास दुसऱ्या राजाचीं जनावरें हरण करण्याची ईर्षा होणार नाहीं असें अनुमान केल्यास तें खोटें होणार नाहीं असें आह्मांस वाटतें. त्याचप्रमाणें मनुष्यें मनुष्यांना मोबदला देत असत हें त्या वेळच्या रोमन लोकांतील दासांच्या स्थितीवरून सहज कळून येईल. त्या वेळीं त्यांची अशी स्थिति होती कीं जरकरितां एखाद्या सावकाराच्या कुळाकडून त्याचा उसनवार घेतलेला जिन्नस नेमलेल्या वेळीं परत केला गेला नाहीं तर तो सावकार त्या मनुष्यास एकदम दास करून आपल्या घरीं आणून घेई. व २—३ सावकार तो जिन्नस देण्यांत भागीदार असतील तर ते सर्व त्या कुळाचे समभाग करून आपल्या मध्यें वाटून घेत. यावरून असें दिसून येईल कीं मनुष्य मोबदला दिला ह्मणजे त्या वेळीं उसनवार घेतलेली जिन्नस परत द्यावी लागत नसे.

कांहीं देशांत नाणें हें सुवर्ण, रुपें किंवा तांबें यांचें केलेलें असतें; कांहींत कवड्या हेंच नाणें आहे उदाहरणार्थ गायना देश व हिंदुस्थान देश; कांहींत मीठ हेंच चलन असते उदाहरण आबिशिनिया देश; व कांहींत लोखंडाचे तुकडे हेच देव घेवींत चालतात. चीन देशांत चाहानें ठासून भरलेलीं अशीं लांबी, रुंदी, व उंचीचीं कांहीं विशेष मापें हींच इतर नाण्य प्रमाणें चालतात. याप्रमाणें पुष्कळ मागील व हल्लींचीं उदाहरणें सांगता येतील. परंतु सर्व सुधारलेल्या राष्ट्रांनीं सोनें व रुपें यांचींच मुख्य नाणीं कां केलीं आहेत व वर सांगितल्याप्रमाणें एखादा जिन्नस हेंच नाणें कां केलें नाहीं ह्या प्रश्नाचें उत्तर- जो पदार्थ नाणें ह्मणून ठरावयाचा त्या पदार्थाचे अंगीं कोण कोणते गुण पाहिजेत व ते असल्यानें व नसल्यानें नफे व तोटे कोण कोणते आहेत त्याचा पुढें विच्यार केला आहे त्यावरून सहजी ध्यानांत येईल.

पुढें चालू.

## वऱ्हाड.

हवामान—याआठवड्यांत पर्जन्य चांगल्याप्रकारें पडून हवेंत थंडावा चांगल आला आहे. शेतकीचें काम जारी आसून ज्वारी व कपाशीचीं शेतें हिरवीगार दृष्टीस पडूं लागलीं आहेत. बाजारभाव मंदावला असून शेहरांत रोगराई विशेष नाहीं.

हैदराबादेस रेसिडेन्सीआर्डर ही दर महिन्यांतून दोन वेळ ५व्या व २०व्यातारखेस प्रसिध्ध होत असे ती यापुढें १ली व १५वी यातारखेस प्रसिध्ध होत जाईल.

मे० लायल साहेब रजपुत संस्थानचे हिं. सरकारचे एजंट व चीफ कमिशनर यांनीं विलायतेस जाण्याकरितां ६ महिन्यांची रजा घेतली होती ती मंजूर झाली पण हल्लीं ते रजपुत संस्थानचें ग्याझिटियर लिहित आहेत तें पुरें झाल्योखेरीज ते रजेवर जात नाहींत. ता. १५ आगष्टचे सुमारास सदर्हू पुस्तक संपेल व ते रजेवर जातील. त्यांचे जागेवर पुन्हा सर लुईस पेली साहेब हे जातील असें समजतें.

रावसाहेब नारायण भाई डायरेक्टर उमरावतीस गेले होते ते गुरुवारीं परत आले. तेथील हायस्कुलाचा समारंभ बुधवारीं झाला.

रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापरडे बुलढाण्याच्या एकस्ट्रा असिस्टंट क. साहेबांचे चिरंजीव बी. ए. करितां मुंबईस अभ्यास करीत आहेत त्यांनीं गेल्या आठवड्यांत तेथील एका सभेत "फिलासफी" या विषयावर फार चांगलें व्याख्यान दिलें हें ऐकून आह्मास संतोष होतो.

आह्मांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं डा० पिट साहेब येथील अपार्थीकरी शुक्रवारीं पाहाटे मरण पावले. हे बरेच दिवस आजारी होते तरी आलीकडे हिंडू फिरूं लागले होते. त्यावरून असा प्रसंग येईल असें कोणास वाटलें नव्हतें. साहेब फार गरीब, अल्पसंतुष्ट, आपले कामांत हुशार, व गरीबाचे कनवाळू होते. गावांतून कोणीही त्यांस बोलाविलें असतां ते आले नाहींत असें कधीं घडलें नाहीं. त्यावरून नेटिव लोकांत ते फार लोकप्रिय झाले होते ह्मणून त्यांचें मरण लोकांस फार दुःखकारक झालें आहे.

क्या० ट्रेव्हर साहेब सेकंड असिस्टंट रेसिडेंट विलायतेस दिवाण साहेबांबरोबर गेले आहेत तिकडून ते परत आल्यावर हैदराबादेस न रहातां वऱ्हाडांत कामावर येतील. व मि० डनलप साहेब हेच त्यांचे कामावर हैदराबादेस कायम होतील असें समजतें.

वैकुंठवासी शेट भगुलाल ताराचंद यांच्या पत्नि पन्नाबाई यानीं येथील लायब्रीस ५१ रुपये बक्षीस दिले. लायब्रीचें दैन्य रा. रा. देवराव विनायक वकील यांनीं त्यांस कळविल्यावरून त्यांनीं सार्वजनिक उपयोगार्थ ही देणगी दिली. याबद्दल आह्मी त्यांची तारीफ करितों.

'उमरावतीकर' या सहीचें एक पत्र आज प्रसिद्ध झालें आहे त्यांत लिहिल्याप्रमाणें डाक्टर दुर्गय्या पिले यांनीं उमरावतीस महामारीचे प्रसंगीं पुष्कळ श्रम केले व लोकांनीं ते त्यांचे श्रम जाणून म्युनिसिप्यालिटीकडून त्या दिवसांत त्यांस अधिक पगारही दिला असें असतां त्यांची ती योग्य कामगिरी इंन्स्पेक्टर जनरल यांचे नजरेस आली नाहीं किंवा येऊन ती विस्मृतीनें रिपोर्टांत लिहिणें राहिली हें समजत नाहीं. दुसऱ्या कोणाही डाक्टराची शिफारस झाली नसती तर दुर्गय्या यांचा कांहीं विशेष हक्क नव्हता हें आह्मी कबूल करूं; परंतु सहाजणांची शिफारस करून एकास वगळणें हें त्यांची नाउमेद करणें आहे सबब असें झालें नसतें तर फार बरें होतें.

सदर्हू रिपोर्टांत खालीं लिहिलेल्या गृहस्थांच्या शिफारशी झाल्या आहेत.

| | |
|---|---|
| मि० स्टिनोफ | खामगाव |
| ,, अप्पा कन्नू | अकोला |
| ,, जहरुल हक्क | मलकापुर |
| ,, इमाम खान | अकोट |
| ,, शेख इब्राहीम | इलिचपुर |
| ,, खुदाबक्ष | वणी |

यापैकीं खुदा बक्ष यांस १०० रुपये गाववाल्यांनीं बक्षिस दिले. आमचे येथील अप्पा कन्नू यांसही बक्षिस मिळणें योग्य आहे कारण ते पुष्कळ मेहनत हमेशा घेतात, व आजाऱ्यांची संख्याही फक्त उमरावती खेरीजकरून सर्व डिस्पेन्सऱ्यांपेक्षां त्यांच्याकडे पुष्कळ अधिक असते.

मि० सी. भिमराव नावाचे जे गृहस्थ अक्याची नेमिले आहेत ते ह्मैसुराकडील मोठ्या विख्यात घराण्यांतील गृहस्थ आहेत असें कळतें.

मद्रासेकडे ५५ वर्षांचे वयाचे सबबेनें ३ जडज, २ माजिस्त्रेट व दुसरे किसेक लोक काढिले.

नबाब शाबुदीनखा साहेब बहादूर अक्याची यांना तारीख ३१ जुलैपर्यंत क्यान्टोंमेन्ट माजिस्त्रेटचें काम पहाण्याचा हुकूम झाला आहे.

क्या० थामसन असिस्टंट कमिशनर यांना विलायतेस रजेवर जाण्यास लष्करी खात्याकडून परवानगी मिळाली. मात्र डाक्टराचें सर्टिफिकिट दाखल केलें पाहिजे.

## वर्तमानसार

सर नार्थर हामिलटन गार्डन हे मुंबईस पुढें गवरनर होतील असें पायोनियर कर्ते ह्मणतात.

पुण्याचे म्युनिसिप्यालिटीचा वार्षिक रिपोर्ट प्रसिध्ध झाला आहे त्यावरून तिच्या खर्चाचें टिपण समजतें तें असें:—

जमा.

| | |
|---|---|
| गुदस्त शिलक | ५७१३४ |
| जकात थळमोड | ९२५२६ |
| घरपट्टी | २६१३३ |
| इतर उत्पन्न | १३६४७ |
| कर्जखाते | १५२०४ |
| | २०४६४४ |

खर्च.

| | |
|---|---|
| आफिससंबंधी | १८०८१ |
| पोलिस, दिवाबत्ती, आगीचा बंदोबस्त | ११८९७ |
| दवाखाने व सफई | ४११३४ |
| पाण्याचे लोखंडी नळ | ६८६१६ |
| विद्यावृध्धी | ५७५ |
| सार्वजनिक सोईचीं कामें | ३००४० |
| कर्जखाते | १४१६२ |
| | १८५००५ |
| शिलक | १९६३९ |
| एकूण | २०४६४४ |

सिंव्हलद्वीपच्या गवरनरानें स्टेटसेक्रेटरी यास विच्यारिलें कीं, रुपयाचा भाव कमी झाला सबब सिंव्हल सर्विसवाल्यांचे पगार वाढवावे. आजून आखेर जाब नाहीं.

भुपाळच्या बेगम साहेबांचें सामान मुंबईहून हरद्यास रेलवेंतून पाठविलेलें सन १८७२ सालीं मध्येंच वागनला आग लागून ६४६५५ रुपयांचें जळालें होतें तें कंपनीकडून भरून घेण्याविषयीं बरीच खटपट चालू होती पण कंपनी ते कबूल करीना. ह्मणून बेगम साहेबांनीं कंपनीवर फिर्याद केल्यावरून मुंबई हाय कोर्टानें १५२६३८१२ नुकसानीबद्दल देवाविले.

लखनौच्या वकिलावर खोटी प्रतिज्ञा खोटा दस्तैवज व फ्राड केल्या बद्दल सेशन मुकद्दमा चालू आहे.

मुंबईचे टंकशाळेंत रुप्याचा भाव उतरल्यामुळें काम बंद आहे अशी गप्प उठली होती पण तसें नसून नवीन रुपये पाडणें सुरू आहे.

खानदेशांत जिवंत नवऱ्याचे बायकोशी मोहतुर लाविल्याबद्दल त्या नवऱ्या बायकोस २ महिने व मोहतुर लाणाऱ्या भटास १॥ महिना कैदेची शिक्षा झाली.

ईस्ट इंडिया रेलवेंचे सहा माहीचें उत्पन्न ३२९१८८३० रुपये. गुदस्त सहा माहीचें २८९९९६१० रुपये झाले होतें.

जबलपुर लाईनचे या वर्षाचे सहा माहीचें उत्पन्न २७०७५७० रुपये झालें व मागील सालचे सहा माहीचें उत्पन्न २४२६८८० झालें होतें.

बडोद्याचे प्रसिद्ध सावकार यशवंतराव गोपाळ हे मरण पावले.

रा. सा. काशिनाथ महादेव थत्ते यांस कुलाब्यास आफिशियेटिंग डिपुटी कलेक्टर नेमिले.

जगन्नाथाचा रथ मिरविण्याची मनाई झाली होती ती रद्द करून रथ मिरवूं द्यावा असा ठराव झाला.

बाबू राजमातराय यांस मुंबईस आकौंटंट जनरलचे आफिशियेटिंग असिस्टंट नेमिलें.

ग्वालेर स्टेट रेलवेचें काम चांगलें चाललें आहे व सामान नेण्याची आगगाडी लवकरच चालू होईल.

डाका एथें नार्थब्रूकहाल नावाची इमारत बांधणार त्यासाठीं ३७००० रुपये जमले आहेत. पुढील महिन्यांत सर रिचर्ड टेंपल साहेब पायाचा दगड बसविण्याचा समारंभ करणार आहेत.

मि. एफ एल गोल्डस्मिथ बडोद्यास असिस्टंट रिविन्यु कामिशनर नेमिले व ते विलायतेहून आले.

नागपुरास कै. विष्णु परशराम शास्त्री पंडित यांचें स्मारक कृत्य करण्यासाठीं दोनतीनशें रुपये जमतील असें कळतें. व त्या रुपयांचा तेथेंच कांहीं विनियोग करावा असें मंडळीचे मनांत आहे.

रशिया व आस्त्रिया यांचा विच्यार झाला आहे कीं तुर्कस्थानचें भांडण अगदी निकरावर येईपर्यंत आपण त्यांत पडूं नये.

जी. आय. पी. रेलवेच्या १२७८॥ मैल चालू असलेल्या रस्त्यावर जुलईचे पहिले आठवड्यांत खालीं लिहिल्या प्रमाणें उत्पन्न झालें.

| उत्पन्न | रुपये. |
|---|---|
| कोचिंग प्यासेंजर ७९०२९ | ७४२८४ |
| माल २९९३९१ मण | १९२९१९ |
| तारायंत्र | ९०९ |
| म्युनिपलट्रेन | ३८७॥ |
| | २२८१९१॥ |
| गुदस्त सालचे आठवड्यांत सदर्हू रस्त्यावर | १९९०८७॥ |

तेव्हां गतवर्षाचे याच आठवड्यांतील उत्पन्नाहून या सालच्या सदर्हू आठवड्यांत १२७८॥ मैल रस्त्यावरच ३३१०६ रुपये उत्पन्न अधिक झालें.

मद्रास इलाख्यांत वैनाद येथें सोन्याच्या खाणींचें काम चालविण्याकरितां एक नवीन आणखी कंपनी झाली व तिचें भांडवल ४ लक्ष रुपये जमले आहे.

पुण्यास कला कौशल्याचें प्रदर्शन येत्या आगष्टमध्यें होणार आहे.

वाफेच्या यंत्रानें कागद करण्याचा कारखाना सुरतेस लवकरच सुरू होणार आहे.

कागदाचे कारखानेवाल्यांस हिंदुस्थान सरकारानें कागदाचे मासले मागितले आहेत.

लाहोराकडे बातमी आहे कीं, इजिप्त देशांत पाठविण्याकरितां १९ हजार काळी फौज व ९ हजार गोरी फौज तयार ठेवावी.

त्रावणकोरच्या संस्थानची खानेसुमारी २३११७९ आहे.

त्रावणकोरचे राजे १८७९ सालीं ज्या नेवारी फेब्रूवारी महिन्यांत मद्रास, कलकत्ता, आग्रा, व दिल्ली पहाण्यास गेले होते त्यांस खर्चास १०९९१९ रुपये लागले व ४६ दिवसांत ६३१३ मैल प्रदेश फिरून आले. व सर्वत्र इंग्रज सरकारची व्यवस्था फार उत्तम आहे असें त्यांनीं प्रदर्शित केलें.

## सोनार

या नावाचें पुस्तक नुकतेंच छापून प्रसिद्ध झालें व त्याची एक प्रत आह्मांस आली आहे. त्यांतील उपयुक्त सूचना सर्वांस उपयोगी असें जाणून आह्मी आपले वाचकांकरितां खालीं घेतों:—

सोनाराच्या धंद्यासारिखा लबाडीचा धंदा कोणताही नसेल. सोनारावर विश्वास ठेविला ह्मणजे गिऱ्हाईक बुडालें असें समजावें. प्रत्येक दागिन्यांत सोनाराची लबाडी व मिळकत आहेच. यास्तव प्रिय वाचकहो खालीं लिहिलेल्या सूचना लक्षांत ठेवून सोनाराच्या दुकानीं जा, आणि आपली मालमत्ता विनाकारण त्यांच्या घरांत घालूं नका.

आटणीच्या वेळीं प्रथम मूस आपल्या समक्ष किंवा आपल्या हातानें भरून बागेश्रींत ठेवा. कोळशाची पाटी तपासून पहा, सोनार जिकडे सांडस फिरवील तिकडे लक्ष्य असूं द्या कारण सोनार मोळा सांडसानेंच आंत टाकितो. मोळा ( रुप्याच्या किंवा ताब्याच्या तुकड्याची कापडांत बांधलेली व काळ्या रंगाची गाठोडी ) कोळशांत किंवा मुर्शांत सांपडली तर धरा. सोन्याचा रस झाल्याबरोबर ओतून लगडी लागलींच वजन करून पहा. वजन कमी भरलें तर सोनार ह्मणतो कीं मळ गेला. तें ऐकूं नका. परंतु गोळीच्या किंवा नळीच्या डागांत मळ रहाण्याचा संभव आहे. यास्तव नळीचा व गोळीबंद दागिना अगोदर तापवून हतोड्यानें आपले हातानें ठोकून आंतील सर्व मळ काढावा ह्मणजे आटल्यावर कमी भरण्याची भीति नाहीं आटणें झालें ह्मणजे बागेश्रींतील कोळशे स्वतः चाळून पहा. त्याचप्रमाणें राखही पहा. चोरलेला तुकडा राखेंत पुरण्यास सोनारास सवड सांपडली तर राखेंत सबंध तुकडा सांपडेल नाहीं तर धातूचे रवे सांपडतील ते सर्व तुमचेच होत. कारण सोनारास मोळा टाकण्यास सवड सांपडली नाहीं तर सोनार सोनें बागेश्रींत सांडितो. किंवा मूस फुटली असें ह्मणून पुनः आटणी घालितो. पुनः आटणी घालण्यापूर्वीं सोनें पुनः वजन करा. त्याचप्रमाणें सोनें फुटूं लागतें. ह्मणजे जरी आटलें तरी ठिसूळ होतें. हें ठिसूळ होण्याचें कारण त्यांत कथील रहातें. कथील सोन्यास खातें. जोंपर्यंत सोन्यांत कथिलाचा किंवा शिशाचा अंश आहे तोंपर्यंत तें ठिसूळच राहील. सोनें ठिसूळ असलें तर मुर्शांत सोनें घालून त्यांत सवागी, रसकापूर, मोरचूद, नख व कोंबडीची विष्टा ह्यांची गोळी करून त्या मुर्शांत घालून भोंवतीं कोळसे रचून आटावें ह्मणजे फुटत नाहीं. रुप्याच्या आटणीस सवागी व नवसागर लागतो. रुप्याच्या लगडीस कानस घालून तावल्या बरोबर विझवूं नका; विझवाल तर सफेत उठेल. कारण पाण्यांत नवसागर पूर्वींच घातलेला असतो. नवसागराचा गुण असा आहे कीं कसेंही काळसर रुपें असलें तर नवसागराच्या पाण्यांत विझविल्याबरोबर सफेत दिसतें. आचीच्या दागिन्यांस सुलाख घालीत जा, गोळीबंद दागिन्यांत भोवट ( बारीक लोहकीट ) असले तर सळसळून द्या. गोळीबंद दागिन्यास उजळा दिल्या बरोबर वजन करून घेऊं नका. कारण आंत पाणी व उजळा असल्यामुळें वजन ज्यास्ती भरतें. सोनार जितका डाग लावितो तितकें सोनें काढून घेतो. व डागास सोनें लागतें ( हें सोनें गिऱ्हाइकाच्या सोन्यापेक्षां हलक्या दराचें असतें )तें आपल्या पदरचें घालितो. दागिना तयार झाल्यावर वजन करतेसमयीं जितकें सोनें दिलें असेल तितकें बरोबर आहे अशी तुमची खात्री करून देतो; परंतु डाग तयार करावयास जितकें रुपें व तांबें लागलें असेल तितकें सोनें सोनारानें ठेविलें तें मागून घ्या. त्याचप्रमाणें साका ( तांबें कांहीं रुपें आणि किंचित सोनें एकत्र आटून केलेली लगडी ) फुंकून वजन बरोबर करून दाखाविलें, परंतु साक्याच्या वजना इतकें सोनें चोरलें तें मागून घ्या. कित्येक सोनार बांधीव दागिने करितात, बांधाव डागास जितकी दुसरी धातु लाविली असेल तितकें सोनें ठेविलें असें समजा. बांधीव डाग मोठा असल्यास सुलाख घाला ह्मणजे आंतील रुपें किंवा तांबें सहज दिसेल. जडावाचा दागिना करितेसमयीं सोनार कोंदण चोरितो. डागास कोंदण किती लागलें हें पहावयाची युक्ती अशी आहे कीं प्रथम घरांत खडा बसाया पुर्ती लाख ठेवून बाकी छिलून काढावी नंतर तो लाखमय डाग व खडा यांचें वजन करून नंतर खडा बसवावा. व वर कोंदण जडावें. नंतर पुनः डाग वजन करावा जितका डाग वजनांत ज्यास्ती भरेल तितकें कोंदण लागलें. राहिलेलें कोंदण मागून घ्या. मोत्याचा डाग करतेसमयीं सोनार सूत चोरतो. सबब सूत व मोत्यें ह्यांचा धडा करून डाग तयार झाल्यावर तो डाग व राहिलेलें सूत यांचें वजन करावें. वजन कमी भरल्यास दगा झाला. दागिन्यांत साका आहे असा संशय आला तर तो फोडून पहावा. मणी करितेसमयीं सोन्यांत तांबें टाकावें लागतें तें आपल्या हातानें टाकावें व वजन करितेसमयीं तांबें व दिलेलें सोनें ह्यांसकट वजन केलें पाहिजे. डाग तयार झाला ह्मणजे पूर्वीं केलेल्या वजनाबरोबर आला पाहिजे. कोणत्याही दागिन्यास डाग लावावयाचा असला तर आपल्या हातानें डाग ( डागाच्या मिश्रणास ज्या धातू लागतात त्या प्रत्येकांचें वजन आपल्या हातानें करून सोनारास त्या धातूचा रस करावयास सांगावें ) तयार करावा. व सोनारास जसजसा लागेल तसतसा वजन करून द्यावा. दागिना तयार झाल्यावर शिलक राहिलेली डाग व दागिना ह्यांचें वजन दिलेलें सोनें आणि तयार केलेला डाग ह्यांच्या वजनाबरोबर असलें पाहिजे. गिऱ्हाईक आलें ह्मणजे सोनार दाभण्या काट्यानें किंवा दुसऱ्या युक्तीनें जितकें सोनें गिऱ्हाइकानें दागिना करावयास आणलें असेल त्याचें वजन वाजवीपेक्षां कमी करून दाखवितो. यास्तव वजन समक्ष करून कांटा तपासून पहावा. सोनाराचीं वजनें कमी किंवा ज्यास्ती असतात. कोणताही डाग करण्यास जर आपल्याजवळ सबंध तुकडा आहे तर तो आटूं नये. कोणताही डाग तयार करण्यापूर्वीं आपल्या जवळ मासला ठेवावा.

## नोटिसा.

रामा वल्लद खंडू जिनकर रहाणार कारंजा तालुके मूर्तिजापुर जिल्हा उमरावती याजला सीताबाई मर्द रामजी जिनकर इजकडून नोटिस देण्यांत येते की तूं मजला मागें पुष्कळ दिवसपर्यंत नांदाविलें नव्हतें व अन्नवस्त्र दिलें नव्हतें त्याजबद्दल पंचाईत होऊन तारीख १४ माहे नोवेंबर सन १८७५ इसवी पासून चांगल्या रीतीनें नांदविण्याविषयीं करारनामा लिहून दिला त्याप्रमाणें मी नांदण्यास राजी असतां तुह्मी मला घरीं न नेतां मजला सोडून पळून गेले. झालेल्या दस्तैवजांत सहा महिन्यांचें मुदतीची शर्थ होती ती शर्थ तारीख १४ माहे जून सन १८७६ इसवी रोजीं पुरी झाली याजकरितां तुह्मास कळविण्यांत येते कीं नोटिस दाखल होतांच मजला नांदविण्यास न्यावें नाहीं तर मी आठ दिवस वाट पाहून नंतर मी दुसरा नवरा करण्याची कायदेशीर तजवीज करीन.

सदरहूप्रमाणें नोटिस पूर्वीं तारीख ४ माहे जून सन १८७६ इसवी टपालमार्गें रजिस्टरकरून तुह्मास दिली आसोन त्याचा कांहींच जबाब आजपर्यंत तुह्मी दिला नाहीं. याजकरितां पुन्हा वऱ्हाडसमाचारांत नोटिस दिली आहे तेव्हां वर लिहिले नोटिशीप्रमाणें ८ दिवसांत नांदविण्यास न्यावें नाहींपेक्षां मी दुसरा नवराकरण्याची कायदेशीर तजवीज करीन. मग तुह्मी फिर्याद कराल तर मी ऐकणार नाहीं. हें खूप समजावें कळावें तारीख २१ माहे जूलै सन १८७६ इसवी.

( सही ) बगांडी सिताबाई इचे हातची असे

नोटिस.

मारुती सोनाजी राहणार अकोलें यास खालीं सही करणार इजकडून देण्यांत येते कीं आमचे दुकानच्या संवत् १९२९ सालच्या वह्या कच्ची रोकड वखतावणी तुह्मी लबाडीनें नेल्या असाव्या अशी आमची हल्लींच्या तुमच्या कृतीवरून खात्री होत आहे त्याप्रमाणें दुकानांतील आणखी कांहीं कागदपत्र व पुर्जे व जमाखर्चाच्या वह्या सापडत नाहींत. त्या तुह्मी नेल्या असाव्या यास्तव आजपासून आठ दिवसांत तुह्मापाशीं असलेलें कागदपत्र व वह्या मुदतीच्या आंत आणून द्याव्या आणि कित्येक लोकांपासून लबाडीनें आमचे नावानीं कांहीं वसूल घेतला आहे ते आह्मास कळत आहे त्याबद्दल सर्वप्रकारचा मोहजबा सदरील मुदतींत समजून द्यावा. कळावें तारीख २७ माहे जूलै सन १८७६ इसवी

( सही ) पन्नाबाई जवजे भगुलाल
वहिवाटदार गणोबा राघो
बा दस्तुर खुद.

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.